# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०२/ २०१७** **दिनांक ०९.०३.२०१७**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक ०९.०३.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ६०६५/ २०१७, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दिनांक ०९.०३.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| ०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष | ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| ०३. मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य | ०४. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| ०५. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य | ०६. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |
| ०७. मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग, सदस्य | ०८. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या |

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य यांनी दूरध्वनीद्वारे कळविले होते.

तसेच मा.डॉ.मनिषा शामसुंदर कायंदे- सदस्या यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०९.०३.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस मी हजर राहणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहण्यास मला स्वारस्य नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर- सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०९.०३.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. या संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. मात्र मुख्यमंत्र्यांनी वचनपुर्ती केली नाही. मा.शिवसेना पक्षप्रमुख श्री.उध्वदजी ठाकरे यांना दिलेला शब्द पाळत नसल्याने आम्हाला बैठकीस हजर राहण्यास स्वारस्य नाही. याची कृपया नोंद घ्यावी, असे कळविले. याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **श्री साईबाबा समाधी शताब्दी आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांबाबत साईभक्त, शिर्डी ग्रामस्थ तसेच दि.११.१२.२०१६ रोजी संपन्न झालेल्या जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेमध्ये देश-विदेशातील साई मंदिरांच्या उपस्थित विश्वस्त/ पदाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या सुचना व अभिप्राय विचारात घेऊन, सदर कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४.**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय-**

१) श्री साईबाबा समाधी शताब्दीचे संपूर्ण वर्षभराचे कालावधीत संस्थानमार्फत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन आहे. या कार्यक्रमाचे नियोजन करणेपुर्वी सदर कार्यक्रमाचे स्वरुप काय असावे याबाबत भक्तांच्या कल्पना/ अभिप्राय मागविणेकामी जाहिरात-वजा-आवाहन जनसंपर्क विभागामार्फत स्थानिक तसेच देशाचे सर्व राजधानीचे तसेच मुंबई, पूणे, औरंगाबाद, नागपूर या ठिकाणाहून प्रसिध्द होणारे वर्तमानपत्रामध्ये मराठी, हिंदी व इग्रंजी भाषेमध्ये प्रसिध्दीस देणेस तसेच संस्थानचे वेबसाईटवर प्रसिध्द करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता घेणेकामी मा. त्रिसदस्य समितीचे दि.१८/०२/२०१५ रोजीचे सभेत मंदिर विभागाकडून प्रस्ताव सादर करणेत आला.

सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. ४७ अन्वये *“श्रींचे शताब्दी महोत्सव २०१७-१८ या महाउत्सवाचे कालावधीत साज-या करण्यात येणा-या कार्यक्रमाचे स्वरुप काय असावे, याबाबत भक्तांच्या कल्पना/ अभिप्राय मागविणे कामी या नियोजनाबाबतचा प्रस्तावित मजकुर संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा. तसेच सदरहु मजकूर संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द झालेपासून एक महिन्याचे मुदतीपर्यंत साईभक्तांच्या मार्गदर्शनपर सुचना स्विकारणेत याव्यात, असे ठरले.”*

२) श्री साईचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्ष भव्य स्वरुपात साजरे करण्यासाठी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नियोजनाचा कृती आराखडा तयार करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी इव्हेंन्ट मॅनेजमेंटसाठी श्री.नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि., मुंबई यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत व त्यासाठी सल्लागार नेमणुकीविषयी शासनाचे निर्देश अथवा मार्गदर्शक तत्वे यांचे पालन करुन याबाबत पुढील कार्यवाही करणेसाठी तसेच यासाठी येणारा खर्च हा “Major Financial Decision” या स्वरूपाचा असल्याने त्यासाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनीPIL NO.18/2011 मधिल CA NO. 12056/ 2012 मध्ये दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे दि.२१/१२/२०१५ रोजीचे सभेत मान्यतेस्तव सादर करणेत आला होता. त्यावर सदरहु सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्रं. ६५८ संमत करणेत आलेला आहे.

*“श्री साईचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्ष भव्य साजरे करण्यासाठी पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीने उपलब्ध करावयाच्या सोई सुविधा तसेच धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नियोजनाचा कृती आराखडा तयार करणे तसेच त्याची प्रभावी अंमलबजावणी करणेकामी इव्हेंट मॅनेजमेंटसाठी या क्षेत्रातील श्री नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि. मुंबई यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेस तत्वतः मान्यता देण्यात आली.त्यासाठी सल्लागार नेमणुकीविषयी शासनाचे निर्देश अथवा मार्गदर्शक तत्वे यांचे पालन करणेसाठी याकामी शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घेण्यात यावी. तसेच यासाठी येणारा खर्च हा “Major Financial Decision” या स्वरूपाचा असल्याने या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची पूर्व परवानगी घेणेत यावी असे ठरले.”*

३) दि.०९/१०/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजीत करण्यात येणा-या कार्यक्रमांबाबत देशातील व परदेशातील साई मंदिरांच्या पदाधिका-यांचे चर्चासत्र आयोजीत करणेबाबत निर्णय क्र.६८९ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

*“श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजीत करण्यात येणा-या कार्यक्रमांबाबत देशातील व परदेशातील साई मंदिरांच्या पदाधिका-यांचे चर्चासत्र आयोजीत करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास व त्यामध्ये उल्लेखीत संबंधीत विभागांनी तात्काळ कार्यवाही चालू करणेस मान्यता देण्यात यावी, तसेच देश-परदेशातील साई मंदिरांच्या पदाधिका-यांना शिर्डीची माहिती होणेकरीता सदरहू चर्चासत्र शिर्डी येथे आयोजीत करणेत यावे व या चर्चासत्रासाठी उपस्थित राहणाऱ्या पदाधिका-यांची निवास, भोजन, दर्शन/ आरती, वाहन व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.”*

**प्रस्तावना-** थोर संत श्रीसाईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. यासाठी संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल. या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे. सदर कार्यक्रमांचे स्वरूप व रुपरेषा ठरविणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे.

अ) **संस्थानचे संकेतस्थळावरुन साईभक्तांसाठी केलेले जाहीर आवाहन–**

मंदिर विभागाकडून शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन करणेपूर्वी या कार्यक्रमाचे स्वरुप काय असावे यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन साईभक्तांकडून अभिप्राय मागविणेकामी मा. त्रिसदस्य समितीचे दि.१८/०२/२०१५ रोजीचे सभेत मंदिर विभागाकडून प्रस्ताव सादर करणेत आला. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्तप्रमाणे निर्णय क्र.४७ संमत झालेला आहे. परंतु कुंभमेळा कक्षाची स्थापना झालेनंतर मंदिर विभागाने सदरचे जाहिरात वजा आवाहन पुढील कार्यवाहीसाठी इकडील विभागाकडे पाठविले. त्यानुसार इकडील विभागाचे दि.१६/१०/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीन्वये मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील आवाहन संस्थानचे www.sai.org.in या अधिकृत संकेतस्थळावरुन दि.०१/१२/२०१५ रोजी प्रसिध्द करुन श्रीसाईबाबा समाधी शताब्दी सोहळ्याचे स्वरुप कसे असावे याविषयी तसेच या कालावधीत आयोजित करावयाच्या कार्यक्रमांविषयी आपल्या काही कल्पना अथवा सूचना असतील तर त्या shatabdi@sai.org.in या संकेतस्थळावर दि.३१/१२/२०१५ अखेर कळविणेबाबत नमूद करणेत आले होते. सदर आवाहनास प्रतिसाद देऊन श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत करावयाचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजनाबाबत संस्थानचे संकेतस्थळावर २९ साईभक्तांचे अभिप्राय तर साईभक्तांचे पत्राद्वारे १४ साईभक्तांचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत. याबाबतची सविस्तर माहिती सोबतचे **परिशिष्ट "अ"** मध्ये नमूद केली आहे.

ब) **मा.राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्ष नेते, विधानसभा, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली शिर्डी ग्रामस्थ व शासकिय व निमशासकिय विभाग यांचे समवेत बैठक-**

शताब्दी महोत्सवानिमित्त शिर्डीत श्रींच्या दर्शनासाठी होणा-या संभाव्य गर्दीचे नियोजन व त्याबाबत उपलब्ध करावयाच्या सोई सुविधांचे नियोजनसंबधी प्रारुप कृती आराखडा तयार करणेसाठी संस्थानने टाटा कन्सल्टींग, इंजिनिअर्स यांची संस्थान सल्लागार म्हणून नेमणूक केलेली आहे. या सल्लागार समितीने तयार केलेल्या प्राथमिक सादरीकरणाचा आढावा घेणेसाठी दि.२५/०२/२०१६ रोजी मा. राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्ष नेते, विधानसभा, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली शिर्डी ग्रामस्थ व शासकिय व निमशासकिय विभाग यांचे समवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकित झालेल्या चर्चेनुसार शिर्डी ग्रामस्थांनी श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त शिर्डी व परिसरात करावयाच्या सोयी-सुविधांबाबत खालीलप्रमाणे सूचना वजा अभिप्राय संस्थानकडे सादर केलेले आहेत. याबाबतची सविस्तर माहिती सोबतचे **परिशिष्ट "अ"** मध्ये नमूद केली आहे.

क) **धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची रुपरेषा ठरविणेबाबत समन्वय विभागांची बैठक –**

शताब्दी वर्षाच्या कालावधीत संस्थानतर्फे आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सार्वजनिक कार्यक्रमांची निश्चित अशी रुपरेषा ठरविण्याची बाब संस्थानचे विचाराधीन असल्याने जा. नं. ५६६, दि.१७/०५/२०१६ अन्वये संस्थानचे समन्वयक विभागांनी संबधीत अधिका-यांशी एकत्रित बैठक व चर्चा करुन संपूर्ण वर्षभरात आयोजित करावयाच्या धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे स्वरूप व रुपरेषा कशा प्रकारे असावी याबाबतचा सविस्तर अहवाल प्रशासकिय अधिकारी यांचेमार्फत सादर करणेकामी जा. नं. ५६६,दि. १७/०५/२०१६ अन्वये कार्यालयीन आदेश पारीत करणेत आला होता. त्यानुसार संबंधीत समन्वय विभागांची दि.२४/०६/२०१६ रोजी लेंडीबाग सभागृहात बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीतील झालेले निर्णय पुढील कार्यवाहीसाठी इकडील विभागाकडे सादर केले होते. याबाबतची सविस्तर माहिती सोबतचे **परिशिष्ट "ब"** मध्ये नमूद केली आहे.

ड) **श्री. नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि.मुंबई यांची इव्हेंट मॅनेजमेंटसाठी सल्लागार म्हणून नियुक्ती-**

मा. व्यवस्थापन समितीने श्रीसाईचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्ष भव्य स्वरुपात साजरे करण्यासाठी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नियोजनाचा कृती आराखडा तयार करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी इव्हेंन्ट मॅनेजमेंटसाठी श्री. नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि.मुंबई यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेस तत्वतः मान्यता दिलेली आहे. त्यानुसार शताब्दी वर्षात महत्वाचे ७० दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे वार्षिक वेळापत्रक तयार करणेबाबत श्री.नितीन देसाई यांना सुचीत करणेत आले होते. याबाबत श्री नितिन देसाई यांनी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे ४० दिवसांचे दिवसागणिक वेळापत्रक कळविलेले आहे. याबाबतची सविस्तर माहिती सोबतचे **परिशिष्ट "क"** मध्ये नमूद केली आहे.

**<u>इ) दि .११/१२/२०१६ रोजी संपन्न झालेली जागतिक साई मंदिर विश्वस्त परिषद-</u>**

शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम-उपक्रम याबाबत देश-विदेशातील साई मंदिराचे विश्वस्त यांच्या सुचना वजा अभिप्राय प्राप्त करुन घेणेसाठी तसेच या साई मंदिरांच्या व्यवस्थापनांनी या शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम / उपक्रम याबाबत सविस्तर चर्चा करणेसाठी जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेचे शिर्डी येथे दि.११/१२/२०१६ रोजी संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास इमारतीचे प्रांगणात भव्य मंडप टाकून आयोजन करण्यात आलेले होते. जगभरातील साई मंदिरांच्या मौलीक सूचना विचारात घेता येतील व विचारांची देवघेव होईल आणि खऱ्या अर्थाने जगभरातील साईभक्तांना शताब्दी सोहळयात सामील केल्याचा आनंद होईल हा या चर्चासत्राचा मुख्य उद्देश होता. जागतिक साई मंदिर विश्वस्त परिषदेसाठी एकुण १२०९ साई मंदिरांनी विश्वस्त परिषदेत सहभागी होण्यासाठी नोंदणी केली होती. त्यापैकी एकुण १०९० साई मंदिरांनी परिषदेमध्ये प्रत्यक्ष सहभाग नोंदविला. सदर चर्चासत्रात प्रमुख अतिथी, संस्थान विश्वस्त व निमंत्रीत साईमंदिर विश्वस्त तसेच उपस्थित साईमंदिर विश्वस्तांमधून ८२ विश्वस्तांनी आपले सूचना वजा अभिप्राय तसेच साई मंदिर विश्वस्त परिषदेनंतर आजतागायत पोष्टाव्दारे प्राप्त पत्रांतील सूचना वजा अभिप्राय याबाबतची सविस्तर माहिती सोबतचे **परिशिष्ट "ड"** मध्ये नमूद केली आहे.

**प्रस्ताव-** उपरोक्त नमूद केलेप्रमाणे श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत करावयाचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजनाबाबत **<u>अ)</u>** संस्थानचे संकेतस्थळावरुन साईभक्तांनी सादर केलेले अभिप्राय तसेच मा. राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्ष नेते, विधानसभा, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली शिर्डी ग्रामस्थ व शासकिय व निमशासकिय विभाग यांचे बैठकीतील अभिप्राय **<u>ब)</u>** धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची रुपरेषा ठरविणेबाबत संस्थानचे समन्वय विभागांचे बैठकीतील अभिप्राय **<u>क)</u>** श्री. नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि.मुंबई यांनी सुचविलेले वेळापत्रक **<u>ड)</u>** दि . ११/१२/२०१६ रोजी संपन्न झालेल्या जागतिक साई मंदिर विश्वस्त परिषदेतील प्रमुख अतिथी, संस्थान अध्यक्ष, उपाध्यक्ष व विश्वस्तांनी दिलेल्या मौलिक सूचना तसेच उपस्थित साईमंदिर विश्वस्तांमधून ८२ विश्वस्तांनी दिलेले सूचना वजा प्रस्ताव व परिषदेनंतर पोस्टाद्वारे प्राप्त झालेल्या सूचना-वजा-अभिप्राय यामधील प्रमुख मुद्दयांचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

**A) <u>धार्मिक कार्यक्रम-</u>**

१) साईचरित्राचे महापारायण आयोजित करणे.

२) साईचरीत्राचे मराठी भाषेतील पारायणाबरोबरच इतर भाषीक पारायणाचे आयोजन करणे.

३) श्रीसाईचरीत्रामध्ये उल्लेख असलेले सर्व धार्मिक ग्रंथांचे पारायण करणे उदा. एकनाथी भागवत, गुरुचरीत्र, ज्ञानेश्वरी

४) श्रींचे गुरुस्थान मंदिरामध्ये दैनंदिन रुद्राभिषेक आयोजित करुन यामध्ये वेदशास्त्र संपन्न ब्राह्मणवृंद यांना निमंत्रीत करुन त्यांचेकडून ४० दिवस लघुरुद्राभिषेक पूजा करणे.

५) शताब्दीचे शेवटचे ४० दिवस श्रीसाईनामाचा अखंड जप तसेच श्रीविष्णुसहस्त्र नामावलीचे सामुदायीक पठण करणे.

६) श्रीरामचरीत मानस व श्रीमद् भागवत या ग्रंथांचे सत्संग सप्ताह आयोजित करणे.

७) शताब्दीचे वर्षामध्ये प्रत्येक गुरुवारी तसेच एकादशी व चतुर्थीचे दिवशी साईनाथ स्तवन मंजरीचे सामुदायीक पठण करणे.

८) शताब्दी वर्षात संस्थानने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम, भजनसंध्या तथा रथयात्रेचे आयोजन करावे.

९) जगभरातील ठराविक साई मंदिरांची निवड करुन दरवर्षी श्रींच्यापादुका दर्शनांचे नियोजन करणे.

१०) श्री ज्ञानेश्वर महाराज, श्रीस्वामी समर्थ, श्रीसाईबाबा, श्रीएकनाथ महाराज, श्रीतुकाराम महाराज या थोर संताच्या शिकवणुकीविषयी शताब्दी वर्षात मंथन करता येईल. त्यासाठी कीर्तन व प्रवचन कार्यक्रम आयोजीत करणे.

११) शताब्दी महोत्सवाचे कालावधीत शिर्डी येथे यज्ञ-याग व धार्मिक कार्यक्रम उपासनी महाराज संस्थान, साकुरी येथील कन्यांमार्फत करण्याचा त्यांचा मानस आहे. तसेच वेदशास्त्र संपन्न ब्राम्हणवृंद यांना निमंत्रीत करुन पंचकुंडात्मक साईयाग व धार्मिक कार्यक्रम अयोजीत करणे.

१२) शताब्दी वर्षात साई अनुभवाच्या साईलिलामृत कथेचे संगितासह आयोजन करावे.

१३) विशेष पुजा करण्यासाठी भारतभरातील साई मंदिरांत साई पादुका पाठवाव्यात.

१४) सर्व साईभक्तांसाठी संयुक्तीक (common) यज्ञाचे आयोजन करावे.

१५) मंदिरात रोज ग्रंथ पारायण असावे.

१६) शिर्डीमध्ये एक वर्षासाठी सर्व भाषांमध्ये अहोरात्र नामस्मरण तसेच साईचरित्र पारायण करता येईल.

१७) 'हरीकथा' च्या रुपाने साईबाबांनी त्यांच्या हयातीत व समाधीनंतर केलेल्या लिलांचे सर्व भाषांत कथन करावे.

१८) वर्षभर नाम सप्ताहाचे आयोजन करुन इच्छुकांना संधी द्यावी.

१९) अखंड साईनाम जप आयोजित करावा, भक्तांनी साई सहस्र नामावली जप करावा.

२०) साईज्योती प्रज्वलन वर्षभर करावे.

२१) भगवद्गीतेचे पारायण करावे.

२२) वर्षभरातील कार्यक्रम तसेच नैमित्तिक कार्यक्रमांचे अहवालासाठी सामाजिक माध्यमांचा वापर करावा.

२३) प्रत्येक राज्याला त्यांचे परंपरा व संस्कृतीनुसार शताब्दी महोत्सवाचे संकल्पनेविषयी प्रोत्साहीत करावे.

२४) 'सबका मालिक एक' या उक्तीप्रमाणे सर्व धर्मांच्या देवतांचे पूजन साईबाबांच्या पूजनाबरोबर करावे.

२५) खंडोबा मंदिरापासून पालखीची सुरुवात करावी.

२६) प्रत्येक राज्यात साईबाबांच्या पादुका समाधी दिवसापर्यंत दर्शनासाठी पाठवाव्यात.

२७) साईस्तवनमंजरीचे सर्व भाषांमध्येवर्षभर पारायण करावे.

२८) ऑलिम्पीक्सप्रमाणे "साई ज्योत" भारतभर नेऊन शिर्डीमध्ये पुन्हा ती १८ दिवसांच्या कार्यक्रमांच्या वेळेत प्रज्वलीत करावी.

२९) श्रीसाईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने होणारे सांस्कृतिक कार्यक्रम हे वर्षभरातील उत्सव, स्थानिक उत्सवाचे दिवस तसेच गुरुवार, चतुर्थी, एकादशी वगळून ठेवण्यात यावे. सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमाचे कमीत कमी ७० दिवस आयोजन करावे.

३०) वर्षभर विविध भाषेतील पारायणाचे संस्थानने आयोजन करावे. यामध्ये मराठी, हिंदी, तेलगू, कन्नड, गुजराथी यांचा समावेश असावा व संख्येबाबत जागतिक रेकॉर्ड होईल याबाबत नियोजन करावे.

३१) श्रीसत्यनारायण पुजेसाठी बसणारे भक्त यांचे प्रमाण वाढविण्यात यावे. सन २०१८ मध्ये अधिकमास असल्याने एका बॅचसाठी ५०० साईभक्त बसतील याबाबत नियोजन असावे.

३२) परदेशी साईभक्तांचे ग्रुप यांना साईभजन, साईबाबांचे जीवन कार्य, लिला इ. बाबत कार्यक्रम करणेसाठी बोलवावे.

३३) श्रीसाईबाबा समाधी शताब्दी कालावधीत उत्सव काळात वेगवेगळया दिवशी संत महंत, मान्यवर इ. चे कार्यक्रम, प्रवचन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

३४) श्रीसाईबाबा समाधी शताब्दी कालावधीत हिंदी साई कथांचे आयोजन करण्यात यावे.

३५) शताब्दी निमित्त अखंड साईनाम, हरीनाम सप्ताहाचे आयोजन करणे यामध्ये नामांकित असे राष्ट्रीय भागवतकार यांचे भागवत कथेचे आयोजन करावे. पुण्यतिथी निमित्त भागवत कथा ऐकवली जावी.

३६) श्रीसाईबाबांना साईभक्तांनी गुरु मानले आहे. शताब्दी वर्षात ज्या ठिकाणी साईभजन, पादुका दर्शन कार्यक्रम होईल त्या ठिकाणी भक्तांचे हातावर कडे घालून गरुदिक्षा द्यावी. तसेच त्या ठिकाणी ध्यानधारणा, नामजप, होमहवण आदि व्यवस्था करावी.

३७) देशाभरातून चारी दिशांनी साईरथ शिर्डीला येतील. साईरथा बरोबर पायी चालणारे पदयात्री शिर्डीला येतील.

३८) श्रीसाईबाबांचे आध्यात्मिक व ईश्वरीय चिंतनावर आधारीत कार्यक्रमाचे नियोजन करावे.

३९) शताब्दी वर्षात संस्थानने मुंबई –पुणे यासारख्या मोठया शहराच्या ठिकाणी सर्वधर्मसमभाव परिषद आयोजित करावी.

४०) श्रीसाईबाबांच्या पुण्यतिथीला महायज्ञाचे आयोजन करण्यात यावे. या महायज्ञासाठी साकोराच्या कन्या तसेच वेदपारंगत ब्रह्मवृंद व्यक्तींना बोलावण्यात यावे.

४१) शताब्दी वर्षात महाअभिषेक, महापारायण यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन भारतातल्या मोठया शहरांमध्ये करण्यात यावे.

४२) श्रीसाईबाबांनी विजयादशमीच्या दिवशी ०२.३५ ला देह ठेवला ती वेळ साधून त्यावेळेच्या अगोदर ८ ते १० मिनिंट प्रार्थनेच आयोजन करण्यात यावे. केली जाणारी प्रार्थना आणि ती करण्याची वेळ जगभरातल्या साईमंदिरात एकच असावी अणि या प्रार्थनेनंतर दोन मिनिटं स्तब्धता पाळून साईपरमात्म्याच्या चरणी लीन व्हावे.

४३) शताब्दी वर्षात नामवंत कीर्तनकारांच्या कीर्तनमहोत्सवाचे व नामवंत कथाकार आणि प्रवचनकार यांचे श्रीसाईसच्चरित्र, तुलसी रामायण, श्रीमद्भागवत व ज्ञानेश्वरी या ग्रंथावर आधारित सप्ताहांचे नियोजन करता येईल.

४४) दीपोत्सव करण्याचे नियोजन करणे. तसेच दिवाळीचे वेळी साईसच्चरित्राचे ओवीनुसार विशेष दीपमहोत्सव करणे.

४५) शताब्दी सोहळयाच्या माध्यमातून साईंच्या पादूका देशातील प्रमुख महानगरांमध्ये भाविकांना दर्शनासाठी उपलब्ध करुन देणे.

४६) शताब्दी वर्षात देशातील सर्व साई मंदिरांमध्ये तसेच शिर्डी येथे अखंड श्रीसाई सच्चरित पारायणाचे आयोजन करणे.

४७) श्रीसाईबाबा समाधी शताब्दीचा संदेश भारतभर पोहचविण्यासाठी जिल्हा, राज्यातून स्वतंत्र रथ यात्रेचे आयोजन करावे.

४८) श्रीसाईबाबांचे जीवनकार्य व शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करणे.

४९) 'साईतत्त्वाचा' प्रचार करण्यासाठी संस्थानने अनेक शहरांमधून सांस्कृतिक व भक्तीमय कार्यक्रमांचे आयोजन करावे.

**B) <u>सांस्कृतिक कार्यक्रम-</u>**

१) श्रीसाईबाबांचे चरित्रावर आधारित चित्रपट, संगीत, नृत्य व नाटक महोत्सव सादर करता येईल.

२) शताब्दीचे ४० दिवस श्रींचे मुळ पादुका व सटका साईभक्तांचे दर्शनासाठी पूर्णवेळ ठेवण्याचे नियोजन करणे. तसेच सोने व चांदीचे शिक्के तयार करुन ते विक्रीसाठी ठेवणे.

३) शताब्दी वर्षात मंदिरात वर्षभर फुलांची सजावट करणे तसेच पारायणाचेआयोजन करणे.

४) सर्व भाषांमध्ये उत्तम कलाकारांद्वारे नृत्य, नाटक, साईभजनसंध्या तसेच संगिताचे कार्यक्रम घेण्यात यावेत.

५) भारतीय संस्कृती, धार्मिक व अध्यात्मिक विकासावर आधारीत कार्यक्रमांची निर्मिती करणे.

६) देश विदेशातील साई मंदिरात भजन संध्या, क्रिडाप्रकार, पारंपारीक नृत्याचे कार्यक्रम आयोजीत करणे.

७) मुलांसाठी व तरुणांसाठी भारतभर आपल्या संस्कृतिचे जतनासाठी कार्यक्रमांचे आयोजन करणे.

८) शताब्दी वर्षात विविध बहुभाषिक भक्तांसाठी त्यांचे भाषेतून धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करावे.

**C) <u>सामाजिक कार्यक्रम-</u>**

१) साईबाबा समाधी सोहळयाची भारतातील सर्व TV चॅनलद्वारे जाहीरात करण्यात यावी.

२) डिजिटलायझेशनच्या माध्यमातून साईभक्तांचे शिर्डीत प्रवेश होताच त्यांचे मोबाईलवर एसएमएस व्दारे स्वागत करण्याची यंत्रणा विकसीत करणे.

३) देश-विदेशातील साई मंदिरांनी दर गुरुवारी अन्नदानाचा कार्यक्रम हाती घ्यावा

४) शताब्दी वर्षात गोर-गरीबांना अन्नदान करावे.

५) योगसाधना तसेच रक्तदान, नेत्रदान, अवयवदान शिबीराचे आयोजन करणे.

६) जनसेवेसाठी देशभरातील साई मंदिरांमार्फत शताब्दी कालावधीत ठळक सुचीबध्द असे सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करावे.

७) शताब्दी वर्षात अनेक राज्यातील सांस्कृतिक कार्यक्रमाच्या संचालकांना कार्यक्रम सादर करण्यासाठी संस्थानने निमंत्रण द्यावे.

८) मोठ्या स्तरावर कुस्त्यांचे आयोजन करावे.

९) गरजू लोकांसाठी सामुहिक विवाह, होम-पुजा तसेच रक्तदान शिबीरांचे आयोजित करावे.

१०) अन्न संकलित करुन गरजूंपर्यंत पोहचवावे.

११) संस्थान आनंदधाम तसेच गो-शाळा चालवू शकते.

१२) श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षात जागतिक पातळीवरील मॅरेथॉन स्पर्धांचे आयोजन करावे.

१३) श्रीसाईबाबा समाधी शताब्दी कालावधीत श्रीसाई प्रसादालयात मोफत प्रसादभोजन देण्यात यावे. यासाठी भक्तांकडून देणगी घेण्यात यावी. ज्या कालावधीत देणगी मिळाली नाही त्या तारखांना संस्थानमार्फत मोफत प्रसाद भोजन व्यवस्था संस्थानने करावी.

१) जगातील सर्व स्तरातील संतांनी जाती धर्माच्या पलिकडे जाऊन भक्तांचे विचारांचे शुध्दीकरण करणे आवश्यक आहे.

## D) वैद्यकीय सुविधा -

१) भारतभर मोफत आरोग्य शिबीरे तसेच मंदिर परिसरात रक्तदान शिबीरांचे आयोजन करावे.

२) रक्तदान शिबिरे, नेत्रदान, अवयवदान आदी वैद्यकीय कॅम्प आदींचे आयोजन करणे.

## E) शैक्षणिक सुविधा-

१) भारतातील सर्व शाळा महाविद्यालयांमधून बाबांचे मौलीक विचार शिकविणे आवश्यक आहे.

२) विदयार्थ्यांना बाबांच्या शिकवणूकीतील मूल्ये शिकवून मार्गदर्शन करावे.

३) क्षेत्रनिहाय निबंध, वादविवाद, चित्रकला तसेच नाट्यस्पर्धांचे आयोजन करावे.

४) श्रीसाईबाबांच्या शिकवणूकीनुसार बालकांचे शिक्षणासाठी प्रोत्साहन द्यावे.

५) साईचरित्रावर आधारीत प्रश्नमंजुषा (quiz) चे आयोजन करावे.

६) साईंच्या कथांवर आधारीत चित्रकला स्पर्धा तसेच साईचरित्रावर आधारीत शास्त्रीय, सांस्कृतिक, नाटय सादरीकरण करावे.

## F) प्रशासकिय बाबी-

१) संस्थानने साईचरित्र अनेक भाषामध्ये भाषांतर करून भक्तांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

२) बाबांच्या जीवनावर आधारित काही मालिका काढता येतील.

३) शताब्दी वर्ष हे कन्या स्वागत वर्ष म्हणून साजरे करावे.

४) संस्थानने हाती घेतलेल्या कार्यक्रमांविषयी माहिती मिळणेसाठी ॲप तयार करण्यात येऊन, त्यास "साईविश्व ॲप" असे नांव दयावे.

५) सर्व साईभक्तांच्या समन्वयासाठी एक मंच असावा. सर्वांनी एकमेकांशी संवाद साधून परस्पर सुसंवाद चालू ठेवावा.

६) 'सबका मालिक एक' हा वैश्विक मंत्र व श्रध्दा सबुरीचा संदेश या दोन गोष्टींवर आपल्याला काम करता येईल

७) भक्तांच्या सोयी-सुविधांसाठी जे कार्य करावयाचे आहे ते अधिक सुलभतेने होण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे करणे.

८) बाबांप्रती संशोधन कार्य सुरु करावे व एक भव्य असे वाचनालय असावे.

९) संस्थान कर्मचा-यांची भक्तांप्रती वागणूक आदरयुक्त असावी. भक्तांप्रती सकारात्मक भाव ठेवावा. कुंभमेळ्यासारखे आयोजन साईमेळा म्हणून करावे.

१०) दि.१५ ऑक्टोबर रोजी सर्वांनी सुट्टी घेऊन विशेष दिन म्हणून साजरा करावा.

११) दर्शन रांगेची व्यवस्थित देखभाल करावी व दर्शन रांगेत मुबलक प्रमाणात पाण्याची व्यवस्था असावी.

१२) स्वयंसेवकांना रोटेशन पध्दतीने शिर्डी येथे सेवा करण्याची संधी द्यावी.

१३) Centenary Leelas नांवाने विशेष मासिक प्रकाशित करावे.

१४) शताब्दी कॅलेन्डर प्रकाशित करावे.

१५) शताब्दी वर्षासाठी सर्व राजकीय नेते उदा. मा.पंतप्रधान, मा.मुख्यमंत्री इ. यांना निमंत्रीत करावे

१६) मुख्य रस्त्यावर आकर्षक द्वारांची उभारणी करुन ठिकठिकाणी माहितीचे फलक लावावे.

१७) शताब्दी वर्षभर रंगीत दिव्यांनी साई मंदिर प्रकाशमान करावे.

१८) प्रत्येक गुरुवारी व पौर्णिमेस दीपोत्सवाचे आयोजन करावे.
१९) शिर्डीमध्ये चौकशी काऊंटर्सची तसेच ऊदी आणि प्रसाद काऊंटर्सची संख्या वाढवावी.
२०) दिव्यांग तसेच हृदयविकार रुग्णांसाठी विशेष दर्शन रांगेची व्यवस्था करावी.
२१) दर तीन वर्षातून एकदा साई संम्मेलनाचे आयोजन करावे.
२२) प्रत्येक साई मंदिरांसाठी क्षेत्रनिहाय एक विशेष कोड देऊन दरमहा मासिक पाठविण्याची व्यवस्था करावी.
२३) शताब्दी वर्ष साजरे करण्यानिमित्त घेण्यात येणा-या कार्यक्रमांसाठी साई मंदिरांच्या विश्वस्तांना बैठकीसाठी निमंत्रीत करावे.
२४) इंटरनेट सुविधेचा वापर करुन सर्व साई मंदिरांमध्येसमन्वय साधावा.
२५) संस्थानद्वारे आयोजित करण्यात येणा-या कार्यक्रमांची माहिती भक्तांना मिळण्यासाठी एक मध्यवर्ती माहिती केंद्र असावे.
२६) शताब्दी वर्षात अविरत साईभजनांचे आयोजन करावे.
२७) दर्शनासाठी बायोमेट्रीक प्रणाली सुरु करावी.
२८) दुरुन येणा-या साईभक्तांच्या निवासाची सुलभ व्यवस्था होण्यासाठी अजून एखादे साई आश्रम बांधावे अथवा स्थानिक हॉटेल्सशी करार करावा.
२९) साई आश्रमकडे येण्यासाठी जादा बसेस सुरु कराव्यात.
३०) मोबाईल व पादत्राणे ठेवण्याचे काऊंटर्स वाढवावेत.
३१) संस्थान कर्मचा-यांनी साईभक्तांशी सभ्यतेने व अध्यात्मिकतेने वागावे.
३२) सर्व साई मंदिराचे नियंत्रण संस्थानकडे असावे. सर्व साई मंदिरे एकमेकांशी ऑनलाईन पध्दतीने जोडली जावीत.
३३) श्रीसाईबाबांविषयीचे साहित्याचे एक छोटे ग्रंथालय असावे. श्री साईबाबांचे नावाने नाणी सुरु करावीत.
३४) कार्यक्रमांसाठी तेलुगू भाषांतरकाराची व्यवस्था करावी.
३५) प्रत्येक गुरुवारी सत्सगांचे आयोजन करावे.
३६) मंदिर परिसरात स्वागत कक्षांमध्ये सर्व भाषा येणा-या कर्मचा-यांचे गठन करावे.
३७) संस्थानमध्ये गरीब-श्रीमंत हा भेदभाव न ठेवता सर्वांना समान दर्शन मिळावे.
३८) सर्व भाषांमध्ये प्रवचन असावे व प्रत्येक वक्त्याला त्यात एक तास बोलण्याची संधी मिळावी. यासाठी त्या वक्त्याने आपल्या भाषेची निवड करुन संस्थानकडे नोंदणी करावी. तसेच संस्थानने वक्त्यांची निवास व जेवणाची व्यवस्था करावी.
३९) साईलीला मासिकाचे अनेक भाषांमध्ये प्रकाशन करावे.
४०) संस्थानने सर्व रेल्वे स्थानकांवर पोहचण्यासाठी सर्वांना नाममात्र शुल्क आकारुन बससेवा पुरवावी.
४१) पिण्याच्या पाण्याची सुत्रबध्द व पुरक व्यवस्था असावी.
४२) मानवतेच्या दृष्टीकोणातून गरजूंची देखभाल करावी.
४३) दर्शनरांग इमारतीतील तसेच मंदिर परिसरातील प्रसाधनगृहांची संख्या पर्याप्त नसून असलेली व्यवस्था अत्यंत वाईट आहे.
४४) शताब्दी महोत्सवी वर्ष साजरे करतांना तसेच कार्यक्रम आयोजीत करतांना येणा-या अडचणींचे निराकरण करण्यासाठी एक वेगळया विभागाची निर्मिती करावी.
४५) शताब्दी काळात तात्पुरत्या निवासव्यवस्था निर्माण कराव्यात.
४६) प्रसार माध्यमातून अनेक जाहीरातींद्वारे शताब्दी महोत्सव साजरे करणेबाबत भक्तांना माहिती द्यावी.
४७) शताब्दीनिमित्त कार्यक्रमांची यादी संस्थानच्या सर्व अधिकृत वेबसाईटवर प्रसिध्द करावी.
४८) अर्थासह श्रीसाईचरित्र पारायण व सगुणोपासना निर्माण करावी. ध्यान धारणेचे कार्यक्रमाचे आयोजन करावे.
४९) आरतीच्या वेळेस साईभक्तांना खाली बसविल्यास जास्त प्रमाणावर साईभक्तांना आरतीमध्ये समाविष्ट करता येऊ शकेल. यामुळे गर्दीचे नियंत्रण परिणामकारकरित्या करता येईल.
५०) भक्तांसाठी तात्पुरत्या स्वरुपाची मंडपव्यवस्था करावी.
५१) शताब्दी महोत्सवात सहभागी होण्यासाठी प्रत्येक साई मंदिरांना संधी मिळावी.
५२) सर्व सुरक्षारक्षकांनी साईभक्तांना आदरयुक्त वागणूक द्यावी.

५३) श्रीसाईबाबांचे टपाल तिकीट व श्रीसाईबाबांची प्रतिमा असलेले चलनी नाणे छापण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर करणे.

५४) श्रीसाईबाबांचे चमत्कार व भक्तांना आलेले अनुभव लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी संस्थानने भक्तांसाठी वेबसाईटवर एक वेगळी लिंक तयार करावी.

५५) मोठया प्रमाणावर खाद्य तसेच नागरी पुरवठयाच्या वस्तू पुरवाव्यात.

५६) गर्दीचे निरीक्षण करण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यात यावी.

५७) भक्तांना महत्वाच्या सुचना देण्यासाठी वाहतूक नियंत्रक पोलिसांनी इलेक्ट्रॉनिक साईन बोर्ड चा वापर करावा.

५८) शेवटचे सात दिवसांसाठी समाधी मंदिर दर्शनासाठी खुले असावे

५९) पादत्राणे ठेवण्याच्या जागेची चोख व्यवस्था करावी.

६०) अधिक प्रमाणावर स्टीकर्स तसेच कॅलेंडर छपाई करण्यात यावी.

६१) शिर्डीत येणा-या भक्तांसाठी माहिती काऊंटर्स उभे करावेत.

६२) सर्व महत्वाच्या शहरांमध्ये साई सेवा केंद्र सुरु करुन सत्संगाचे आयोजन करावे.

६३) संस्थान परिसर अधिक स्वच्छ आणि शांत असावा.

६४) श्री साईबाबा समाधी शताब्दीसाठी स्वतंत्र लोगो तयार करावा लागणार आहे त्याचे नियोजन करावे.

६५) उत्सव काळात होणारे कार्यक्रम जसे निशाण मिरवणूक, द्वारकामाईतील गहू पोते इतर धार्मिक कार्यक्रम पार पडत असतांना त्यांचे प्रतिकात्मक कार्यक्रम, देखावे साईभक्तांसाठी दाखविण्यात यावे.

६६) कोजागिरी पौर्णिमा साजरी करतांना त्याचे स्वरुप मोठया प्रमाणात करावे.

६७) श्रीसाईबाबा समाधी शताब्दी कालावधीत साई चरित्रातील प्रसंगाचे देखावे तयार करावे.

६८) श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने विविध राज्यातून चलचित्र, रथयात्रा येतील याबाबत नियोजन करावे.

६९) श्रीसाईबाबा समाधी कार्यक्रमाचे चॅनेलवर थेट प्रसारण होणेबाबत नियोजन व्हावे.

७०) श्रीसाईबाबा समाधी शताब्दी कालावधीत स्वयंसेवकांची आवश्यकता भासणार असल्याने स्वयंसेवक घेणेबाबत नियोजन करावे.

७१) श्रीसाईबाबा समाधी शताब्दी कालावधीत नामांकीत सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करतांना वर्तमानपत्रात/संस्थानचे संकेतस्थळावर आवाहन करावे.

७२) संस्थानने प्रकाशनांव्दारे अथवा फिल्मस्, ऑडीओ, व्हीडीओ, व्हाटसअॅप, इंटरनेट, वेबसाईट व इतर सोशल नेटवर्कींग साईटच्या माध्यमातून बाबांच्या शिकवणूकीचा प्रचार व प्रसार करणे.

७३) शताब्दी वर्षासाठी साई सेवकांना मोठया प्रमाणावर प्रशिक्षीत करावे.

## G) <u>विकासकामे</u>

### अ) दीर्घमुदतीची कामे

१) शिर्डी शहाराकडे येणा-या प्रमुख रस्त्यांवर चारही दिशेला स्वागत कमानी उभारणे.

२) धार्मिक, अध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी बहुउद्देशिय सभागृहाची व ध्यान मंदिराची निर्मिती करणे.

३) श्रीसाईबाबांचे नूतन वस्तू संग्रहालय व माहिती संग्रहालय उभारणे.

४) श्रीसाई शताब्दी स्मारक उभारणे.

५) समाधी मंदीर परिसरापासून ते श्रीसाईप्रसादालया पर्यंत स्कॉयवॉक उभारणे.

६) पालखी पदयात्रीसाठी निवाराशेड बांधकाम करणे.

७) शिर्डी विकास आराखड्यामधील रस्ते, पार्किंग, बगीचे, व इतर आरक्षणे विकसीत करणे.

८) शिर्डी शहरात भक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सुरक्षा यंत्रणा उभारणे.

९) संपूर्ण शहारात आवश्यक तेथे प्रसाधनगृहे उभारणे.

१०) साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी दिशादर्शक व सूचना फलक लावणे तसेच शिर्डी शहरांत एलईडी पथ दिवे बसविणे.

११) शताब्दी सोहळयाचे संपूर्ण डिजिटलायजेशन करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे.

१२) दिल्लीच्या आंतरराष्ट्रीय एअरपोर्टच्या धर्तीवर श्रीसाईमंदिरात एस्केलेटरची निर्मिती करणे.

१३) जागतिक पातळीवरील पर्यटकांना आकर्षित करणेसाठी शिर्डीत डिस्नेलॅंड प्रकल्प शिर्डीत सुरु करणे.

१४) शिर्डीत भक्तांसाठी व परिसराला शेतीसाठी निळवंडे धरणाचे पाणी प्राधान्याने उपलब्ध करावे.

१५) शताब्दी वर्षात शिर्डी शहर मॉडर्न सिटी करुन पूर्ण विश्वात शिर्डी बदलल्याचा संदेश गेला पाहिजे. याकरीता शेगांवच्या धर्तीवर आनंद सागर सारखे प्रोजेक्ट उभारले गेले पाहिजे.

१६) शिर्डीस येणा-या प्रत्येक राष्ट्रीय व रेल्वे मार्गाचे तसेच विद्युतीकरणाचे कामे करुन भक्तांचा प्रवास सुखकर होणे आवश्यक आहे.

१७) संस्थानने निळवंडे धरणातून स्वनिधीने पाईपलाईन करुन कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटवावा.

१८) शिर्डी विकासाच्या दृष्टीकोनातून तसेच येणा-या साईभक्तांना पर्यटनाच्या दृष्टीकोनातून लेझर शो, बगीचा, विमानतळ आदी सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

१९) महाराष्ट्र सरकारकडून परिवहन व्यवस्थापन व रस्त्यांची देखभाल, दुरूस्ती होणे गरजेचे आहे.

२०) रेल्वे स्टेशन व विमानतळाकडे जाण्यासाठी दर्जेदार रस्ता असावा.

२१) गरीब घरातील कन्यांचे विवाह पार पाडण्यासाठी शिर्डीमध्ये मंगल कार्यालये उभी करावीत.

२२) शिर्डीला येणा-या सर्व रस्त्यांचे सुशोभिकरण, डांबरीकरण इ. व्यवस्था करावी.

२३) भक्तांच्या गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी फुट ब्रीज, प्रवेश मार्ग, नवीन रस्ते, आपातकालीन मार्ग निर्माण करावेत.

२४) साई मंदिर परिसरातील अतिक्रमण दूर करुन साई मंदिर परिसर अतिक्रमणमुक्त करुन तेथील लहान दुकानांचे पुनर्वसन करावे.

२५) शेगांवच्या धर्तीवर एका अशा दर्शन रांगेची व्यवस्था करावी की ज्याद्वारे साईभक्त एकदा रांगेत प्रवेश केल्यावर त्याचरांगेतून पुढे तो द्वारकामाई, गुरुस्थान इ. ठिकाणी दर्शनासाठी वेगळ्या दर्शन रांगेत उभा न राहता जाऊ शकेल.

२६) शिर्डी येथील विमानतळ लवकरात लवकर कार्यान्वियत करणेबाबत पावले उचलावीत.

२७) शिर्डीतून भारतातल्या निरनिराळया ठिकाणी रेल्वे सुरु करावी.

२८) दर्शन रांगेत योग्यरित्या वायुवीजन व आपत्कालीन दरवाजांची व्यवस्था करावी.

२९) पंढरपूर, आळंदी, पैठण या ठिकाणी वारकरी प्रशिक्षण शाळा सुरु आहेत त्यापध्दतीने संस्थानमार्फत वारकरी प्रशिक्षण शाळा चालविणे आवश्यक आहे.

३०) श्रींचे शंभराव्या पुण्यतिथी निमित्त महत्वाच्या चौकात वारकरी पूतळा उभारणे.

३१) सर्व साई मंदिरामध्ये इंटरनेट माध्यमाद्वारे समन्वय असावा. शिर्डी स्वच्छ व सुंदर असावी. सोलर प्रकल्प हाती घेण्यात यावे.

३२) अध्यात्मिक शिक्षणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करणे.

३३) पर्यावरणाचे परीरक्षणासाठी प्रचार-प्रसार करणे.

३४) निवडक गावांना कुपनलिकेचे वाटप करणे.

३५) शिर्डीला ध्वनी, वायु, धुळ इ. चे प्रदुषणापासुन मुक्त करण्यासाठी वृक्षारोपण करावे.यामध्ये औषधी वनस्पती लागवड करावी.

३६) संस्थान वृध्दाश्रम बांधू शकते.

३७) धार्मिक महत्व असलेल्या वनस्पतींची लागवड व देखभाल सर्व साई मंदिरांच्यापरिसरात करावी.

३८) साई मंदिर विश्वस्त परिषदेच्या माध्यमातून एक मंच उभा करून जगभरातील साईमंदिराच्या सर्व विश्वस्तांना या मंचाशी जोडून एक लिंक तयार करुन अशा लिंकद्वारे कार्यक्रमांचे माहितीचे आदान-प्रदान केले पाहिजे.

३९) देश-विदेशातील साई मंदिरातील आंतरराष्ट्रीय वेळेनुसार आरतीच्या वेळा ठरवून, एकाच वेळेस या आरत्या सुरू झाल्या पाहिजेत, त्यासाठी सार्वत्रिक नियमावली तयार करावी.

४०) साईबाबांच्या जीवनावर आधारित व समकालीन लोकांवर माहितीपट प्रसारीत केले पाहिजे.

४१) केरळमध्ये साईबाबांच्या कार्याची आधिक प्रमाणात माहिती होण्याच्या दृष्टीकोनातून मल्याळी वाहिन्यांवर जास्तीत जास्त कार्यक्रम प्रसारीत करावेत तसेच शताब्दी वर्षात शिर्डीत एकदा केरळी पध्दतीचे अन्नदान करावे.

४२) बाबांसाठी एक खास दुरचित्रवाहीनी सुरु करणे आवश्यक आहे. तसेच शताब्दी निमित्ताने एक भव्य मुर्ती उभारणे आवश्यक आहे. गरीब वसाहत उपक्रमांचा केंद्रबिंदू होऊ शकतो. परदेशी भक्तांसाठी एक मदत कक्ष किंवा संपर्क कक्ष निर्माण करु शकतो. त्यासाठी एक वेबसाईट तयार करुन आपले विचारांचे आदान-प्रदान करु शकतो.

४३) श्रीसाईबाबांचा संशोधनात्मक अभ्यास करण्यासाठी संशोधन केंद्र स्थापन करावे व वेळोवेळी अध्यात्मिक शिबिरे आयोजीत करावीत.

४४) शिर्डीत जागतिक मानकाप्रमाणे बदल करावेत.

४५) चांगल्या लेखकांकरवी दर्जेदार साई साहित्याची निर्मिती पुस्तक तसेच दृक-श्राव्य स्वरुपात करावी.

४६) आस्था, एसव्हीबीसी चॅनेलप्रमाणे श्रीसाईबाबांना समर्पित टी.व्ही. चॅनेल सुरु करुन त्याद्वारे श्री साईबाबांचे कार्य, शिकवणूक तसेच संस्थानमध्ये साजरे केले जाणारे उत्सव-समारंभ, पुजा-अर्चा, दैनंदिन कार्यक्रम प्रसारीत करावेत.

४७) शताब्दीनिमित्त विशेष रेल्वे, बसेस इ. दळणवळणाच्या साधनांच्या संख्येत वाढ करावी.

४८) कोपरगांव ते शिर्डी मोफत बससेवा सुरु करावी.

४९) जगभरातील साईभक्तांसाठी टी.व्ही. चॅनेल सुरु करावा.

५०) कॅन्सर हास्पीटल सुरु करावे.

५१) साईनगर शिर्डी रेल्वे स्थानकापासून अनेक ठिकाणी जाण्यासाठी रेल्वेंची संख्या वाढवावी.

५२) विमानतळ प्राधिकरणाने प्रत्येक राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी पोहचण्यासाठी उड्डाणांची व्यवस्था करावी.

**ब) धोरणात्मक बाबी**

१) मंदिरात दर्शनासाठी चार दर्शनरांगा बनविलेल्या आहेत. या दर्शनरांगामुळे भकतांना खुप असहनियता होते व्यवस्थित दर्शन होत नाही. याबाबत नियोजन व्हावे.

२) टाईम दर्शनासाठी दोन राज्यांचा मिळून एक हॉल बनवावा. ज्यामुळे कमी गर्दी होईल.

३) शताब्दी वर्षात भक्तांसाठी मोफत अन्नप्रसाद व निवासव्यवस्था करावी.

४) शताब्दी वर्षासाठी दर्शन व पारायणासाठी द्वारकामाई मंदिर २४ तास उघडे असावे.

५) साईचरित्रातील ६ व्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे पादुकांची स्थापना गुरुस्थानसमोर पुर्वीप्रमाणेच करावी.

६) भारतातील निरनिराळया ठिकाणी उभारण्यात येणा-या नविन साई मंदिरासाठी बाबांची मुर्ती व फोटो देणगी स्वरुपात उपलब्ध करुन द्यावेत.

७) श्रीसाईबाबांचा संदेश रुग्णसेवा व गरीबांसाठी जेवण याप्रमाणे संस्थानमार्फत शताब्दी वर्षाचे ४० दिवस संस्थानचे रुग्णालयातील सर्व शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करणे.

८) श्रीसाईप्रसादालयामध्ये संपूर्ण वर्षभर साईभक्तांसाठी मोफत भोजनाची सुविधा निर्माण करणे.

९) महिला व दिव्यांग व्यक्तीसाठी काही उपक्रम हाती घ्यावे.

१०) देशातील साई मंदिरांना भजन साहित्य पुरवावे.

११) दुष्काळ, पूर इ. सारख्या नैसर्गिक आपत्तीचेवेळी महाराष्ट्रातील शेतक-यांना मदत करावी.

१२) महाराष्ट्रातील शेतक-यांसाठी विमा संरक्षण सुरु करावे.

१३) संस्थानने महिला सशक्तिकरणासाठी ठोस कार्यक्रम राबवावेत.

१४) संस्थानने स्वच्छ भारत अभियानासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा.

१५) मागास लोकांसाठी कपडे, लोकरीचे कपडे पुरवावेत.

१६) सर्व नेत्यांचे देशभक्तीपर कार्यक्रम साजरे करावे.

१७) अनेक उपक्रमांसाठी आपले आयुष्यवाहून घेणा-या लोकांना सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

१८) प्रशिक्षीत शिक्षकांद्वारे चालविले जाणारे ' बाल विहार ' सुरु करावेत. या बाल विहारांमध्ये साईबाबांची भजन व किर्तने मुलांना शिकविता येतील.

१९) प्राण्यांना मोठया प्रमाणावर अन्नदान करण्यासाठी सर्व साई मंदिरांतून व्यवस्था करावी.

२०) प्राण्यांना संरक्षण देऊन त्यांच्या औषधोपचाराची व्यवस्था करावी. उदा. गाय

२१) संस्थानने भारतातील १०० गांवांची निवड करुन मोफत पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, मोफत शिक्षण द्यावे.

२२) लहान मुलांसाठी कार्टून सिडीच्यामाध्यमातून बाबांच्या चमत्काराची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२३) गरीब विद्यार्थ्यांसाठी मेडीकल कॉलेज काढल्यास भविष्यात हेच विद्यार्थी गरिबांची सेवा चांगल्याप्रकारे करतील.

२४) लहान मुलांसाठी उपक्रम हाती घ्यावेत. अंधासाठी योजना आख्याव्यात. थंडीमध्ये ब्लॅकेट व अन्नवाटप करावे. व्यसनाधीन मुलासाठी व्यसन मुक्ती केंद्रे सुरू करावे. भक्तांना उदी व प्रसाद सहज उपलब्ध होईल, याची व्यवस्था करावी. शताब्दी वर्षात सर्व ठिकाणी चालणा-या उपक्रमांची माहिती सर्व मंदिरांना कळविण्यात यावी.

२५) अव्वल दर्जाचे, उच्च पातळीवरील विविध अभ्यासक्रम असलेले विद्यापीठाचे नियोजन करावे.

२६) गरीबांसाठी शिक्षण, मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल तसेच मुक्त विद्यापीठाची व्यवस्था करावी

२७) गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही जाती-धर्माच्या अटीविना विनाशुल्क मोफत वैद्यकिय महाविद्यालय आणि अभियांत्रिकी महाविद्यालय संस्थान सुरु करु शकेल.

२८) बालवाडी ते विद्यापीठ स्तरांपर्यंतचे शिक्षण मोफत द्यावे. भारतातील प्रत्येक राज्यात दर्जेदार शिक्षण देण्यासाठी निवासी श्रीसाईबाबा शताब्दी महाविद्यालय सुरु करावेत.

२९) देशभरातील अनाथ आश्रम, नेत्रहीन आश्रम, वृध्दाश्रम आदींना आर्थिक सहाय्य करणे.

३०) भारतातील गरीब भागातील लोकांसाठी दवाखाने सुरु करावेत. सदर ठिकाणी पंधरवाडा अथवा महिन्यातून वैद्यकीय शिबिरे घ्यावीत.

३१) देश –विदेशातील साई मंदिरे सुचीबध्द करुन सदर मंदिरांमधून साईबाबांच्या कार्याचा संदेशाचा प्रचार प्रसार करणे.

३२) साईमंदिरातील कर्मचा-यांना गरुकुलप्रमाणे वेदाचे प्रशिक्षण द्यावे.

३३) शेगांव देवस्थानच्या धर्तीवर प्राणी, पक्षी तसेच निसर्गसंवर्धनाविषयीचे नविन कार्यक्रम सुरु करावेत.

३४) भारतातील वेगवेगळया साई मंदिरांसाठी पुजारी प्रशिक्षणाचे आयोजन करावे.

३५) मंदिर परिसर व निवासस्थानांच्या ठिकाणी दिव्यांग व वयोवृध्दासांठी बॅटरीवर चालणा-या गाडयांची व्यवस्था करण्यात यावी.

३६) व्ही.आय.पी. पास रद्द करुन सर्व भक्तांना दर्शन केवळ रांगेतूनच मिळावे.

३७) साईलिला मासिकाचे तेलुगू भाषेत प्रकाशन करावे. तसेच तेलुगू भाषेतील साईचरित्राची पुरेशा प्रमाणात छपाई करावी.

३८) काकड आरतीचे वेळी व्ही.आय.पी. पास देणे बंद करावे. जेणेकरुन दर्शन रांगेतील साईभक्तांना आरतीचा लाभ घेता येईल.

३९) देणगीदार साई भक्तांसाठी तिरुपती देवस्थानच्या धर्तीवर विशेष सवलती उपलब्ध करुन द्याव्यात.

४०) प्रादेशिक भाषांमध्ये साईबाबांच्या जीवनावरील ॲनिमेशन केलेल्या सीडीज तयार कराव्यात.

४१) साई कवी संम्मेलन, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, संगीत महोत्सव, साईचे जीवनचरीत्रावर आधारीत चित्रपट / सिरीयल, रेडीओवर " साई की बात " कार्यक्रमाचे आयोजन करावे.

**टीपः- तथापि, उपरोक्त नमूद बहूतांश धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचा समावेश शताब्दी वर्षातील कार्यक्रमाचे वार्षिक वेळापत्रकात करण्यात येत आहे.**

तरी श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्ष भव्य स्वरुपात साजरे करण्याचे दृष्टीकोनातून धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे स्वरुप कसे असावे याबाबत साई मंदिर विश्वस्त परिषदेमध्ये देश-विदेशातील साई मंदिरांच्या उपस्थित विश्वस्त/ पदाधिकारी, यांचेकडून प्राप्त झालेल्या सुचना व अभिप्राय तसेच यापुर्वी संस्थानचे संकेतस्थळ, पोष्टव्दारे साईभक्तांकडून व शिर्डी ग्रामस्थ यांचेकडून वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या सुचना व अभिप्राय विचारात घेऊन सदर कार्यक्रमांचे स्वरुप व रुपरेषा ठरविणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे एक दिवसीय आयोजित विशेष सभेत सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१७१** **श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्ष भव्य स्वरुपात साजरा करण्याचे दृष्टीकोनातून धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे स्वरुप कसे असावे याबाबत साई मंदिर विश्वस्त परिषदेमध्ये देश-विदेशातील साई मंदिरांच्या उपस्थित विश्वस्त/ पदाधिकारी, यांचेकडून प्राप्त झालेल्या सुचना व अभिप्राय तसेच यापुर्वी संस्थानचे संकेतस्थळ, पोष्टव्दारे साईभक्तांकडून व शिर्डी ग्रामस्थ यांचेकडून प्राप्त झालेल्या सुचना/ अभिप्राय विचारात घेऊन सदर कार्यक्रमांचे स्वरुप, रुपरेषा ठरविणेबाबतच्या**

**उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन करणेत आले. तसेच संस्थानचे शताब्दी कक्षामार्फत तयार करणेत आलेल्या सादरीकरण पाहून, खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली.**

**श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते ३१ ऑक्टोबर, २०१८ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणाऱ्या भव्यस्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे. याकरीता सदरहूकामी विश्वस्तांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. तसेच श्रींचे समाधीला ५० व ७५ वर्षे पुर्ण झाल्यानंतर कशा प्रकारे तो महोत्सव साजरा करण्यात आला होता, त्याचाही संदर्भ घेण्यात यावा व त्यावेळेसचे काही अधिकारी आजही कोठे असतील त्यांची याकामी मदत घेण्यात यावी.**

**समितीने असेही सुचविले की, रामदेव बाबा, मोरारी बापू, वामनराव पै यासारख्या दिग्गजांचा प्रत्येक महिन्यामध्ये एक आठवडा कार्यक्रम ठेवण्यात यावा व इतर दिवशी छोटे कार्यक्रम आयोजित करणेत यावे. यामध्ये जागतिक दिन जसे की, जागतिक स्वच्छता दिन, जागतिक रक्तदान दिन, जागतिक नेत्रदान दिन, जागतिक वाचन दिन याचबरोबर जागतिक अवयव दान दिन अशा दिवशीही मोठे कार्यक्रम आयोजित करणेत यावे. बाबांच्या स्तवनमंजिरीला दि१३ सप्टेंबर, २०१७ रोजी १०० वर्ष पुर्ण होत आहे, हा कार्यक्रमही जागतिक स्तरावर आयोजित करणेत यावा. यासाठी देश-विदेशातील साई मंदिरांचे सहाकार्य घेण्यात यावे त्याना कार्यक्रमांची माहिती देण्यात यावी. तसेच श्रींच्या पादुका जवळपास १०० ठिकाणी दर्शनासाठी पाठविण्यात याव्यात व देशभरातून येणारा बाबांचा रथ प्रत्येक८ ते १० दिवसाचे अंतराने शिर्डी येथे येईल, असे नियोजन करणेत यावे. ज्या-ज्या राज्यातून रथ येणार आहे, त्या-त्या राज्यांच्या मा.मुख्यमंत्री महोदयांना याबाबत लेखी स्वरुपात कळविणेत यावे**

**समाधी शताब्दी महोत्सवामध्ये जास्तीत जास्त शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांवर भर देण्यात यावा. संपुर्ण महोत्सवामधील कार्यक्रम श्रींचे संबंधीत असावेत. दुसऱ्या साधु-संताचे कार्यक्रम यामध्ये ठेवू नयेत. अशा प्रकारे सर्वसमावेशक प्रस्ताव समितीसमोर फेरसादर करणेत यावा.**

**याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, विवेकानंद हॉस्पिटल, नागपुर यांनी कॅन्सर रुग्णांसाठी कमी खर्चामध्ये सुसज्ज हॉस्पिटलची उभारणी केलेली आहे, त्यांच्या मार्गदर्शनानुसार श्रींच्या समाधी शताब्दी वर्षा निमित्ताने शिर्डी येथे कॅन्सर पिडीत रुग्णांसाठी श्री साईबाबा शताब्दी कॅन्सर हॉस्पिटलची उभारणी करणेचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. तसेच नामांकित कला, नेपथ्यकार श्री.नितिन देसाई यांनी बाबांच्या जीवनावर आधारीत साईसेवा नामक मालिका तयार केलेली आहे, त्यांचेशी संपर्क साधून या मालिकेला श्री साईबाबा संस्थानचे नाव लावता येईल का, याचाही प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०२** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्ष सन २०१७-१८ चे निमित्ताने देशभरात व जगभरात श्रींचे जीवन, कार्य व शिकवण याचा प्रचार व प्रसार करणेसाठी आवश्यक बाबींवर निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (२) (ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

४. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

५. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड)श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावना-** श्रीसाईबाबा यांच्या समाधीस २०१८ मध्ये १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत ०१ ऑक्टोबर, २०१७ ते १९ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) या कालावधीत शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्ष साजरे करण्याचे प्रस्तावित आहे. शिर्डी येथील श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी देश-विदेशातून येणा-या भाविकांचा ओघ दिवसेंदिवस वाढत असून, शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्षामध्ये लाखो साईभक्त शिर्डीस भेट देण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने सदर भाविकांसाठी शिर्डी शहर व परिसरामध्ये विविध पायाभूत सुविधा उभारणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/प्र.क्र.०१/का.१६, दि. २२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली अंतिम कृती आराखडा तयार करण्यासाठी समिती गठीत केलेली आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे तसेच शताब्दी वर्ष हे साई भक्तांसाठी एखाद्या महापर्वणी समान असल्यामुळे सदर काळात भाविकांसाठी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करणे आवश्यक आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने प्रयत्न करणेत येत आहे. याबाबत साईभक्तांच्या सूचना-वजा-अभिप्राय जाणून घेणेसाठी संस्थानचे संकेतस्थळावरुन साईभक्तांना आवाहन करणेत आले होते. तसेच याबाबत शिर्डी ग्रामस्थांच्याही सूचना वजा अभिप्राय मागविणेत आले होते. या प्राप्त झालेल्या सर्व सूचना-वजा-अभिप्राय विचारात घेऊन सदर कार्यक्रमाची रूपरेषा कशा प्रकारे असावी याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करणेबाबत जा.क्रं.एसएसएसटी/बांधकाम-शताब्दी/ ५६६/ २०१६, दि.१७/०५/२०१६ अन्वये संबधीत समन्वय विभाग व संबंधीत अधिकारी यांना आदेशीत करणेत आले होते. याकामी संबंधीत अधिका-यांशी चर्चा करून, धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे स्वरूप व रुपरेषा ठरविणेकामी मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दि.२६/०७/२०१६ रोजी सांयकाळी ०५.०० वाजता संस्थानचे साईनिवास अतिथीगृह येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे स्थानिक उपसमितीचे दि.१६ सप्टेंबर, २०१६ रोजीचे सभेतील विषय नं.०२(२५), निर्णय क्र.६८९ अन्वये सन २०१७-१८ या समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनाबाबत देश-विदेशातील साई मंदिराचे अधिकारी/ पदाधिकारी यांच्या सूचना-वजा-प्रस्ताव प्राप्त करून घेणेसाठी शिर्डी येथे दि.११/१२/२०१६ रोजी जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद आयोजित करणेबाबत निर्णय घेण्यात आला होता व त्याप्रमाणे जागतिक साई मंदिर विश्वस्त/ पदाधिकारी यांची परिषद शिर्डी येथे संपन्न झालेली आहे.

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षात संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करणे, जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीकोनातून शताब्दी वर्षातील कार्यक्रमाची सर्वसाधारण रुपरेषा कशा प्रकारची असावी तसेच सदर कार्यक्रमांसाठी अंदाजपत्रकीय तरतूद निश्चित करणेसाठी खालील नमूद बाबींवर धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

१. समाधी शताब्दी निमित्ताने शिर्डीत आयोजीत करावयाच्या कार्यक्रमांची निश्चिती करणे.

(याबाबत निश्चित करावयाच्या कार्यक्रमांची प्रारुप स्वरुपाची यादी सोबतचे **परिशिष्ट "अ"** मध्ये नमूद केली आहे.)

२. समाधी शताब्दी निमित्ताने श्रींचे पादुका दर्शन व साईभजन संध्या कार्यक्रमाबाबत-

अ) देशातील इतर राज्यांचे **राजधानीचे** ठिकाणी व साईभक्तांची आधिकाधिक संख्या असणा-या देशातील तसेच विदेशातील निवडक शहरांमध्ये श्रींचे पादुका दर्शनाचा सोहळा व साई भजनसंध्या कार्यक्रम आयोजीत करणेबाबत विचार विनिमय करणे.

(याबाबतची विस्तृत माहिती सोबतचे **परिशिष्ट "ब"** मध्ये अ.नं. -०१ ते ०५ मध्ये नमूद केली आहे.)

**परिशिष्ट "ब" मधिल अ. नं.-**१- देशातील राज्यांच्या राजधानीचे शहरे तसेच आधिकाधिक साईभक्त असणा-या निवडक शहरांची यादी

**परिशिष्ट "ब"- मधिल अ. नं.-२ -** श्रींचे पादुका दर्शन व साईभजन संध्या कार्यक्रमाचे वार्षिक वेळापत्रक

**परिशिष्ट "ब" मधिल अ. नं.-३ -** श्रींचे पादुका दर्शन व साईभजन संध्या कार्यक्रमाचे दीडदिवसीय वेळापत्रक.

**परिशिष्ट "ब" मधिल अ. नं.-४ -** बाहेरील राज्यातील स्थानिक आयोजकांनी कार्यक्रमाचे ठिकाणी करावयाची व्यवस्था

**परिशिष्ट "ब" मधिल अ. नं.-५ -** कायर्क्रमासाठी संस्थानचे आवश्यक मनुष्यबळ

ब) साईभक्तांना दर्शनासाठी न्यावयाची मुर्ती, फोटो व पादुका कोणत्या असाव्यात याबाबतची निश्चिती करणे.

३. समाधी शताब्दी वर्षाची स्मरणिका/कॉफी टेबल बुक प्रसिध्द करणेबाबत. (याबाबतची माहिती सोबतचे **परिशिष्ट "क"** मध्ये नमूद केली आहे.)

४. समाधी शताब्दी निमित्त चांदीचे/ सोन्याचे लॉकेटस् व नाणी विक्रीसाठी उपलब्ध ठेवणेबाबत. सोबत सादर केलेल्या नमुन्यांमधून एक नमुना अंतिम करणे.

५. समाधी शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांचा माहितीपट (Documentary) तयार करणेबाबत.

६. समाधी शताब्दी निमित्ताने मंदिरात गायल्या जाणा-या आरत्यांचे (ऑडीओ / व्हिडीओ) पेनड्राईव्ह विक्रीसाठी उपलब्ध करणे.

७. समाधी शताब्दी वर्षानिमित्त राज्य व केंद्र शासनाच्या शालेय अभ्यासक्रमात श्रीसाईबाबांच्या पाठाचा अंतर्भाव करुन श्रीसाईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार व प्रसार होण्यासाठी संबंधीतांकडे तातडीने पाठपुरावा करणेसाठी निर्णय घेणे.

८. अन्य संतांच्या धर्तीवर श्रीसाईबाबांची शिकवण, तत्वज्ञान व कार्य आदींचा पुणे व मुंबई विद्यापीठात संशोधनासाठी समावेश होण्यासाठी श्री साईबाबा अध्यासन सुरु होणेसंदर्भात संबंधीतांकडे पाठपुरावा करणेबाबत.

९. श्रीसाईबाबांच्या समकालिन भक्तांच्या वंशजांकडे असणाऱ्या श्रीसाईबाबांनी हाताळलेल्या वस्तूंच्या दर्शनाचा लाभ सर्वांना व्हावा यासाठी त्या वस्तू संस्थानकडे सुपूर्द करण्याचे त्यांना आवाहन करणेबाबत.

१०. श्रीसाईबाबांचे समकालिन भक्तांचे वंशजांचे स्नेहसंमेलन आयोजीत करुन त्यांचा सत्कार करणेबाबत.

११. समाधी शताब्दीच्या निमित्ताने संस्थानचे पुरातत्व विभागाची निर्मिती करणे.

१२. संस्थान प्रकाशित साईलीला मासिकाचे लेखक-कवी यांचे संमेलन आयोजीत करणेबाबत.

१३. समाधी शताब्दीच्या निमित्ताने वर्षात सर्व मंदिरांमध्येफुलांची आकर्षक सजावट करणेबाबत.

१४. समाधी शताब्दी वर्षात मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करणेबाबत.

१५. समाधी शताब्दी वर्षाचे मोबाईल ॲप तयार करणेबाबत.

१६. समाधी शताब्दी वर्षाचे निमित्ताने शताब्दी वर्षाच्या कालावधीत श्रीसाईबाबांच्या जीवनावर वर्तमानपत्रात लेखमाला सुरु करणेबाबत.

१७. समाधी शताब्दी वर्षाचे निमित्ताने संस्थानमार्फत आयोजीत करावयाच्या कार्यक्रमांची प्रसिध्दी करणेबाबत.

१८. समाधी शताब्दी वर्षाच्या निमित्ताने संस्थानचे माजी अध्यक्ष व विश्वस्त यांचा सत्कार करणेबाबत.

१९. समाधी शताब्दी वर्षाच्या निमित्ताने संस्थानचे माजी कर्मचा-यांचा सत्कार करणेबाबत.

२०. समाधी शताब्दीच्या समारोपाच्या कार्यक्रमास मा. पंतप्रधान, भारत सरकार यांना निमंत्रित करणेबाबत.

२१. समाधी शताब्दीच्या निमित्ताने श्री साईबाबांचे टपाल तिकीट काढणेबाबत संबंधीतांकडे पाठपुरावा करणे.

२२. संत वांङःमयाचे ग्रंथालय उभारणेबाबत व शक्य झाल्यास संशोधन केंद्र सुरु करणेबाबत.

२३. श्रीसाईबाबांच्या जीवनकार्यावर साऊंड ॲण्ड लाईट शो ची निर्मिती करणेबाबत.

२४. संस्थानचे मा.अध्यक्ष व मा. विश्वस्त यांनी केलेल्या सुचनांबाबत.

२५. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने भजनसंध्या व इतर सांस्कृतिक कार्यक्रम करण्यासाठी संधी मिळणेविषयी साईभक्तांनी केलेली विनंतीपत्रे. (याबाबतची माहिती सोबतचे **परिशिष्ट "ड"** मध्ये नमूद केली आहे.)

तरी श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करणेबाबत तसेच शताब्दी वर्षाचे निमित्ताने देशभरात व जगभरात श्रींचे जीवन, कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांचे प्रचार प्रसारासाठी उपरोक्त नमूद बाबींविषयी धोरणात्मक निर्णय

होणेकामी मा.व्यवस्थापन समितीची एकदिवसीय विशेष सभा आयोजित करुन सदर सभेत उपरोक्त नमूद बाबींविषयी विचार विनिमय होणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.१७२** **सदरहू प्रस्तावावर निर्णय क्र.१७१ अन्वये चर्चा झालेली आहे.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं०.३** **संस्थान निवासस्थांसाठी एकत्रित लाण्ड्री युनिट संदर्भात.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम- २००४ मधील तरतूद:-** अ.नं २१.(१), (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत पुढील प्रमाणे निर्णय क्र.७८५ संमत झालेला आहे, "संस्थानच्या सर्व विभागांसाठी एकत्रित लॉण्ड्री युनिट तयार करणेसाठी सर्व समावेशक प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, त्यामध्ये संस्थानमार्फत प्रस्तावित कपडे धुणेसाठी किती खर्च येईल व आऊटसोर्स पध्दतीने किती खर्च येईल, याबाबतच्या तुलनात्मक तक्त्याचा समावेश करणेत यावा. तसेच श्री क्षेत्र शेगाव येथील लॉन्ड्रीच्या कार्यपद्धतीविषयी माहीती घेण्यात यावी, असे ठरले."

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा संस्थानची व्याप्ती दिवसेंदिवस वाढणारी आहे, त्याचबरोबर 'श्रीं' चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत असल्याने त्यांची उत्तम निवासव्यवस्था होणेकामी व साईभक्तांना जास्तीत जास्त सेवा-सुविधा उपलब्ध करुन देणे हे संस्थानचे उद्दिष्ट असल्याने साईभक्तांच्या दैनंदिन वापरावयाच्या वस्तु जसे, बेडशीट, चादर, टॉवेल, पडदे, रग, सतरंजी, नॅपकीन, पीलोकव्हर इत्यादी कपडे निटनेटके व स्वच्छ असणे गरजेचे आहे व त्यामुळे संस्थानच्या नाव लौकिकात भर पडण्यास मदत होईल यासाठी...

संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) या ठिकाणी संस्थान मार्फत लॉन्ड्री युनिट कार्यान्वीत असुन, त्या ठिकाणी व्दारावती, साईप्रसाद निवासस्थान व साईबाबा भक्तनिवासस्थान व इतर विभागामधील कपडे धुण्याचे काम करण्यात येत आहे.

तसेच साईआश्रम भक्तनिवास येथील निवासी इमारतीमधील चादर, बेडशीट, उशीकव्हर, टॉवेल धुणे/ इस्त्री करणे व निवासी साईभक्तांचे कपडे त्यांचेकडुन शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करुन देणे तसेच साईधर्मशाळा निवासस्थान येथील कपडे लॉण्ड्री कॉन्ट्रॅक्टर यांचेकडुन आऊटसोर्स पध्दतीने धुवून घेतले जातात.

**मागणी:-** मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार संस्थानच्या सर्व विभागांसाठी एकत्रित लॉण्ड्री युनिट तयार करणेसाठी संस्थानचे साईबाबा भक्तनिवास येथील लॉण्ड्रीमध्ये धुणेत येत असलेले कपडे व त्याकरीता दरमहा होत असलेला खर्च व आऊटसोर्स पद्धतीने कपडे धुणेसाठी येणारा दरमहा खर्च याबाबतचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.न | तपशील | धुवून झालेले कपडे संख्या | संस्थान मार्फत प्रती नगासाठीचे दर | **संस्थान मार्फत** लॉण्ड्रीसाठी झालेला एकुण खर्च रु | आऊटसोर्स मार्फत धुतल्यास संख्या | आऊटसोर्स मार्फत प्रती नगासाठीचे दर | **आऊटसोर्स मार्फत** लॉण्ड्रीसाठी झालेला खर्च रु |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बेडशीट | २२,२१९ | ०६.५९ | १,४६,४२३.२१ | २२,२१९ | ०३.४२ | ७५,९८८.९८ |
| २ | उशीकव्हर | १४,८२० | ०३.२९ | ४८,७५७.८ | १४,८२० | ०२.०१ | ३१,१२२ |
| ३ | टॉवेल | २,५६२ | ०६.२४ | १,५९८६.८८ | २,५६२ | ०२.५८ | ६,६०९.९६ |
| ४ | चादर | २७ | ०३.२४ | ८७.४८ | २७ | ०७.९८ | २१५.४६ |
| | | ३९,६२८ | एकुण रु | **२,११,२५५.३७** | ३९,६२८ | एकुण रु | **१,१३,९३६.४** |

संस्थान मार्फत चालविण्यात येत असलेल्या साईबाबा भक्तनिवास विभागाकडील लॉण्ड्रीकामी एक महीन्यामध्ये एकुण ३९,६२८ नग कपडे धुणेसाठी एकुण रु २,११,२५५.३७/- पुर्णांकित **रु २,११,२५५/-** इतका खर्च येतो.

तसेच उपरोक्त कपडे आऊसोर्स पद्धतीने धुतल्यास ३९,६२८ नग कपडे धुणेसाठी एकुण रु १,१३,९३६.४/- पुर्णांकित रु १,१३,९३६/- इतका खर्च येईल. दि.०१/०२/२०१७ रोजीचे क्षेत्रभेट अहवालानुसार प्रशासकीय अधिकारी (निवासस्थाने) व मॅकेनिकल विभाग प्रतिनिधी यांचे सोबत, श्री गजानन महाराज देवस्थान, शेगाव येथे समक्ष जाऊन त्यांच्याकडे कार्यान्वीत असलेल्या लॉन्ड्रीच्या कार्यपध्दतीची माहिती घेतली असता, सदर देवस्थानकडे कार्यान्वीत असलेल्या लॉन्ड्रीचा परिसर सुमारे दिड ते दोन एकर क्षेत्राचा असुन, त्याच्या तिनही बाजुने वॉल कंपाऊंड केलेले आहे. समोरील बाजुस प्रशस्त प्रसादालय इमारत आहे. सदरचे दोन एकर जागेत

साधारणतः १०,००० स्क्वे.फुट एवढया आकाराचे साईडने पक्या भिंती असलेले व वरील बाजुस फॉल सेलींग असलेल्या शेडची उभारणी केलेली आहे व उर्वरीत जागा धुतलेले सफेद कपडे सुकविण्यासाठी मोकळी ठेवलेली आहे. तसेच रंगीत कपडे हे सावलीमध्ये सुकविले जातात.

सदरच्या लॉन्ड्रीसाठी उभारण्यात आलेल्या इमारतीमध्ये कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने कार्यालय, स्टोअर, मशिनरी रुम धुतलेले कपडे ठेवण्यासाठी रॅक असलेले रुम, रंगीत कपडे सुकविण्यासाठी हॉल, अशी स्वतंत्र खोल्यांची व्यवस्था आहे. (सोबत शेगाव भेटीसंदर्भातील अहवाल अवलोकनार्थ सादर.)

**विभागाचे मत/अभिप्रायः-** उपरोक्त खर्चाचा तुलनात्मक अभ्यास करता संस्थानमार्फत ३९,६२८ नग कपडे धुणेसाठी रु.२,११,२५५/- इतका खर्च येत असुन तेच कपडे आऊटसोर्स पद्धतीने धुतल्यास रु.१,१३,९३६/- इतका खर्च येईल. सदर आकडेवारीचा विचार करता आऊटसोर्स मार्फत कपडे धुणेसाठी येणा-या खर्चात रु.९७,३१९/- इतकी तफावत जाणवते. त्याचबरोबर संस्थान मार्फत संस्थानच्या सर्व विभागांसाठी एकत्रित लॉण्ड्री युनिट तयार करणेसाठी संस्थानला श्री गजानन महाराज देवस्थान, शेगाव यांच्या प्रमाणे प्रशस्त जागा, मशिनरी, कर्मचारी, वाहतुक, विद्युत, लागणारे केमिकल, तसेच लॉन्ड्रीकामाचा अनुभव असलेले त्या क्षेत्रातील लॉण्ड्री समन्वयक यांची नेमणुक करावी लागेल इत्यादी गोष्टीची आवश्यकता आहे, असे नम्र मत आहे.

करीता उपरोक्त प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.१७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निवासस्थांनांमधील चादर, बेडशीट, उशीकव्हर, टॉवेल धुणे/ इस्त्री करणे व इतर अनुशंगीक कामे आऊटसोर्स पध्दतीने येणारा खर्च व संस्थानमार्फत सदरहू कामे करणेसाठी येणारा खर्च यामधील तफावत तसेच प्रस्तवामधील विभागाचा अभिप्राय याचा विचार करता, संस्थान निवासस्थांनांमधील चादर, बेडशीट, उशीकव्हर, टॉवेल धुणे/ इस्त्री करणे व इतर अनुशंगीक कामे आऊटसोर्स पध्दतीनेकरुन घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं०.४** **श्री साई मंदिरात गायल्या जाणाऱ्या आरत्या व मंत्रोपचार पठणाचे पेनड्राईव्ह साईभक्तांना उपलब्ध करुन देणे बाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम १७. नं. 'ठ' मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविकः-** सन-२००३ पासून श्री साई मंदिरात गायल्या जाणा-या आरत्या व मंत्रोपचार पठणाचे संस्थानकडे सीडी व डिव्हीडी स्वरुपात उपलब्ध करुन साईभक्तांच्या सेवेसाठी उपलब्ध करुन दिल्या जातात.

**प्रस्तावः-** मा. विश्वस्त महोदय श्री.जयकर सो. यांनी श्री साई मंदिरात गायल्या जाणा-या आरत्या व मंत्रोपचार पठणाचे पेनड्राईव्ह साईभक्तांना श्री साई समाधी शताब्दी निमीत्त उपलब्ध करुन देणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

उक्त निर्देशाप्रमाणे श्री साई मंदिरात गायल्या जाणा-या आरत्या व मंत्रोपचार पठणाचे पेनड्राईव्ह निर्मीती प्रस्ताव करिता, सध्या संस्थानकडील सीडी डिव्हीडी मधील डाटा पेनड्राईव्हमध्ये तयार करुन घ्यावयाचे झालेस, त्यासाठी 8 GB व 16 GB क्षमतेचे पेनड्राईव्हमध्ये डाटा तयार करुन घेता येईल. सध्या बाजारात उपल्बध असलेल्या दरानुसार एकूण ५०० नग पेनड्राईव्ह खरेदी करता येतील. त्यास खालील प्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | आरती निर्मीती | Gega Bite | निर्मीती संख्या | अंदाजे निर्मीती दर | एकूण अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पेनड्राईव्ह | 8 GB | २५० | ५००/- | १,२५,०००/- |
| ०२ | पेनड्राईव्ह | 16 GB | २५० | ६००/- | १,५०,०००/- |
| | | | | **एकूण रुपये.** | **२,७५,०००/-** |

(अक्षरी रुपये. दोन लाख पंचाहत्तर हजार मात्र.)

**मागणीः-** श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवानिमीत्त श्री साई मंदिरात गायल्या जाणा-या आरत्या व मंत्रोपचार पठणाचे पेनड्राईव्ह श्री साईभक्तांना उपलब्ध करुन देता येतील, परंतू पेनड्राईव्हची किंमत सीडी डिव्हीडीचे १० पटीने जास्त असल्याने वरील तक्त्यात दर्शविले प्रमाणे सुरुवातीस ५०० नग पेनड्राईव्ह तयार

करुन भक्तांच्या सेवेत उपलब्ध करुन देता येतील, त्यास भक्तांकडून मिळणा-या प्रतिसादानुसार पेनड्राईव्ह तयार करणेकामी पुढील निर्णय घेता येईल.

**संस्थानचे अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** उपरोक्त संस्थान अधिनियमानुसार आरतीचे पेनड्राईव्ह साईभक्तांना उपलब्ध करुन दिलेस बाबांचा प्रचार प्रसार होणार आहे. आर्थिकदृष्टया पेनड्राईव्ह निर्मीतीकामी रुपये. २,७५,०००/- खर्च येणार आहे परंतू साईभक्तांना आपण ना नफा ना तोटा या पध्दतीने उपलब्ध करुन दिलेस होणार खर्च भरुन निघेल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** सध्या प्रायोगिक तत्वावर श्री साई मंदिरात गायल्या जाणा-या आरत्या व मंत्रोपचार पठणाचे ५०० नग पेनड्राईव्ह निर्मीतीकामी येणा-या अंदाजे रुपये.२,७५,०००/- (अक्षरी रुपये. दोन लाख पंचाहत्तर हजार) मात्रचे खर्चास मान्यता तसेच निर्मीती कंपनी अथवा पुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागविणे व निम्नतम दरधारकांना कार्यादेश पारित करणेकामी सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अधिनियमातील तरतूदीनुसार श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करणेसाठी प्रायोगिक तत्तवावर श्री साई मंदिरात गायल्या जाणाऱ्या आरत्या व मंत्रोपचार पठणाचे पेनड्राईव्ह साईभक्तांना उपलब्ध करुन देणेकामी विहित पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०५** **प्रत्येक गुरुवारी साईभक्तांना श्रींची पालखी पाहण्यासाठी बसण्याची व्यवस्था करणेकामी चटई किंवा तत्सम वस्तु खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेत या विभागामार्फत काथ्याचे मॅटीन खरेदी करणेबाबतचा विषय सादर करण्यात आला त्यावर निर्णय क्र. ९२४ ने काथ्याचे मॅटीन खरेदी करणेस मान्यता देण्यात आली त्यावेळी प्रत्येक गुरुवारी श्रींची पालखी बघण्यासाठी चावडी व व्दारकामाई समोर मोठ्या प्रमाणावर साईभक्त जमिनीवर बसलेले दिसून येतात त्यांची पालखी पाहण्यासाठी बसण्याची व्यवस्था चटई किंवा तत्सम वस्तु खरेदी करणेचा प्रस्ताव सभेसमोर सादर करावा असे ठरले. त्यास अनुसरून सदर ठिकाणी किती स्के. फुट चटई खरेदी करावी लागेल यासाठी सदर ठिकाणची मोजमापे बांधकाम विभागामार्फत घेण्यात आली असून सदर जागेचे एकुण क्षेत्रफळ ५६८८ चौ. फुट आहे.

प्रत्येक गुरुवारी साईभक्तांना श्रींची पालखी पाहण्यासाठी बसण्याची व्यवस्था करणेकामी ५६८८ चौ.फुट चटई खरेदी करावी लागेल चटई खरेदीकामी बाजारात चौकशी केली तसेच कांही पुरवठा धारकांकडून मेल मागविण्यात आले असता चटईचा शिर्डी पोहोच अंदाजे दर रु. १२ पासून ते रु. १५ पर्यंत प्रति स्के. फुट आहे. ५६८८ चौ.फुट चांगल्या प्रतीची चटई खरेदीकामी अंदाजे रु.५६८८ X१५ = ८५३२०/- (अक्षरी रु. पंचाऐंशी हजार तिनशे वीस मात्र) खर्च अपेक्षित आहे. सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रकात स्वच्छता साहित्य खरेदीकामी बजेट तरतूद आहे. सदरचे साहित्य देणगी स्वरुपात स्वीकारता येईल तसेच देणगी न मिळाल्यास निविदा मागवून विहित पध्दतीने खरेदी करावे लागेल. खरेदीनंतर सदर चटई प्रत्येक गुरुवारी पालखी पाहण्यासाठी आलेल्या साईभक्तांना बसण्याकरिता मंदिर विभागामार्फत टाकता येईल.

५६८८ चौ.फुट चटई देणगी स्वीकारणेस अथवा देणगी न मिळाल्यास खरेदी करणेस व खरेदीकामी लागणा-या रु. ८५३२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

तरी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रत्येक गुरुवारी श्रींचा पालखी सोहळा पाहण्यासाठी येणाऱ्या साईभक्तांची आसनव्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून चटई खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच ज्या साईभक्तांना खाली बसता येत नाही, अशा साईभक्तांसाठी काही खुर्च्याही खरेदी करणेत याव्या, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

**विषय नं.०६** **संस्थान परिसरातील नारळ (शहाळे) फळांची विक्री करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** 14(2) (ग) समितीच्या अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्य या बाबत असून त्या प्रमाणे "नाशवंत वस्तुंची लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे, विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्त व्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करणे." अशी तरतूद प्रस्तूत कलमा मध्ये नमुद केलेली आहे.

**ठराव क्रमांक -** नविन ठराव

**प्रस्ताविक-** बगीचा विभागामार्फत संस्थान परिसरामध्ये तसेच साठवण तलावाचे चारही बाजुने व पश्चिमेला आंबा-नारळ बागेत, धर्मशाळा परिसर, साईनगर, नविन भक्त निवास परिसर, शैक्षणिक संकुल परिसरात नारळ झाडे लावण्यात आलेली असुन सदर झाडांना फळे येण्यास सुरवात झालेली आहे.

यापुर्वी दि.02/03/2015 रोजीच्या मा.उपसमिती सभेतील निर्णय क्रं.74 अन्वये, संस्थान परिसरातील नारळ (शहाळे) फळांची विक्री करणेकामी नारळ फळाचा प्रति नग रु.10/- कमीत कमी दर ठरवुन दरपत्रके मागविणेकामी मान्यता घेण्यात आलेली होती. त्यानुसार जनसंपर्क विभागामार्फत दोन वेळेस वर्तमानपत्रात जाहिरात देऊन परिसरातील फळविक्रेते, व्यापारी यांचेकडुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. परंतु त्यांचेकडुन प्रतिसाद न मिळाल्याने दि.22/07/2015 रोजीच्या मंजुर टिपणी अन्वये संस्थान परिसरातील नारळ (शहाळे) फळांची प्रति नग रु.10/- मात्र याप्रमाणे हातविक्री करणारे किंवा अन्य व्यापाऱ्यास विक्री करणेत येत आहे. मागील वर्षी दुष्काळजन्य परिस्थितीमुळे तसेच पावसाचे कमी प्रमाण असल्यामुळे नारळ झाडांना बहार न आल्याने फळांचे प्रमाण अल्प असल्याने मागील मंजुर दराने नारळ फळांची विक्री करण्यात आली यापासुन संस्थानला एकुण 66,380/- मात्र उत्पन्न मिळालेले आहे.

**संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान-** सदरचा विषय हा आर्थीक स्वरुपाचा आहे.

**मागणी-** सध्या दि.22/07/2015 रोजीच्या मंजुर टिपणी अन्वये संस्थान परिसरातील नारळ (शहाळे) फळांची प्रति नग रु.10/- मात्र याप्रमाणे हातविक्री करणारे किंवा अन्य व्यापाऱ्यास विक्री करणेत येत आहे. चालु वर्षी पाऊस समाधानकारक झाल्याने तसेच नारळ झाडांना ड्रिपद्वारे पाणी मिळाल्यामुळे सदर नारळ झाडांना नविन बहार येऊन फळे येण्यास सुरवात झालेली आहे. तसेच सध्या उन्हाळयाचे दिवस सुरु झाल्याने मार्केटमध्ये नारळ (शहाळे) फळांची मागणी वाढल्याने तसेच उन्हामुळे फळांमधील पाण्याचे प्रमाण कमी होऊन खोबरे तयार होऊन फळे पक्व होण्याची शक्यता असल्याने नविन दराने नारळ (शहाळे) फळांची विक्री करणे आवश्यक आहे. संस्थान परिसरातील नारळ (शहाळे) फळांची विक्री करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन परिसरातील हातविक्री करणारे व्यापारी किंवा अन्य व्यापारी यांचेकडुन दरपत्रके मागविता येईल.

**निर्णय क्र.१७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थान परिसरातील नारळ (शहाळे) फळांची उच्चतम दराने विक्री करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७** **सन 2017-18 या वर्षासाठी उदी चाळूण घेणे, दर निश्चीत करणे व खर्चास मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(ख) | रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** श्रीसाईबाबा हयात असतांना द्वारकामाई धुनीमध्ये तयार झालेली उदी साईभक्तांना प्रसाद म्हणून स्वहस्ते वाटत असे. तीच पद्धत श्रीसाईबाबांचे निर्वाणानंतर चालू ठेवण्यात आलेली आहे. श्रीसाईबाबांचे निर्वाणानंतर सदर पवित्र उदी चाळण्याचे काम श्रीमती पार्वताबाई चंद्रभान भालेराव, रा.शिर्डी या करीत होत्या. त्या वयोवृद्ध झाल्यामुळे सन-१९९४ पासूनत्यांच्या सुनबाई सौ.मिराबाई विठ्ठल भालेराव, रा.शिर्डी या उदी चाळण्याचे

काम करीत आहेत. एकंदरीत सुमारे ८३ ते ८४ वर्षांपासून उदी चाळण्याचे काम शिर्डीतील भालेराव कुटूंब उक्ती मजूरी पद्धतीने काम करीत आलेले आहे. उदी चाळण्याचे काम अत्यंत त्रासाचे असून उदी चाळतांना नाका-तोंडात उदीचे अतिशय बारीक कण जातात. प्रतिदिन सरासरी २.५ ते ३ गोण्या उदी चाळण्यात येते. प्रति महिन्यामध्ये साधारणत: सरासरी ७५-७८ गोण्या चाळणेचे काम करत आहेत. माहे-एप्रिल-२०१६ ते माहे-मार्च-२०१७ या कालावधीत उदी चाळणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-०१/६३६/२०१६,दि.२१/०५/२०१६अन्वये प्रति गोणी रु.२००/-प्रमाणे मजूरी देण्यात आलेली आलेली आहे. माहे-मार्च-२०१७ अखेर सदर मंजूरी संपणार आहे.

**प्रस्ताव-** सौ.मिराबाई विठ्ठल भालेराव यांनी दि.०८ फेब्रुवारी,२०१७चे अर्जान्वये सन-२०१७-१८ या वर्षाकरिता रु.३००/- ते रु.४००/- प्रति गोणी उदी चाळण्याचे काम मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

**विभागाचा अभिप्राय-** पुर्वीपासुन श्रींचे द्वारकामाईतील पवित्र धुनीतील उदी शिर्डीतील सुतार भालेराव कुटंबीय यांचेकडुन चाळुन घेण्यात येत आहे माहे-एप्रिल-२०१६ ते माहे-जानेवारी-२०१७ अखेर एकूण ७७९ गोणी उदी चाळण्यात आलेली असून प्रती गोणी रु.२००/- प्रमाणे एकूण रक्कम रु.१,५५,८००/- इतकी मजूरी आदा करण्यात आलेली आहे. सन-२०१७-१८ करीता उदी चाळणेकामी सौ.मिराबाई विठ्ठल भालेराव यांनी रु.३००/- ते रु.४००/- प्रति गोणी दर मागितले आहे. तरी अंदाजे रु.३००/- प्रति नग प्रमाणे १००० गोणी करीता एकूण रु.३,००,०००/- खर्च अपेक्षित आहे.

तरी सौ.मिराबाई विठ्ठल भालेराव यांचेकडुन माहे-एप्रिल-२०१७ ते माहे-मार्च-२०१८ अखेर या कालावधीसाठी उदी चाळुन घेणेस व त्याकरीता प्रति गोणी दर निश्चित करणे व होणारे खर्चास मंजूरी मिळणेस मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.१७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सौ.मिराबाई विठ्ठल भालेराव यांचेकडुन माहे-एप्रिल-२०१७ ते माहे-मार्च-२०१८ अखेर या कालावधीमध्ये आहे त्याच दरामध्ये उदी चाळुन घेणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८** **श्री साईप्रसादालयातील जुन्या नादुरुस्त पाच चपाती मशिन्सची जाहिर लिलावाने विक्री करणेकामी करावयाच्या कार्यवाहीस मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियमामधील तरतूद २०१४** : (१) कलम २(१४)(घ) – भक्तांचे सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (२) कलम २१(१)(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

**प्रस्ताविक** : श्री साई प्रसादालयात साईभक्तांना प्रसाद भोजनात चपाती पुरविणेकामी संस्थानने सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांचेकडून सन २०११ मध्ये प्रती तास २००० चपाती क्षमतेचे ३ मशीन्स (खरेदी २ व देणगी १) व सन २०१२ मध्ये २ मशीन्स (देणगी) अशा एकूण ५ चपाती मशीन्स घेतलेल्या होत्या. सदरील चपाती मशीन सन २०११ व सन २०१२ पासून वापरात असून, त्याचा वापरही मोठया प्रमाणात झाला आहे. या कालावधीमध्ये त्यांची अनेकवेळा दुरुस्ती करण्यात आलेली आहे. दिवसेंदिवस या मशीनरीवरील दुरुस्तीचा खर्च वाढत असलेने त्या बंद ठेवण्यात आलेल्या आहेत.

मागील वर्षी साईभक्त श्री शैलेश पटेल, बंगलोर यांनी श्री साईप्रसादालयात साईभक्तांना प्रसाद भोजनात चपाती मिळणेकामी तासी ३ हजार क्षमतेचे व तासी १० हजार क्षमतेचे प्रत्येकी एक असे दोन चपाती मशिन देणगी स्वरुपात दिलेले आहे. या चपाती मशीन पासून सध्या चांगल्या पध्दतीने चपाती बनविण्यात येत असून, मशीन दिवसातून अंदाजे ५ ते ६ तास चालवून श्री साईभक्तांना चपाती पुरविण्यात येत आहेत.

**मागणी**: नवीन चपाती मशीन आलेमुळे जुने चपाती मशीन्सची आवश्यक नाही, यामुळे पाच चपाती मशीन्सचे जाहीर लिलावाव्दारे विक्री करणे आवश्यक आहे. सदरील पाच मशीनची दिनांक ३१ मार्च, २०१७ अखेर घसारा वजा जाता खालील तपशीलाप्रमाणे किंमत होत आहे :

| अ.नं. | मशीनचा तपशील | मशीन डेड-स्टॅाक कोड | नग | मशीनची खरेदी / देणगी दिनांक | मुळ किंमत रुपये | दि. ३०/०९/२०१६ अखेर घसारा जाता किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Automatic Sunshine Make Chapati Making Machine | MCH/P003 | 2 | 03/12/2010 | 43,13,000/- | **8,75,819/-** |
| 2. | | MCH/P004 | 1 | 04/05/2011 | 21,68,500/- | **4,40,346/-** |
| 3. | | MCH/P008 | 1 | 15/10/2011 | 21,68,500/- | **4,40,346/-** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4. | (Capacity 2000 Chapati (Per Hour) | MCH/P014 | 1 | 08/02/2012 | 21,56,500/- | **4,37,909/-** |
| | | | | **एकूण रुपये :** | **1,08,06,500/-** | **21,94,420/-** |

वरीलप्रमाणे पाच चपाती मशीन्सची दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ अखेर घसारा वजा जाता एकूण किंमत रुपये २१,९४,७२०/- होत आहे.

**मान्यता**: प्रशासकीय तसेच शासन मान्यता आवश्यक.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**: पाचही चपाती मशीन्सचा वापरही मोठ्या प्रमाणात झालेला आहे. नवीन मशीन्स आल्याने जुन्या मशीनरींची आवश्यकता नसलेने, त्यांची जाहीर लिलावाने विक्री करणे योग्य वाटते, असे नम्र मत आहे. सदरील चपाती मशीनची घसारा वजा जाता किंमत रुपये ५०,०००/- पेक्षा अधिक होत असून, संस्थान अधिनियम २००४ मधील तरतूद क्र. १७(४) नुसार "विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित केलेले, पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहिर, दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण म्हणून ठेवण्यात येणार नाही" असे नमूद केले आहे.

उपरोक्त तरतूदीनुसार चपाती मशीनची सध्याची घसारा वजा जाता किंमत रुपये ५०,०००/- पेक्षा अधिक असल्याने, त्यांची जाहीर लिलावाने विक्री करणेकरीता विधी व न्याय खाते, महाराष्ट्र शासन यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. शासन मान्यता मिळालेनंतर सदर मशीनरींची अभिलेख कक्षामार्फत जाहीर लिलावाने विक्री करता येईल. या सर्व करावयाच्या कार्यवाहीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी श्री साई प्रसादालयात जुन्या नादुरुस्त पाच चपाती मशीन्सची जाहीर लिलावाव्दारे विक्री करणेकामी करावयाच्या कार्यवाहीस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील जुन्या नादुस्त पाच चपाती मशिन्सची जाहिर लिलावाने विक्री करणेकामी प्रस्तवात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९** **श्रींचे समकालीन संत व साईभक्त यांचे फोटो म्युझियम हॉल येथे लावणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/उपकलम क्रमांक | तततूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(क) | मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन |
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(ख) | रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |
| ०३ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना:-** श्रींचे समाधी मंदिराचे सभामंडपाचे सध्या चारही बाजुने एकूण ५३ फोटो पुर्वीपासुन लावण्यात आलेले आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. तसेच फोटोच्या खालचे बाजुस प्रत्येकाचे नामफलक लावण्यात आलेले आहेत. आहेत. सध्या अनेक साईभक्त श्रीसाईसच्चरित अथवा इतर श्रीसाईबाबांचे संदर्भीय ग्रंथ, मासिके, इ. साहित्यामध्ये आपले पुर्वजांचा संदर्भ दाखवुन आपले समाधी मंदिराचे सभामंडपामध्ये पुर्वजांचा फोटो लावणेबाबत आग्रह धरत आहे यासंदर्भात आजतागायत मंदिर विभागाकडे समाधी मंदिराचे सभामंडपामध्ये श्रींचे समकालीन असलेले साईभक्त १) कै.गंगुबाई औरंगाबादकर, २) कै.शांताराम बळवंत नाचणे, ३) कै.वामनराव (दादा) माणकोजी पा. गोंदकर, ४) कै.हरी केशव कर्णिक, ५) कै.खुशालचंद सांड, ६) कै.रावसाहेब बापूराव राघोजी बोरावके, ७) श्री नरसिंह गोपालदास महाराज, ८) प.पू.माधवनाथ महाराज, ९) कै.डॉ.आण्णासाहेब गव्हाणकर, १०) प.पू.उद्धवेश रानडे, ११) कै.निवृत्ती हनुमंतराव

पा.गोंदकर, १२) कै.डॉ.एम.के.किर्तीकर, १३) कै.काकासाहेब दिक्षीत, १४)प.पू.स्दगुरु कम्मूबाबा १५) कै.हरी विनायक साठे १६) कै.दगडू भाऊ गायके व १७) कै.राममारुती महाराज अशा वंशजाचे अथवा संबंधीत आप्त-इष्टांनी संस्थानकडे अर्ज देऊन विनंती केलेली आहे.

**प्रस्ताव**:- शनिवार, दि.११.०२.२०१७ रोजी मा.श्री.हावरे सो.,अध्यक्ष महोदय, मा.श्री.तांबे सो विश्वस्त, मा.डॉ.संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी यांनी श्रींचे वस्तूसंग्रहालयामध्ये पाहणी केली असून श्रींचे समकालीन साईभक्तांचे फोटो वस्तू संग्रहालयातील उपलब्ध भिंतीस एकाच मपामध्ये बांधकाम विभागामार्फत बसविणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

**विभागाचा अभिप्राय**:- श्रीसाईनाथ महाराजांचे व श्रीराममारुती महाराजांचे समाधी शताब्दी-२०१८ मध्ये साजरा होणार आहे. त्यापुर्वी श्रीराममारुती महाराज यांचा फोटो समाधी मंदिर अथवा म्युझियम येथे लावणेबाबत श्री.शिरीष गडकरी, अध्यक्ष व विश्वस्त, श्रीराममारुती महाराज समाधी संस्थानमार्फत दि.२९/०८/२०१६चे अर्जान्वये विनंती करण्यात आलेली होती, त्यावेळी मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील विषय नं.०५, निर्णय क्र.८१४ नुसार याबाबत सविस्तर विषय ठेवण्यात आलेला होता. त्यावेळी चर्चा होऊन, संस्थानमार्फत मंदिर परिसरामध्ये योग्य ठिकाणी आर्ट गॅलरी तयार करुन प्रस्तावात नमूद केलेले श्रीसाईबाबांचे समकालीन संत व साईभक्त यांचे फोटो श्रीसाईसच्चरितामधील सविस्तर माहिती तसेच प्रसंगचित्रासह लावणेत यावे, असे ठरले आहे. उपरोक्त ठरावानुसार मंदिर विभागाचे दि.२७/१२/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीनुसार याबाबत बांधकाम विभागास मंजूर टिपणीची प्रत देण्यात आलेली आहे. तसेच जा.क्र.एसएसएस/मंदिर/५४०३/२०१७, दि.२१.०१.२०१७ चे पत्रान्वये मा.श्री.शिरीष गडकरी, अध्यक्ष व विश्वस्त, श्रीसंत राममारुती महाराज संस्थान, कल्याण यांना नवीन आर्ट गॅलरी तयार करतांना श्रीसंत राममारुती महाराज यांचा फोटो लावणेबाबत कार्यवाही करण्यात येईल असे कळविले आहे.

शनिवार, दि.११/०२/२०१७ रोजी मा.अध्यक्ष महोदय व इतरांचे पाहणीमध्ये श्रींचे समकालीन व सानिध्यातील सर्वच साईभक्तांची सविस्तर माहिती मिळावी याकरीता बांधकाम विभागामार्फत मंदिरपरिसरामध्ये स्वतंत्र आर्ट गॅलरी तयार करुन त्याठिकाणी श्रीसाईसच्चरीताचे अध्यायाचे क्रमांकानुसार उल्लेख असलेले संबंधीत समकालीन साईभक्तांची सविस्तर माहिती (नांव, गांव, साईबाबांचा सहवास-संवाद इ.) असे तीन भाषेमध्ये बोर्ड लावणे या सर्व कामाला अधिक वेळ लागणार असल्याने तूर्तास श्रींचे समकालीन संत श्री.राममारुती महाराज यांचा फोटो म्युझियम हॉलमधील समकालीन संतांचे फोटोचे ठिकाणी व इतर साईभक्तांचे फोटो वस्तू संग्रहालयातील उपलब्ध भिंतीस एकाच मापामध्ये बांधकाम विभागामार्फत बसविणेत यावे असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल असे नम्र मत आहे-

१) श्रींचे समकालीन संत श्री.राममारुती महाराज यांचा फोटो म्युझियम हॉलमधील समकालीन संतांचे फोटोचे ठिकाणी उपलब्ध जागेत लावता येईल.

२) सध्या मागणी केलेले वंशज व इतर व्यक्तींमार्फत प्राप्त झालेले अर्जांचे प्रकाशने विभागामार्फत श्रीसाईसच्चरितामध्ये संबंधीत समकालीन संत/साईभक्त यांचे संदर्भ शोधुन त्याबाबत संदर्भ उल्लेख असल्यास त्यानुसार त्यांचे एकाच मापाचे फोटो संबंधीतांकडुन मागणी करुन बांधकाम विभागामार्फत एकसारख्या आकर्षक फ्रेममध्ये लावता येतील असे नम्र मत आहे.

३) त्याचप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.८१४नुसार आर्ट गॅलरी तयार करणेबाबत बांधकाम विभागामार्फत कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करणेत यावी, ही नम्र विनंती.

तरी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे श्रींचे समकालीन संत व साईभक्त यांचे फोटो लावणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.१७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्रींचे समकालीन संतांचे फोटो म्युझियम हॉल येथे लावणेत आलेले आहेत व श्रींचे समकालीन संत श्री.राममारुती महाराज यांचा उल्लेख श्री साईसच्चरित्र ग्रंथामध्ये आढळून येतो, याकरीता संत श्री राममारुती महाराज यांचा फोटो म्युझीयम हॉल येथे लावणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **श्री रामनवमी उत्सव- २०१७ करीता किर्तनकार/ कलाकार निश्चिती व बिदागी निश्चित करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे श्री रामनवमी उत्सव २०१७ सोमवार, दिनांक ०३/०४/२०१७ ते बुधवार, दिनांक ०५/०४/२०१७ (चैत्र शु.८ शके १९३९ ते चैत्र शु.१० शके १९३९) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. याकामी श्री रामनवमी उत्सव अंदाजपत्रक व श्री रामनवमी-२०१७ चे अनुषंगाने करावयाचे

नियोजन/ कामे याबाबत स्वतंत्र प्रस्ताव दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत सादर करण्यात आलेला होता, त्यास मान्यता मिळालेली आहे.

**अ) कीर्तन कार्यक्रम-**

| अ.नं. | कीर्तनकाराचे नाव |
|---|---|
| ०१ | वे.शा.सं.ह.भ्.प. बबनशास्त्री चिपळुणकर ,डोंबिवली |
| ०२ | ह.भ.प. सौ.अंजली श्रीकृष्ण जोशी, डोंबिवली |

**ब) कलाकार कार्यक्रम –**

श्री रामनवमी उत्सव २०१७ मध्ये धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम करणेसाठी इच्छुक असणा-या कलाकारांची नावे खालीलप्रमाणे

| **अ.नं.** | **कलाकारांचे नाव** | **कार्यक्रम** | **कार्यक्रम करण्याची क्षमता** | **कलाकार संख्या** | **मानधन** |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** |
| ०१ | श्री. अनंत वसंत पणशीकर **(नाटयसंपदा कला मंच) निर्मित मुंबई** (मो.९८२१६२८४४९) संकल्पना – रेणुका भिडे, लेखक – फ्रान्सिस ऑगस्टीन , दिग्दर्शक – सुदेश म्हशीलकर संगीत– मयुरेश माडगांवकर , नेपथ्य – सचिन गांवकर | **माझी आई तिचा बाप** (विनोदी भुमिकेत स्मिता जयकर आणि मोहन जोशी) | ३ तास | **२०** | **५,००,०००/- (पाच लाख)** |
| ०२ | सौ. विजया साखरकर, मुंबई (मो.९८२०२१५८११) | **साईनाथ भजन संध्या व साईबाबांवर आधारित नाटीका** | ३ तास | २७ | ४०,०००/- **(चाळीस हजार)** |
| ०३ | श्री. महेश एम.शनभग, हुबली (कर्नाटक) (मो.९८८०८८७२५) | भजन संध्या | ३ तास | २० ते २२ | **११,०००/- (अकरा हजार)** |
| ०४ | डॉ.अर्चना एल. सहकारी , गोवा (मो.८६०५१९२७२४) | भजन संध्या, व हिंदूस्थानी शास्त्रीय गायन, | ३ तास | ८ ते ९ | ४०,०००/- **(चाळीस हजार)** |
| ०५ | श्री.चंचल जामदार,इंदौर (म.प्र,) (मो.०९८९३११३७०३) | सुमधूर भजन व संगीत | २ तास | १० ते १२ | विनामुल्य |
| ०६ | पंडीत ह.भ.प. देवरावजी कुळमेथे, नाशिक (मो.९२२५७३८६५०) | संगीतमय साईसतचरित्र | २ तास | **०३** | योग्य बिदागीची मागणी केली आहे. |
| ०७ | श्री.राम कोठेकर, बुलढाणा ९६०४३१९६१८ | अभंग, भक्तीगीत, रामायण गायण | २ तास | ४ ते ५ | १८०००/- **(अठरा हजार)** |
| ०८ | श्री पंकज श्रीवास्तव, दिल्ली (मो.९८११२७४१४८) | साई भजन संध्या | २ तास | ८ ते ९ | १०,०००/- **(दहा हजार)** |
| ०९ | श्री.विजय साखरकर, मुंबई (मो.९८२१३९३३२३) | साई-स्वर नृत्योत्सव | ३ तास | २५ | ३०,०००/- **(तीस हजार)** |

**क) श्री रामनवमी उत्सवातील श्री दासगणु महाराज, प्रतिष्ठान,गोरटे यांचेमार्फत पाठविण्यात येणा-या कीर्तनकाराची कीर्तन कार्यक्रमाची सेवा आजतागायत चालू असलेली परंपरा खालील प्रमाणे.**

दुनियेचा बादशहाचा प्रभु रामचंद्राचा जन्मोत्सव शिर्डीमध्ये उत्साहात साजरा व्हावा या श्री साईनाथ महाराजांच्या आज्ञेनुसार इ.स.१९१२ मध्ये हा रामजन्मोत्सव शिर्डी येथे सुरु झाला. त्यानंतर इ.स. १९१४-१५ ला, प्रत्यक्ष श्री बाबांच्या आज्ञेने या उत्सवाची सर्व जबाबदारी जमा-खर्च हिशोबासह, श्री दासगणू महाराजांकडे सोपविण्यात यावी. तेंव्हापासून या उत्सवाची सर्व जबाबदारी

श्री दासगणू महाराजांनी सर्वभावे सांभाळली उत्स्वाचा जमा-खर्चाचा हिशोब श्री साईनाथ महाराज देहरुपात असतांना तसा त्यांना देत असत त्याचप्रमाणे श्री बाबांच्या समाधीनंतरही असा लिखीत हीशोब श्री

दासगणू महाराज बाबांच्या समाधीपुढे ठेवत, अशी अनेक वर्षे श्री रामनवमी उत्सवाची सर्वस्वी जबाबदारी पार पाडल्यानंतर, वयोवृध्दतेने, शरीर थकल्यांनतर उत्सवातील कीर्तनसेवेकरीता इतर सर्व व्यवस्था श्री दासगणू महाराजांनी कमिटेकडे सोपविली.

स्वतः दासगणूजी महाराजांनी जवळ जवळ ४० वर्षे सलग कीर्तनसेवा केल्यानंतर ती जबाबदारी त्यांचे शिष्योत्तम प्राचार्य श्री अनंतमहाराज आठवले यांचेकडे सोपविली इ.स.१९६३ मध्ये श्री आठवले महाराजांनी गोरटे ता. उमरी जि.नोंदड श्री दासगणूंची वस्त्रसमाधी बांधून श्री दासगणू महाराज प्रतिष्ठानची निर्मिती केली आणि प्रतिष्ठान सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेअंतर्गत पंजीकृत केले प्राश्री. आठवले यांनीही १९८५ पर्यंत ४५ वर्षे सलग, श्री रामनवमी उत्सवात शिर्डी येथे कीर्तनसेवा केली. त्यानंतर शिर्डी संस्थानने पत्राव्दारे श्रीरामनवमी उत्सवात श्रीदासगणू महाराज प्रतिष्ठाणला कीर्तनकार पाठविणेबाबत सांगावे आणि दासगणु प्रतिष्ठानने श्री दासगणू महाराज परंपरेतील कीर्तनकार प्रतिवर्षी पाठवावा अशी आजही रुढ आहे.

१९१४ पासून आज २०१६-१७ पर्यंत जवळ जवळ १०२ वर्षे श्री रामनवमी उत्सवात , शिर्डी येथे श्री दासगणु महाराजांनी स्वतः रचलेली रसाळ कीर्तनाख्याने लावली सलग १०० वर्षापेक्षा जास्तकाळ टिकून असलेल्या परंपरा अत्यंत मोजक्याच शिल्लक असतील जबाबदारी स्वतः दासगणु महाराजांना देण्याचा श्री साईनाथाच्या समाधीनंतर आणि तरी जबाबदारी स्वीकारणारा श्री दासगणुंच्या निर्वाणानंतर इतकी वर्षे ही परंपरा अत्यंत प्रेमाने श्रध्देने जोपासली जाते. अशाप्रकारे श्री साईनाथ महाराजांच्या वतीने शिर्डी संस्थानचा आदेश येतो आणि श्री दासगणु प्रतिष्ठाणतर्फे, श्री दासगणुंच्या परंपरेतील कीर्तनकार, निरपेक्ष सेवाभावाने, बाबांच्या दरबारात, सेवेसाठी हजर होतो.

मा. व्यवस्थापन उपसमितीचे दि.०१.१०.२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.७३३ किर्तनकारांचे पॅनेल यापुढे रद्द करण्यात यावे किर्तनकारांचे अर्ज मागविण्यात यावे व त्यातून किर्तनकारांची निवड करुन किर्तन कार्यक्रम ठेवण्यात यावे असे ठरले आहे.

१) उपरोक्त "अ" नुसार किर्तनकारांचे व "ब" नुसार कलाकारांचे कार्यक्रमासाठी अर्ज प्राप्त झालेले आहेत. व "क" नुसार गोरटे यांचे मार्फत दर श्री रामनवमी उत्सवाकरीता पाठविलेले कीर्तनकार कीर्तन करीत असतात. सदरची परंपरा ब-याच वर्षापासून चालत आलेली आहे. सदरची परंपरा चालू ठेवावयाची असल्यास "अ" नुसार किर्तनकारांचेकार्यक्रम घेता येणार नाही. "अ" व "क" बाबत योग्य निर्णय होणेस व किर्तनकारास ७ ते ८ वर्षापासून बिदागी/मानधन रु.९००१/- मात्र देण्यात आलेली आहे. यावेळी श्री रामनवमी उत्सवात किर्तनाकारास मानधन/बिदागी बाबत योग्य निर्णय होणेस विनंती.

२) उपरोक्त "ब" तक्त्यात ९ कलाकारांचे कार्यक्रमासाठी अर्ज प्राप्त झालेले आहेत. अ.नं. ६ ते ९ या कलाकारांचे यापुर्वी रामनवमी, पुण्यतिथी, गुरुपौर्णिमा उत्सवात कार्यक्रम झालेले आहेत सदर कलाकारांचा विचार न करता अ.नं. १ ते ५ हे नवीन कलाकार आहेत, सदर कलाकारातून ३ कलाकारांची निवड होऊन प्रत्येक दिवशी तीन तासाचा एक कार्यक्रम ७.३० ते १०.३० असा तीन दिवस आयोजित करता येईल व संस्थानमार्फत विनामुल्य रुम, जेवन, नाष्ट्याची व आरती/दर्शन व्यवस्था करता येईल व कॉलम नं.६ मध्ये कलाकारांनी मानधनाची मागणी केलेली आहे. कलाकारांची निवड झाल्यानंतर मानधनाबाबत योग्य निर्णय होणेस विनंती.

वरील १ व २ निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.१८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव- २०१७ करीता किर्तनकार/ कलाकार निश्चिती व बिदागी निश्चित करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव स्थानिक उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.११** **लाडू प्रसाद निर्मितीचे नविन युनिट सुरु करणेसाठी लाडू विक्री केंद्रे असलेला हॉल व शेजारील किचन वापरण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ) -** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रास्ताविक-** श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना संस्थानतर्फे श्रीं चा प्रसाद मिळावा या हेतूने उपरोक्त संदर्भ क्र.१ नुसार मंदिर दर्शन रांगेत साईभक्तांना श्रींचे दर्शनासाठी येणा-या दर्शनासाठी रांगेत उभे राहावे लागते व पुन्हा रांग लावुनच लाडु प्रसाद घ्यावा लागतो. यामध्ये भक्तांचा त्रास कमी व्हावा व त्यांना मोफत लाडु

प्रसाद मिळावा या हेतुने दि.१५ ऑगस्ट २०१३ पासुन मोफत लाडु प्रसाद वाटप करणेस मान्यता देण्यात आली आहे.

दिवसेंदिवस साईभक्तांच्या गर्दीत मोठ्या प्रमाणात वाढ होत गेल्याने भक्तांची लाडु प्रसाद मागणी वाढत गेली. तसेच एकाच ठिकाणी काऊटर्स असल्याने व साईभक्तांस केवळ २ प्रसाद लाडु पाकीटे देण्यात येत असल्यामुळे साईभक्त पुन्हा-पुन्हा लाडु पाकीटे मिळविणेसाठी रांगेत उभे राहतात. त्यामुळे लांबच लांब रांगा लागतात व भक्तांची प्रचंड गर्दी होत असल्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेत संदर्भ क्र.०१ अन्वये, पुढीलप्रमाणे निर्णय संमत झाला आहे.

"सध्या लाडूप्रसाद पाकिटे विक्रीसाठी एकाच ठिकाणी काऊंटर्स आहेत व एका साईभक्तांस फक्त २ लाडूप्रसाद पाकिटे देण्यात येतात. लाडु प्रसाद पाकीटे विक्री केंद्रावर साईभक्तांची प्रचंड प्रमाणात गर्दी होत असते. या ठिकाणी लाडु प्रसाद पाकीटे मिळणेसाठी भक्तांची गैरसोय होऊ नये, याकरीता संस्थानच्या इतर ठिकाणी लाडु प्रसाद विक्री केंद्रे (जसे-प्रसादालय व निवासस्थाने) सुरु करणेत यावीत व साईभक्त मागणी करतील तेवढी लाडु प्रसाद पाकीटे त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावीत. त्याचबरोबर लाडु प्रसाद पाकीटांचा गैरवापर होऊ नये याकरीता दि.०१ जानेवारी २०१७ पासुन लाडु प्रसाद पाकीटाची किंमत रु.२५/- मात्र करणेत यावी, असे ठरले.

तसेच संदर्भ क्र.२ अन्वये, दि.२४ नोव्हेंबर २०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी संस्थानच्या विविध विभागांनी करावयाच्या कामकाजाबाबत पुढीलप्रमाणे सुचना दिलेल्या आहेत. "लाडु विक्री केंद्रे वाढविणे, उदी वाटपाचे जागी लाडु विक्री सुरु करणे, प्रसादालयासह सर्व भक्तनिवास येथे लाडु विक्री केंद्रे सुरु करणे"

त्यासअनुसरुन दि.१६/०२/२०१७ रोजी सकाळी ११.०० वा. मा.कार्यकारी अधिकारी डॉ.संदिप आहेर साहेब व प्रशासकीय अधिकारी श्री गोंदकर साहेब यांनी साईप्रसाद इमारतीशेजारील लाडु विक्री काऊंटर व जुन्या प्रसादालयाचे लाडु किचन येथे रांऊड घेतला. भक्तांना पाहीजे तेवढी लाडु पाकीटे उपलब्ध करुन देणेसाठी प्रसादालय व संस्थानची निवासस्थाने इ. ठिकाणी लाडु विक्री केंद्रे वाढविणेसाठी तात्काळ कार्यवाही करणेबाबतच्या सुचना केल्या आहेत.

उपरोक्त प्रमाणे दिलेल्या सुचनांची कार्यवाही करणेकामी लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे सध्या सुरु असलेल्या युनिटसाठी उपलब्ध असणारी जागा पुरेशी नाही. सदरचे अपु-या जागेमध्ये भक्तांना पाहीजे तेवढी लाडुंचे उत्पादन वाढविणे शक्य होणार नसल्याने साईप्रसाद इमारती शेजारील लाडु विक्री काऊंटरचा हॉल व यापुर्वी वापरात असलेली लाडु निर्मिती किचनची जागा उपलब्ध झाल्यास भक्तांचे होणा-या गर्दीवर नियंत्रण करणे शक्य होईल. त्यांना मुबलक प्रमाणात लाडु प्रसाद पाकीटांची विक्री करणे सुलभ व सोपे होईल. त्याचप्रमाणे संस्थान निवासस्थानांच्या ठिकाणी लाडु प्रसाद पाकीटे विक्री केंद्रे सुरु करणेत आलेली आहेत, त्यामुळे वाढत्या काऊंटरचे संख्येनुसार लाडु निर्मितीत वाढ करणे अत्यंत गरजेचे आहे. गर्दीचे प्रमाण लक्षात घेता जास्त लाडु पाकीटांची निर्मिती करण्याची गरज भासणार असल्याने जुने प्रसादालय (साई प्रसाद इमारत) व नविन प्रसादालय (श्री साई प्रसादालय) दोन्ही ठिकाणी एकाच वेळी लाडु निर्मिती सुरु ठेवण्याची आवश्यकता भासणार आहे.

लाडु निर्मिती व विक्री एकाच ठिकाणी असल्याने अनाधिकृत गैरप्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी कर्मचा-यांवर नियंत्रण व लक्ष ठेवणेसाठी अतिरीक्त कर्मचा-यांची गरज भासणार आहे. नविन युनिट सुरु केल्यानंतर सदर ठिकाणी कॅन्टीन विभागास लाडु प्रसाद पाकीटे मोजुन देणे, तसेच लाडु किचनमधील कर्मचा-यांवर नियंत्रण करणे, लाडु प्रसाद पाकीटांचा हिशोब ठेवणे इ. कामांसाठी प्रत्येक शिफ्टसाठी १ कर्मचारी येणेप्रमाणे ३ कायम कर्मचारी व सदर कर्मचा-यांचे आठवडा सुट्टीचे कालावधीत काम करणेसाठी १ कर्मचारी असे एकुण कमीत कमी ४ कायम कर्मचारी आस्थापना विभागाकडुन उपलब्ध झाल्यास लाडु निर्मिती साठी लागणा-या कच्च्या मालावर व तयार केलेल्या मालावर नियंत्रण ठेवता येईल. लाडु प्रसाद निर्मिती दोन्ही ठिकाणी सुरु ठेवण्याचे प्रयोजन असल्याने नविन युनिटसाठी लागणारे सर्व साहित्य व गॅस भट्टया युनिट सुरु करण्याच्या ठिकाणी नव्याने निर्माण कराव्या लागणार आहे, सदरची कामे संबंधित विभागाकडुन करुन घेता येईल.

तसेच FDA कार्यालय व ISO लेखापरीक्षक यांचे नियमावलीनुसार तेथील जागेचे रंगकाम, स्वच्छता व इतर सोई-सुविधा उपलब्ध करुन दिल्यास तेथे लाडु निर्मितीचे युनिट सुरु करता होईल. सध्या सुरु असलेल्या युनिटसाठी उपलब्ध असलेल्या जागेत जास्तीत जास्त २५ पोत्यांचे लाडुंचे उत्पादन करण्यात येतात. सदरचे ठिकाणी लाडु बनविणेकामी व सुकविणेकामी जास्त वेळ खर्च होत आहे. परंतु जुन्या प्रसादालयाचे ठिकाणी हवा खेळती असल्याने लाडु लवकर सुकतील. जागा विस्तृत प्रमाणात असल्याने दैनंदिन पाहीजे तेवढी लाडु निर्मिती करणे शक्य होईल व हिशोबही व्यवस्थीत ठेऊन त्यावर नियंत्रण करता येऊन साईभक्तांना पाहीजे तेवढी लाडु

प्रसाद पाकीटे विक्रीसाठी उपलब्ध करुन देणेही सोईचे होईल. तसेच नविन जागेत लाडु निर्मितीचे युनिट सुरु करावयाचे झाल्यास FDA कार्यालय, अहमदनगर यांची पुर्वपरवानगी घेणेही आवश्यक राहील.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** उपरोक्तप्रमाणे लाडु प्रसाद पाकीटे उत्पादन वाढविणेकामी व भक्तांना हवी तेवढी पाकीटे उपलब्ध करुन देणेसाठी साईप्रसाद इमारतीचे शेजारील लाडु विक्री केंद्रे असलेला हॉल व किचनची जागा वापरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरचे ठिकाणी लाडु निर्मितीसाठी आवश्यक सोई-सुविधा उपलब्ध करुन दिल्यास व FDA कार्यालय, अहमदनगर यांची परवानगी मिळाल्यास लाडु निर्मितीचे नविन युनिट सुरु करून दोन्ही ठिकाणी लाडु निर्मितीची प्रक्रीया सुरु झाल्याने भक्तांना पाहीजे तेवढी पाकीटे विक्रीसाठी उपलब्ध करुन देता येईल.

तरी सदरचे ठिकाणी लाडु प्रसाद निर्मितीकामी लागणा-या सर्व आवश्यक त्या सुधारणा करुन, त्या जागेत FDA कार्यालय व ISO लेखापरीक्षक यांचे नियमावलीनुसार लाडु प्रसाद निर्मितीचे नविन युनिट सुरु करणेसाठी मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.१८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडू विक्री केंद्र असलेल्या हॉलमध्ये आवश्यक त्या सुधारणा करुन, या जागेत FDA कार्यालय व ISO लेखापरीक्षक यांचे नियमावलीनुसार लाडु प्रसाद निर्मितीचे नविन युनिट सुरु करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी समिती सदस्य मा.डॉ.राजेंद्र सिंग यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकरीता गोदरेज टेबल खरेदी करणेस मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –** सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – नवीन प्रस्ताव**

**प्रास्ताविक:-** उपरोक्त संदर्भीय क्र. १ निर्णयान्वये श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलकरीता सनमायका टॉप (T 8) ०८ नग व (T 9) ०२ नग (दोन बाजू ड्रावर असलेले) गोदरेज टेबल विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली होती. सदर्भ क्र.२ निर्णयान्वये अधिन राहून दि.०३.११.२०१६ रोजी रोहन एन्टरप्रायजेस, अहमदनगर यांना पुरवठा आदेश देण्यात आला होता, परंतू मागणीप्रमाणे सनमायका टॉप (T 8) दोनबाजू ड्रावर असलेले टेबल त्यांचेकडे उपलब्ध नसल्याने खरेदी केलेले नाहीत.

**वाचा-** उपरोक्त सदर्भ नं. **१)** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१४.०६.२०१६ मधील निर्णय क्र. ३३४ व (२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०९.१०.२०१६ मधील निर्णय क्र. ६८९ रद्द करावी लागेल असे नम्र मत आहे. तसेच नवीन मागणी नुसार गोदरेज टेबल खरेदी करावे लागणार आहेत.

**मागणी:-** शाळेच्या मुख्याध्यापिका (प्राथमिक विभाग) व प्राचार्य (माध्यमिक विभाग) यांचेकरीता कार्यालयात वापरणेकामी गोदरेज सनमायका टॉप (T9) ०२ नग ऑफीस टेबल व वर्गात शिक्षकांना वापरणेकामी (T8) १० नग खरेदी करणे आवश्यक आहेत. सदरचा अंदाजीत खर्च हा पुरवठाधारकांशी संपर्क साधुन त्यांचे कडून ई-मेल द्वारे वस्तूंचे दरबाबतचे पत्रके मागविण्यात आली असून सोबत जोडलेली आहेत. सदर खरेदीसाठी अ.नगर जिल्हयातील होलसेल दुकानदारांकडून कोटेशन मागवून संस्थानचे विहीत पध्दतीने खरेदी करता येईल. या गोदरेज टेबलबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | मालाचे वर्णन | नग | अंदाजे किमंत प्रति नग रु | एकुण किमंत. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | टेबल | सनमायका टॉप गोदरेज कंपनी T 8, (एक बाजू ड्रावर) | १० | 8850/- | 88500/- |
| ०२ | ऑफिस टेबल | सनमायका टॉप गोदरेज कंपनी T9 (दोन बाजू ड्रावर) | ०२ | 13835/- | 27670/- |
| | | | | एकुण | 116170/- |

(अक्षरी एक लाख सोळा हजार एकशे सत्तर मात्र रुपये )

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी/शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदरचा खर्च फर्निचर खरेदी बजेटमधून करता येईल. त्यासाठी रुपये २००,०००/-इतकी तरतूद करण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** तरी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१४.०६.२०१६ मधील निर्णय क्र.३३४ व (२) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०९.१०.२०१६ मधील निर्णय क्र.६८९ रद्द करणेस तसेच ऑफीस टेबल (T9) ०२ नग (दोन बाजू ड्रावर) व (T8) १० नग (एक बाजू ड्रावर) विहीत पद्धतीने खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या अंदाजे रु. 116170/- खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.१८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.१३** **प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडेपट्टयाने देण्यात आलेली जागा खाली करुन घेणेबाबतची नोटीस रद्द करणे व पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७ (३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही,किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव -** प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना भाडेपट्टयाने देणेत आलेली जागा खाली करुन घेणेबाबतची नोटीस रद्द करणे व दि.३०/११/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे बैठकीतील निर्णय क्रं.७६४ निरस्त करणे आणि पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी जागेस मुदतवाढ देणेबाबत..

**प्रस्तावना -** प्रसार भारती,(भारतीय प्रसारण निगम) आकाशवाणी तथा दुरदर्शन मुंबई यांनी दि.२१/०४/२००३ रोजीचे पत्रान्वये शिर्डी येथे दुरदर्शन लघु प्रसारण केंद्र उभारणेसाठी संस्थानकडे मासिक भाडे तत्वावर ४००० चौ.फुट मोकळी जागा व ९०० चौ.फुट बांधीव जागा अशी एकुण ४९०० स्क्वे.फुट जागा मिळणेस विनंती केलेली होती. सदर प्रस्तावाबाबत मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.११/०५/२००३ रोजीचे सभेत ठराव क्र.२०७ अन्वये मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांची पुर्व मान्यता घेवून जागा भाडेतत्वावर देण्यात यावी ठरले. सदर ठरावास अनुसरुन दि.०९/०६/२००३ रोजीचे पत्रान्वये मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया यांना संस्थानची जागा भाडेतत्वावर देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.१०/०७/२००३ रोजीचे आदेशाने प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना Low Power T.V.Center, शिर्डी येथे उभारणेसाठी संस्थानचे अर्जात नमुद केलेप्रमाणे जागा भाडयाने देणेस परवानगी दिलेली आहे.

प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया,यांनी दि.०६/०८/२००३ रोजीचे पत्राने (१) पी.डब्ल्यु.डी. यांचेकडून निश्चित झालेले भाडे देण्यात येईल (२) कमीत कमी १५ वर्षासाठी जागा दयावी लागेल (३) करारनामा ३ वर्ष किंवा ५ वर्षासाठी करण्यात यावा त्यानंतर नुतनीकरण करण्यात यावे असा राहील,असे इकडील कार्यालयास कळविलेले होते. प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया,यांचे उपरोक्त पत्राबाबत मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.०५/१०/२००३ रोजीचे सभेत विषय सादर करुन निर्णय क्र.४७३ अन्वये प्रसार भारती यांना १५ वर्षासाठी जागा भाडयाने देणेबाबतचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे. त्यानुसार प्रसार भारती यांना दि.२२/०८/२००६ पासून स.नं.१४८ धर्मशाळा सध्या साईनाथ रुग्णालय येथील ४००० चौ.फुट मोकळी जागा व ९०० चौ.फुट बांधीव जागा अशी एकुण ४९०० स्क्वे.फुट संस्थानची जागा व रुम वापरास देण्यात आलेली आहे.

संस्थानला सन २००४ मध्ये नवीन अधिनियम लागू झालेला आहे. त्यामध्ये कलम २४(१) ची तरतुद खालीलप्रमाणे आहे.

१) जेथे शिर्डी जि.अहमदनगर येथील श्री साईबाबा शिर्डी संस्थान या नावाची पूर्वीची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही किंवा तिचा कोणताही विश्वस्त हा नियत दिवसाच्या लगतपूर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या नावाने कलम ३ अन्वये पुनर्घटित करण्यात आलेल्या विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित

कोणत्याही मालमत्तेच्या,हक्कांच्या, दायित्वांच्या किंवा बंधनाच्या संबंधातील कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीत एक पक्षकार असेल त्याबाबतीत, उक्त पुनर्घटित विश्वस्तव्यवस्थेला किंवा तिच्या समितीला त्या कार्यवाहीतील एक पक्षकार म्हणून पूर्वीची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा तिचे विश्वस्त याऐवजी दाखल करणेत आले असल्याचे किंवा यथास्थिती किंवा त्यातील एक पक्षकार म्हणून जादा दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि कार्यवाही तदनुसार चालू ठेवण्यात येईल.

२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील किंवा त्याखालील काढण्यात आलेल्या कोणत्याही नियमातील, विनियमातील अधिसूचनेतील किंवा आदेशातील किंवा कोणत्याही विलेखातील किंवा दस्तऐवजातील पूर्वीची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा तिचे विश्वस्त याबाबतच्या कोणत्याही निर्देशांचा अर्थ नियत दिवशी किंवा त्यानंतर संदर्भानुसार दुसरा अन्वयार्थ लावणे आवश्यक नसेल तर यथास्थिती कलम ३ अन्वये पुनर्घटित विश्वस्तव्यवस्था किंवा तिची समिती याबद्दलचा निर्देश असा लावण्यात येईल.

तसेच या अधिनियमामध्ये संस्थान मिळकतीबाबत कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही,किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

यापूर्वी दि.०५/१०/२००३ रोजीच्या निर्णय क्रं.४७३ प्रमाणे १५ वर्षासाठी (३-३ वर्षाचे टप्प्याने) लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर जागा दिली आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियमातील कलम १७(३) च्या तरतुदीप्रमाणे फक्त १ वर्ष कालावधीसाठी संस्थान मिळकत Lease वर देता येते.
मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०७/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२१९ अन्वये प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना दि२१/०८/२०१५ ते दि.२०/०८/२०१६ अखेर १२ महीने कालावधीसाठी इकडील जा.नं.एसएसएस/ मालमत्ता/२९७६/२०१५ दि.२६/०८/२०१५ अन्वये मुदतवाढीचा आदेश देण्यात आलेला असून त्याची मुदत दि.२०/०८/२०१६ रोजी संपुष्टात आलेली आहे.

प्रसार भारती, भारतीय प्रसारण निगम,लघु प्रक्षेपण केंद्र,शिर्डी यांनी दि.०४/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये लिज डिड पुढील दि.२१/०८/२०१६ ते दि.२०/०८/२०१७ अखेर मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

त्यास अनुसरुन सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीच्या सभेपूढे सादर करणेत आला. त्यावर निर्णय क्रं.७६४ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होवून श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार व प्रसार व्हावा या दृष्टीने प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना भाडेपट्टयाने जागा देण्यात आलेली होती. परंतु त्यांचेमार्फत आजतागायत श्रीं च्या शिकवणूकीचा प्रचार व प्रसार करणेत आलेला दिसून येत नाही व श्री साईनाथ रुग्णालय विस्तारीकरणासाठी सदरहू जागेची आवश्यकता आहे. तसेच केंद्र शासनाने टि.व्ही.संचासाठी सर्व ठिकाणी सेट टॉप बॉक्स वापरणची सक्ती केलेली असल्यामुळे प्रसार भारती लघु प्रक्षेपण केंद्राची कार्यपध्दती ही कालबाहय झालेली आहे. या सर्व बाबींचा विचार करता प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना सदरहू जागा खाली करुन देणेबाबत लेखी पत्र देणेत यावे,असे ठरले."

सदर निर्णयाप्रमाणे उक्त जागा खाली करुन देणेकामी इकडील पत्र क्रं.एसएसएस/ मालमत्ता/ ५२८६/ २०१७ दि.१२/०१/२०१७ अन्वये मा.सहायक अभियंता,प्रसार भारती दूरदर्शन मेंटेनन्स सेंटर, आकाशवाणी कॉम्प्लेक्स,नासिक यांना पत्र देणेत आले.

दरम्यानचे काळात प्रसार भारती विभागाने शिर्डी येथे उक्त जागेवर आकाशवाणी रेडीओ (एफ.एम) १०७.३ रिले सेंटरचे १०० डब्ल्यू एफ.एम.ट्रान्समीटर व इतर मशिनरी दि.०१ फेब्रुवारी २०१७ पासून कार्यान्वित करणेत आलेली आहे व त्यावर साईबाबांचे संबंधातील कार्यक्रम व मंदिरातील आरत्याअहमदनगर आकाशवाणी रिले सेंटरवरुन प्रसारीत करणेस सुरुवात केलेली आहे. त्यासाठी सदर जागा प्रसार भारतीसाठी आवश्यक आहे. तरी जागा खाली करुन देणेसाठीची नोटीस मागे घेणेत यावी व पुढील दि.२१/०८/२०१६ ते दि.२०/०८/२०१७ अखेर या एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेस दि.०४/०७/२०१६ व दि.०८/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे.

संस्थानचे मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.११/०५/२००३ व दि.०५/१०/२००३ चे सभेतील निर्णय क्रं.२०७ व ४७३ नुसार जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्रानुसार घेणेचे ठरलेले आहे व प्रत्येक ३ वर्षाने मासिक परवाना फी मध्ये १० टक्के वाढ करुन खालीलप्रमाणे आकारणी केलेली आहे.

१) पहिल्या टप्प्यातील ३ वर्षाचे दि.२१/०८/२००३ ते दि.२०/०८/२००६ अखेर रुपये ३३२५/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

२) दुस-या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२००६ ते दि.२०/०८/२००९ अखेर रु.३३२५/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.३६५७-५० मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

३) तिस-या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२००९ ते दि.२०/०८/२०१२ अखेर रु.३६५७-५० मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४०२४/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

४) चौथ्या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२०१२ ते दि.२०/०८/२०१५ अखेर रु.४०२४/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४४२७/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

५) पाचव्या टप्प्यातील तीन वर्षाचे कालावधीसाठी दि.२१/०८/२०१५ ते दि.२०/०८/२०१८ अखेर रु.४४२७/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४८७०/- मासिक भाडे आकारण्यात आले असून प्रसार भारती यांनी माहे डिसेंबर २०१६ अखेरचे भाडे संस्थानकडे जमा केलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांचे विनंतीप्रमाणे दि.३०/११/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.७६४ हा निरस्त करता येईल व सदरची जागा यापूर्वी वापरात असलेल्या कारणासाठी तसेच आकाशवाणी रेडीओ (एफ.एम) १०७.३ रिले सेंटरचे १०० डब्ल्यू एफ.एम.ट्रान्समीटर वापरासाठी दि.२१/०८/२०१६ ते दि.२०/०८/२०१७ या एक वर्षाचे कालावधीकरीता मुदतवाढ देता येईल व त्याप्रमाणे करारनामा करुन घेता येईल.

तरी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१४** **साईनगर मैदानावरील डॉक्टर व स्टाफ पार्कींग भाडेतत्वावर चालविणेस देणे व श्री साईबाबा हॉस्पिटलच्या कॅन्टीन विभागामध्ये झेरॉक्स मशीन बसविणे तसेच ते एम्प्लॉईज सोसोयटीस भाडेतत्वावर चालविणेस देणे.**

**प्रस्ताव-** **(अ)** ग्रामीण भागातील व दुरवरील कर्मचा-यांना रात्री अपरात्री डयुटीसाठी यावे लागते श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये डयुटीसाठी यावे लागते. त्या कर्मचा-यांच्या येण्या जाण्याच्या सोईनुसार दुचाकी गाडीचा वापर करत असतात.

हॉस्पिटलमधील कर्मचारी यांच्या वाहनाचे उन, वारा, पाऊस तसेच सुरक्षीततेच्या दृष्टीने साईनगर मैदान येथे दुचाकी वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करणेत आलेली आहे. या ठिकाणी कर्मचा-या व्यतिरीक्त रुग्णास भेट देण्याकरीता येणारे नातेवाईक तसेच इतर नागरीकांचे दुचाकी वाहन सुदधा याच पार्किंगमध्ये लावले जात असल्याणे संस्थान कर्मचा-यांना पार्किंगच्या बाहेर इतर ठिकाणी आपली दुचाकी पार्किंग करावी लागते. सुरक्षा रक्षक कर्मचारी नसल्याने पार्किंगची जबाबदारी कोणावरही नसल्याने काहि दिवसांपासुन या पार्किंग मधुन बरेच कर्मचा-यांचे दुचाकी वाहन चोरी जाण्याचे प्रमाण वाढले आहे.

कर्मचा-यांच्या वाहनांसाठी ठराविक आकार आकारणेत येवुन श्री साईबाबा संस्थानच्या सोसायटीला किंवा परवाना धारक पार्किंग एजन्सीला नियम व अटीच्या अधिन राहुन साईनगर मैदान पार्किंग ठराविक भाडेतत्वावर चालविणेस दिली तर हॉस्पिटलमधील कर्मचारी यांच्या वाहनाचे उन,वारा,पाऊस संरक्षण होईल दुचाकीचे चोरी होणार नाही व वाहनांची जबाबदारी सर्वस्वी एजन्सीकडे असेल तसेच रुग्णास भेट देण्याकरीता येणारे नातेवाईक तसेच इतर नागरीकांचे दुचाकी वाहन पार्किंगमध्ये पार्क होणार नाही.

कर्मचा-यांच्या वाहनांसाठी ठराविक आकार आकारणेत येवुन श्री साईबाबा संस्थानच्या सोसायटीला किंवा परवाना धारक पार्किंग एजन्सीला नियम व अटीच्या अधिन राहुन साईनगर मैदान डॉक्टर व स्टाफ पार्किंग ठराविक भाडेतत्वावर चालविणेस देता येईल.मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयास्तव सादर.

(सोबत अशा प्रकारची मागणी केलेल्या कर्मचा-यांचे निवेदन जोडत आहे.)

**(ब)** थोर संत श्री साईबाबांच्या रुग्णसेवेचा वसा चालवत दुरवरुन गरीब, दुबळया, रुग्णांचे सेवेसाठी श्री साईबाबा संस्थानने श्री साईनाथ जनरल व श्री साईबाबा हॉस्पिटल सुपर स्पेशलीटी ची स्थापना केली दररोज हजारो लोक श्री हॉस्पिटलमधुन उपचार घेत असतात.

श्री साईबाबा सुपर स्पेशलीटी हॉस्पिटलमध्ये रुग्णांची आर्थिक स्थीती त्यांचे रेशनकार्ड पाहुनच त्यांना उपचारामध्ये सवलत दिली जाते. रुग्णांचे सवलतीचे बिलाचे, रिपोर्टसचे झेरॉक्स करीता कागदपत्रे करणेकरीता तसेच रुग्णालयात कार्यालयीन कामकाजाकरीता एकच झेरॉक्स मशीन आहे बरेच वेळेस ते बंद असते त्यामुळे कार्यालयीन कामकाजात कागदपत्रांचे झेरॉक्सच्या अडचणी निर्माण होतात.श्री साईबाबा हॉस्पिटलच्या आसपास झेरॉक्स नसल्याने तसेच दुरवर खाजगी झेरॉक्सवरुन झेरॉक्स प्रती काढावे लागते दुरवर असल्याने रुग्णांचे नातेवाईक यांचे लक्षात येत नाही तसेच येणे जाण्यात वेळ ही जास्त वाया जातो तसेच खाजगी झेरॉक्स दुकानदार चार्जेसही जास्त लावतात.

श्री साईबाबा हॉस्पिटलच्या आवारात श्री साईबाबा संस्थान कर्मचारी सोसायटीला हॉस्पिटलच्या नियंत्रणाखाली भाडे तत्वावर कॅन्टीनमध्ये झेरॉक्स मशीनसाठी परवानगी दिली तर रुग्णांचे नातेवाईक तसेच गरज पडली तर कार्यालयीन कामकाजासाठी झेरॉक्स करणे सोईचे होईल तसेच हॉस्पिटलचे नियंत्रणाखाली असल्याने रुग्णांचे नातेवाईकांना त्रास होणार नाही तसेच त्यापासुन श्री साईबाबा संस्थानला आर्थिक फायदा होईल. झेरॉक्स मशीनची मागणी हि ब-याच दिवसापासुन असुन ही तातडीची व निकडीची बाब आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल कॅन्टीन विभागात झेरॉक्स मशीन बसविणेस तसेच श्री साईबाबा संस्थान सोसायटीस भाडेतत्वावर चालविणेसाठीचा विषय निर्णयार्थ सादर.

उपरोक्त परिशिष्ट अ व ब मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर मैदानावरील डॉक्टर व स्टाफ पार्कींग भाडेतत्वावर चालविणेस देणेस मान्यता देण्यात आली. परंतु संस्थानमार्फत विविध उत्सवांमध्ये साईनगर मैदानावर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असते त्यामुळे तेथे पार्किंसाठी शेड तयार न करता, आहे ते शेडही काढून घेण्यात यावे.**

**तसेच विविध कामांसाठी रुग्णांच्या नातेवाईकांना झेरॉक्स गरज भासते, याकरीता श्री साईबाबा संस्थान कर्मचारी सोसायटीला हॉस्पिटलडील कॅन्टीन विभागामध्ये BOT तत्वावर झेरॉक्स मशीन चालविणेस देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१५** **Vidas PC मशिन करीता Liner Support (SPR Block)- 2 नग खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे पॅथोलॉजी लॅब विभागाकरीता पुरवठा आदेश क्र.1755 दि. 29/01/2008 अन्वये मे. बायोमेरिक्स इंडिया प्रा.लि. नवी दिल्ली या कंपनीचे एक Mini Vidas PC हे Automated Immunoassay Analyzer हे मशिन एकुण रु. 15,50,000/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर मशीनवर रूग्णाचे विविध प्रकारचे हार्मोन्स, ॲलर्जी, टयुमर मार्कर्स, तसेच विविध प्रकारच्या संसर्गजन्य आजाराच्या तपासण्या केल्या जातात. सदर मशीनकरीता कंपनीने दिलेला एक वर्षांचा वॉरंटी कालावधी दि. 27/03/09 रोजी संपला आहे. पुढील कालावधीत मशीनचे दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीकडे दि. 01/04/2016 ते दि. 31/03/2017 या कालावधीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत येत आहे.सदर कालावधीत दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक असलेले स्पेअर पार्ट व कन्झ्युमेबल ॲक्सेसरीज संस्थानला स्वखर्चाने बदलावे लागणार आहेत.

सध्या उपरोक्त मशिन व्यवस्थित काम देत नसल्याचे सदर विभागाने कळविले आहे. त्यानुसार कंपनी इंजिनीअर तातडीच्या भेटी करीता आले त्यांनी सदर मशिनची तपासणी करून Liner Support for Door (SPR Block)- 2 नग हे पार्ट खराब झाल्यामुळे बदलणेची आवश्यकता असल्याचे सर्व्हीस रिपोर्ट दि. 27/09/2016 अन्वये कळविले आहे. सदर मशिन नियमीत वापरात असल्याने दुरूस्त करणे आवश्यक आहे. त्यानुसार कंपनीने त्यांचे पत्र क्र.BMX/WII/20170123-1, दि. 23/01/2017 अन्वये Liner Support (SPR Block)- 2 नग खरेदी करणेसाठी सर्व करांसहीत एकुण रु. 69,499/- (अक्षरी रु. एकोणसत्तर हजार चारशे नव्यान्नव मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे.सदर रकमेची कंपनीने आगाउ मागणी केली आहे.परंतु कंपनी प्रतिनिधीसोबत झालेल्या चर्चेनंतर सदर रक्कम उपरोक्त पार्ट श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये प्राप्त झालेनंतर अदा होणेस कंपनीने स्वीकृती दर्शविली आहे.

सदर मशिनचे स्पेअर पार्ट हे विशिष्ट रचना व स्पेसीफिकेशन असलेले असतात. त्यामुळे इतर पुरवठाधारक कंपनीकडे उपलब्ध होत नाही. तसेच सदर कंपनी हे एकमेव पुरवठाधारक आहेत. त्यामुळे

मे.बायोमेरिक्स इंडिया प्रा.लि. नवी दिल्ली यांचेकडुन Liner Support (SPR Block) -02 नग खरेदी करणेस हरकत नाही. तसेच एकल स्त्रोताकडुन खरेदी करण्यासाठी खरेदीदार विभागप्रमुखाने द्यावयाचे प्रमाणपत्र देखील जोडले आहे.

तरी मे.बायोमेरिक्स इंडिया प्रा. लि. नवी दिल्ली यांचेकडून Vidas PC मशिन करीता Liner Support (SPR Block) - 2 नग खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलच्या पॅथोलॉजी लॅब विभागामधील Vidas PC मशिन करीता 2 नग Liner Support (SPR Block) प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मे.बायोमेरिक्स इंडिया प्रा. लि. नवी दिल्ली यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१६** **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT-1 या विभागाकरीता Anaesthesia Machine खरेदी करुन जुने Anaesthesia Machine परत (Buyback) करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील CVTS OT-1 या विभागाने दि.२९/०१/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये Anaesthesia Machine १ नगाची मागणी केलेली आहे.

CVTS OT-1 विभागामध्ये सध्या एक Dragger कंपनीचे Model Fabius Plus Anaesthesia Machine असून ते सन २००५ मध्ये रक्कम रु.१३,५०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आले होते. सदर मशिनचा उपयोग भुल देण्याकरीता व शस्त्रक्रिया करताना कृत्रिम श्वासोच्छवास देण्याकरीता केला जातो. सदरहू मशिन सध्या वारंवार बंद पडत आहे, तसेच Dragger कंपनीचे इंजिनीअर यांनी दि.२२/०१/२०१६ रोजीचे पत्रान्वये कंपनीने उपरोक्त मॉडेलचे उत्पादन बंद केलेले असून मशिनचे स्पेअर्स पार्टस उपलब्ध होणार नाहीत असे कळविलेले आहे. त्यामुळे CVTS OT-1 या विभागाने Anaesthesia Machine ची मागणी केलेली आहे. तसेच बायोमेडीकल विभागाने जुने मशिन बायबॅक करुन नविन Anaesthesia Machine खरेदी करणेबाबत शिफारस केलेली असून जुन्या मशिनची दि.३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रु.५७,०१७/- इतकी आहे. तसेच नविन मशिन खरेदीकामी अंदाजे खर्चाकरीता खालील पुरवठाधारकांकडून दरपत्रक मागविण्यात आलेले आहे.

| S.No. | Name of Supplier | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt.in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Axenic Labs Pvt.Ltd., Nashik | 01 | 397250.00 | 397250.00 |
| 2 | Maxon LifeCare Pvt.Ltd., Ahmednagar | 01 | 806400.00 | 806400.00 |
| 3 | Meditech Engineers Pvt.Ltd., Delhi | 01 | 462000.00 | 462000.00 |
| | **Total -** | | | **1665650.00** |
| | **Average Amt.-** | | | **555216.67** |
| | **- 20% Less -** | | | **444173.33** |

उपरोक्त दरानुसार वरील ०१ नग Anaesthesia Machine खरेदीकामी रु.४,४४,१७३/- (अक्षरी रक्कम रु.चार लाख चौरेचाळीस हजार एकशे त्र्याहत्तर मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**<u>मागणी</u> –** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील CVTS OT-1 या विभागाने दि.२९/०१/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि.१५/०२/२०१६) मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना

रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

३) जुन्या Anaesthesia Machine ची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१६ अखेर किंमत रु.५७,०१७/- इतकी येत आहे. सदरची रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं. १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** CVTS OT-1 विभागामध्ये सध्या असलेले Anaesthesia Machine सन २००५ मध्ये खरेदी करण्यात आले होते. सदरहू मशिन जुने झाल्यामुळे वारंवार बंद पडत आहे, तसेच कंपनीने देखील उपरोक्त मॉडेलचे उत्पादन बंद केलेले असून मशिनचे स्पेअर्स पार्टस उपलब्ध होणार नाहीत असे कळविलेले आहे. त्यामुळे CVTS OT-1 या विभागाकरीता जुने मशिन बायबॅक करुन नविन मशिन खरेदी करुन देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तसेच जुन्या मशिनची दि.३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रु.५७,०१७/- इतकी येत आहे. सदरची रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील CVTS OT-1 विभागाकरीता जुने Anaesthesia Machine परत (Buyback) करुन नविन Anaesthesia Machine विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.४,४४,१७३/- (अक्षरी रक्कम रु.चार लाख चौरेचाळीस हजार एकशे त्र्याहत्तर मात्र) चे खर्चास तसेच जुने Anaesthesia Machine परत (Buyback) करणेकामी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग यांची मान्यता घेणेकामीचे प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१८६** **यावर सविस्तर चर्चा हाऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलच्या CVTS OT-1 विभागामधील जुने Anaesthesia Machine परत (Buyback) करुन नविन Anaesthesia Machine खरेदी करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच जुने Anaesthesia Machine Buyback करणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१७** **श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता Warmar Blanket खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- नवीन प्रस्ताव**

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील GICU / ICCU / CVTS O.T.-1 करीता प्रत्येकी ०१ नग व साईनाथ रूग्णालयातील Surgical ward या विभागाने ०२ नग असे एकुण ०५ नग नवीन Warmar Blanket ची मागणीपत्रकान्वये मागणी केलेली आहे.

सदर वार्डमध्ये काही औषधे दिल्यानंतर पेशंटला थंडी वाजून येते त्यावेळी पेशंटला उष्णतेची गरज असते अशा वेळी सदर मशिन व ब्लॅकेटव्दारे रुग्णांचे शरीराचे तापमान स्थिर ठेवले जाते. सदर विभागामध्ये Warmar Blanket उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी नवीन ०५ नग Warmar Blanket मागणी केली आहे.

उपरोक्त विभागांसाठी ०५ नग Warmar Blanket खरेदीकामी अंदाजे रक्कमेसाठी काही पुरवठाधारकांना मेल करण्यात आले होते. त्यांनी दिलेल्या अंदाजे रक्कमेचा तक्ता खालीलप्रमाणे:-

| Sr. No. | Supplier Name | Qty. | Estimate cost (in Rs.) | Total Amt. | Waranty |
|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Amruta Surgical & Pharmaceutical Distributors, Pune | 5 | 1,53,225.00 | 7,66,125.00 | 1 Year |
| 2 | M/s. Shri Ganesh Enterprises, Pune | 5 | 1,58,900.00 | 7,94,500.00 | 1 Year |
| 3 | M/s. Sanjeevani Enterprises, Pune | 5 | 1,36,200.00 | 6,81,000.00 | 1 Year |
| 4 | M/s. Maquet Getting Group, Mumbai | 5 | 55,459.13 | 2,77,296.00 | 6 Month |
| | | | Avarage Amt.In Rs. | 6,29,730.25 | |
| | | | 20% Less | **5,03,784.20** | |

उपरोक्त Warmar Blanket खरेदीकामी प्राप्त झालेल्या पुरवठाधारकांचे अंदाजे खर्चासाठी दरपत्रकाची सरासरी रक्कम रू.५,०३,७८४.०० (अक्षरी रू.पाच लाख तीन हजार सातशे चौ-याऐंशी मात्र) इतकी येते.

**मागणी–** श्री साईनाथ व साईबाबा हॉस्पिटलमधील विविध विभागांनी मागणीपत्रकान्वये मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२ /भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील GICU/ ICCU / CVTS O.T.-1 व साईनाथ रूग्णालयातील Surgical ward या विभाग/वार्डमध्ये काही औषधे दिल्यानंतर पेशंटला थंडी वाजून येते त्यावेळी पेशंटला उष्णतची गरज असते अशा वेळी सदर मशिन व ब्लॅंकेटव्दारे रुग्णांचे शरीराचे तापमान स्थिर ठेवले जाते. सदर विभागामध्ये Warmar Blanket उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी नवीन ०५ नग Warmar Blanket ची मागणी केली आहे.त्यामुळे त्यांच्या मागणीनुसार विहीत पध्दतीने ०५ नग Warmar Blanket खरेदी करुन देता येईल असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पिटलमधील विविध वार्ड/ विभागाकरीता ०५ नग नवीन Warmar Blanket विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू.५,०३,७८४.०० (अक्षरी रू. पाच लाख तीन हजार सातशे चौ-याऐंशी मात्र) चे खर्चास मान्यता घेणेकामीच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पिटलमधील विविध वार्ड/ विभागाकरीता ०५ नग नवीन Warmar Blanket विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,०३,७८४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१८** **श्री साईबाबा व साईनाथ या दोन्ही रुग्णालयात येणाऱ्या औषधे/ सर्जिकल साहित्यांच्या तुटवडयाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व साईनाथ या दोन्ही रूग्णालयासाठी लागणारे औषधे/ सर्जिकल साहित्य हे वार्षिक मागणीन्वये एक वर्षासाठी खरेदी केली जातात परंतु सध्याची परिस्थिती पाहता सध्या रूग्णांसाठी दि.२८/०७/२०१५ व दि. १३/११/२०१५ अन्वये देण्यात आलेल्या पुरवठा आदेशातील मटेरियलचा वापर करण्यात येत आहे व सन २०१०६-१७ ची वार्षिक खरेदीस तत्वत: मान्यता मिळाली असून त्याकामी Demand Committee व Specification Committe व्दारे Demand व Specification मध्ये सुधारणा करून त्यानंतर निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असून त्यामुळे नविन निविदेची औषधे/सर्जिकल साहित्य आपणाकडे उपलब्ध होण्यास कमीत-कमी ४-५ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. तसेच सध्या आपण सन २०१६-१७ ची औषध खरेदीची प्रक्रिया करीत आहोत परंतु प्रत्यक्षात ती खरेदी सन २०१७-१८ ची होणार आहे.

सन २०१५-१६ चे वार्षिक खरेदीमध्ये खालीलप्रमाणे औषधे/सर्जिकल साहित्यांचा तुटवडा भासत आहे.

**सन २०१५-१६ मधील औषधांच्या तक्रारीबाबत:-** काही कंपन्यांचे औषधे/सर्जिकल साहित्यांची डॉक्टरांकडून तक्रार आल्यामुळे सदर विषय हा मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात आलेला होता त्यानुसार मा. विश्वस्त ॲड. मोहन जयकर सो. यांचे मार्फत मसुदा तयार करण्यात यावा असे ठरले होते. त्यानुसार मसुदा

तयार करून पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला आहे तसेच सध्या काळया यादीत टाकण्यात आलेले औषधे/सर्जिकल साहित्य हे दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असतात सदर औषधे/सर्जिकल साहित्य नसल्यास ओ.टी. मधील दैनंदिन शस्त्रक्रिया करण्यास अडचणी निर्माण होत आहे.

**पुरवठा धारकांकडून मटेरियल पुरवठा करणेबाबत-**

अ) सन २०१५-१६ मधील काही पूरवठाधारक हे पुरवठा आदेश दिल्यानंतर मालाचा पुरवठा करणेकामी संस्थानचे अटी व शर्ती पेक्षा जास्त कालावधी घेऊन माल पाठवत आहे त्यामुळे सुध्दा काही प्रमाणात मटेरियल तुटवडा भासत आहे.

आ) सन २०१५-१६ मधील पुरवठा आदेश दि २२/०७/२०१५ त दि. १३/११/२०१५ रोजी देण्यात आले होते त्यानुसार आपले विहित मुदतीने १ वर्षाचा कालावधी पुर्ण झाला असल्यामुळे सुध्दा पुरवठाधारक मटेरियल पाठवत नाही तसेच शासन नियमावली नुसार Vat मध्ये १% ने वाढ झालेली आहे. आपण दिलेल्या पुरवठा आदेशातील दर सुध्दा वाढविणे गरजेचे आहे परंतु आपणास निविदा व पुरवठा आदेशातील नियमानुसार मागील दरानेच माल घेत असल्यामुळे बरेच पुरवठाधारक त्यामुळे आपणास दर न वाढविल्यामुळे मालाचा पुरवठा करत नाही. त्यामुळे सुध्दा रूग्णालयात दैनंदिन उपचार घेणा-या रूग्णांना औषधे/ सर्जिकल साहित्याचा तुटवडा भासत आहे, अथवा काही पुरवठाधारक हे तोटा सहन करून मटेरिअल पाठवत आहेत. तसेच याकामी आपण जर पुरवठा न करणा-या पुरवठा धारकांचे मटेरिअल दुस-या पुरवठाधारकांकडून खरेदी केल्यास संस्थान नियमांने त्यासाठी येणारा जास्तीचा खर्च प्रथम पुरवठा धारंकांचे बील/ सुरक्षा रक्कमेतुन वसूल करत असतो परंतु पुरवठा आदेश देऊन १ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला असून त्यावर कमीत-कमी २-३ महिने जास्त झाले आहे तेव्हा त्यांचे कडून प्राप्त न झालेले मटेरिअल दुस-याकडून खरेदी करून जास्तीची रक्कम प्रथम पुरवठा धारकाकडून वसुल करणे नियमानुसार उचित होणार नाही अथवा त्या बाबत पुढील निर्णय घ्यावा ही विनंती.

इ) पुरवठा आदेशामधील काही मटेरिअल हे Monopoly असल्यामुळे त्याच कंपनीकडे मिळणारे असल्याने ते दुसरीकडे मागवून देखील मिळत नाही त्यामुळे देखील औषधांचा तुटवडा भासत आहे.

**<u>Retender Material:-</u>** सन २०१५-१६ मध्ये वार्षिक पुरवठा आदेश देण्यात आलेल्या Item पैकी काही Item करीता Retender Process करण्यात आलेले आहे. परंतु त्यामध्ये देखील काही Item करीता तीन पेक्षा कमी पुरवठाधारकांनी ई-निविदा न भरल्यामुळे व तसेच काही Item करीता ०३ ई-निविदा आलेल्या आहे त्यामध्ये देखील पुरवठाधारकांनी Technical Specification न भरल्यामुळे त्या Item_चा देखील तुटवडा भासत आहे. यापुर्वी आपण मटेरिअल हे गरजेपुरते तातडीने खरेदी करून मागविण्यात येत होते परंतु सध्या नविन नियमावलीनुसार खरेदी करणे शक्य होत नाही.

**<u>Specific Co.ची अथवा नविन मागणी किंवा Specification problem मुळे परत केलेले:-</u>**

सन २०१५-१६ मध्ये वार्षिक पुरवठा आदेश देताना L1 निविदाधारकाला पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. मागील काही वर्षापासून वार्षिक पुरवठा आदेश देताना डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पुरवठा आदेश देण्यात येत होता. सध्या खरेदी करण्यात आलेल्या Item चा अनुभव डॉक्टरांना नसल्यामुळे ते वापरण्यास तयार नाही त्यामुळे आपल्याकडे असलेले औषधे /सर्जिकल न वापरल्यामुळे रूग्णालयात औषधांचा तुटवडा जाणवत आहे तसेच काही औषधे हे आपल्या Specification प्रमाणे नसल्यामुळे देखील औषधांचा तुटवडा जाणवत आहे.

**<u>Non-Moving/ Near Expiry मटेरियल Return केल्यामुळे:-</u>** मागील २ ते ३ वर्षापूर्वी काही मटेरिअल हे फार मोठया प्रमाणात खरेदी करण्यात आलेले होते.परंतु मागील २ वर्षापासून रूग्णांची संख्या कमी झाल्यामुळे व तेव्हा संस्थानमध्ये असलेले डॉक्टर सोडून गेल्यामुळे औषधांचा खप कमी झालेला आहे व त्यामधील काही मटेरिअल हे Near Expiry असल्यामुळे पुरवठाधारकास औषध भांडारात शिल्लक असलेला माल परत करण्यात आलेला आहे. त्यामुळे पुरवठाधारकाचे मते तुम्ही मटेरिअल मोठया प्रमाणात मागवितात व नंतर आम्हाला परत करतात. त्यामुळे ते आत्ता पुरवठाआदेशातील मटेरिअलचे पुरवठा करण्यास तयार नाही.

**<u>अतिरिक्त मागणी:-</u>** सन २०१५-१६ मध्ये देण्यात आलेला पुरवठा आदेशातील काही मटेरिअलची वार्षिक नगसंख्या संपल्यामुळे पुन्हा मंजुर दराने प्रस्ताव ठेवण्यात आले आहे परंतु सध्याच्या नविन नियमावलीनुसार वार्षिक मागणीचा साठा संपल्यास पुरवठा आदेशाच्या पुढील सहा महिन्यात एकूण वार्षिक मागणीच्या ५०% मागणी करता येईल त्यानुसार प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर ठेवण्यात आलेला आहे परंतु यापूर्वी वार्षिक पुरवठा आदेश संपल्यानंतर मागील मंजुर दराने मा. कार्यकारी साहेब यांचे स्वाक्षरीने

खरेदी करणेत येऊन प्रस्तावास नोंद घेण्यासाठी मा. व्य. सभेसमोर ठेवण्यात येत होता. त्यामुळे देखील औषधांचा तुटवडा भासत आहे.

**तातडीची खरेदीची नियमावली:-** संस्थान अधिनियम क्र. १७-२(ण) अन्वये मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे, त्यानुसार संस्थान तर्फे दोन धर्मादाय रूग्णालये चालविण्यात येतात. तसेच एका वस्तुची खरेदी एका महिन्यात रू. ५०००/- पेक्षा जास्त नसावी. शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

यापूर्वी रू. ३०००० पर्यत तातडीची खरेदीचे अधिकार वैद्यकीय संचालक यांना देण्यात आलेली होती. सध्या रू. ५०००/- पेक्षा कमी दराचे मटेरिअल खरेदी करणेपूर्वी त्याची बाजारभावात दर हे वाजवी असल्याची खात्री करण्यात यावी त्यानंतरच खरेदी करण्यात यावी त्यामुळे देखील औषधे खरेदी करण्यास विलंब होत आहे.

**देणगी स्वरूपात मटेरिअल मिळणेकामी:-**

तुटवडा असलेल्या तसेच Black listed Item हे देणगीद्वारे मिळावे म्हणून कार्यवाही करण्यात आलेली असून त्याद्वारे सुध्दा अजुन आपणास औषधे उपलब्ध झालेली नाही.

**शिबीर आयोजनासाठी लागणारी औषधे/सर्जिकल साहित्य :-**

आपले संस्थानचे रूग्णालयामार्फत मागील सहा महिन्यापासून मनमाड, येवला, तांदुळनेर व पाचेगाव (नेवासा) येथे प्रथमोपचार शिबीर आयोजीत करण्यात आले होते त्यासाठी कमीत-कमी ७००० पेशन्टची प्राथमिक तपासणी करण्यात येऊन त्यांना आपले संस्थानमार्फत गोळया, औषधे पुरविण्यात आलेले आहे. सदर पुरविण्यात आलेले गोळया, औषधे ही आपले मेडीकल स्टोअरमार्फत देण्यात आले असून ती आपले वार्षिक मागणीतून प्राप्त झालेल्या औषधामधून पुरविण्यात आलेली आहे, त्यामुळे सहाजिकच आपले दैनंदिन साठांवर त्यांचा परिणाम झालेला आहे यामुळे आपल्याला कमी येणारा साठा आपण अतिरिक्त खरेदीतून करता आली असती परंतु सध्याचे नविन नियमावलीद्वारे अतिरिक्त खरेदी ही फक्त वार्षिक मागणीच्या ५०% मागणी ही पहिल्या सहा महिन्यात करता येईल.

वरील सर्व बाबीमुळे औषधे/सर्जीकल साहित्य पुरवठयास फार मोठया प्रमाणात अडचणी निर्माण होत असल्यामुळे हॉस्पिटलमधील कर्मचारी व गरजु रुग्णांना औषधे उपलब्ध करता येत नाही. तसेच दोन्ही रूग्णालयात रूग्णांवर होणा-या दैनंदिन शस्त्रक्रिया करता येणार नाही.

तरी वरील सर्व बाबींवर योग्य तो निर्णय होण्याचा प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन करणेत येऊन, सदरहू प्रस्ताव रुग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१९** **साईआश्रम भक्तनिवास A व B ब्लॉकचे प्लंबींग मेन्टेनन्स करणेकरीता साहित्य (मटेरीयल) खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, 2004 मधील तरतूद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| 01 | 17 | समितीची कर्तव्ये व अधिकार | 1 | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| 02 | 17 | समितीची कर्तव्ये व अधिकार | 2 (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| 03 | 17 | समितीची कर्तव्ये व अधिकार | 6 | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |
| 04 | 21 | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | 1 (त्र) | भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे. |

**प्रस्तावना:-** शिर्डी साई ट्रस्ट चेन्नई यांचे आर्थिक देणगीतून संस्थान मालकीच्या मौजे शिर्डी हद्दीतील सर्व्हे नं.107, 108, 109 पैकी मधील जमिनीमध्ये साईआश्रम प्रकल्प भाग 1 (साईआश्रम भक्तनिवास) या निवासी प्रकल्पाची उभारणी करण्यात आलेली आहे. सदरहू निवासी प्रकल्पातील खोल्या/हॉल साईभक्तांना निवासासाठी सन 2012 पासून उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सदरहू इमारतीमधील खोल्या/हॉल सततच्या वापराने रुममधील फ्लश व फ्लशचे स्पेअर पार्ट हे नादुरुस्त (खराब) होण्याच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. सदरहू इमारतीचे यापुर्वीचे प्लंबींग कॉन्ट्रक्टर यांनी इमारतीमधील प्लंबींग साहित्य हे मेट्रो कंपनीचे वापरलेले आहे. प्लंबींग मेन्टेनंस करतेवेळी सदरचे साहित्य नाशिक, औरंगाबाद, पुणे, अहमदनगर, मुंबई या ठिकाणी उपलब्ध नसलेचे आढळून आलेले आहे. मेन्टेनंस करतेवेळी दुस-या कंपनीच्या साहित्याची त्या ठिकाणी जुळणी करता येत नाही. रुममधील फ्लशचे मेन्टेनंस करतेवेळी सदर अडचणी मोठया प्रमाणावर येत आहे. यामुळे प्लंबींग तक्रारींचे निवारण वेळेत होत नसल्याने रुम बंद ठेवावे लागल्याने संस्थानचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच रुममध्ये ऐनवेळी लिकेज झाल्यास तक्रार निवारण करणेस उशिर झाल्यास साईभक्तांचे रोषास सामोरे जावे लागत आहे. रुममधील तक्रारींचे निवारण करणेबाबत साईआश्रम भक्तनिवास यांचेकडून वेळोवेळी कळविण्यात येत आहे. परंतू यापुर्वी वापरण्यात आलेले मटेरियल उपलब्ध नसलेने तसेच दुस-या कंपनीचे साहित्य वापरण्यास अडचण येत असल्याने तक्रारींचे निवारण होत नाही.

**प्रस्ताव:-** याकरीता यापुर्वी वापराण्यात आलेले साहित्य उपलब्ध होत नसलेने सदरचे साहित्य बदलून त्याठिकाणी सहज उपलब्ध होणारे कंपनीचे साहित्य खरेदी करुन बसविणे योग्य राहील. साईआश्रम भक्तनिवास इमारतीमध्ये एकुण 12 ब्लॉक आहेत. त्यापैकी सुरुवातीस A व B या दोन ब्लॉक मधील प्लंबींग मटेरियल बदली करता येईल. सदरचे काम करतेवेळी रुममधील संडास व बाथरुमधील स्टाईल तोडुन काम करावे लागेल. स्टाईल खरेदी करणे व नव्याने पुन्हा बसविणे इ. कामे बांधकाम विभागाकडुन करता येतील. त्यानंतर टप्प्याटप्प्याने इतर ब्लॉकमधील इमारतीचे प्लंबींग मटेरियल खरेदी करुन बदली करणेचे काम पाणी पुरवठा विभागांतर्गत करता येईल.

**मागणी:-** तुर्त साईआश्रम भक्तनिवास इमारत A व B ब्लॉककरीता खालीलप्रमाणे प्लंबींग मटेरियल खरेदी करावे लागेल. याबाबत स्थानिक ठिकाणी चौकशी केली असता, खालीलप्रमाणे दर उपलब्ध असलेचे आढळून आलेले आहे.

| अ.नं. | साहित्य तपशिल | कंपनी | परिमाण | एकक | अंदाजे दर प्र.नग/फुट | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1" फ्लश कॉक (U1509) | प्लंबर | 256 | नग. | 2475.00 | 633600.00 |
| 2 | 1" यु.पि.व्ही.सी. पाईप (80) | फिनोलेक्स | 1800 | फुट | 33.00 | 59400.00 |
| 3 | 1" यु.पि.व्ही.सी. ब्रास थ्रेडर (आतील आटे) | फिनोलेक्स | 512 | नग. | 135.00 | 69120.00 |
| 4 | 1" यु.पि.व्ही.सी. ब्रास थ्रेडर (बाहेरील आटे) | फिनोलेक्स | 512 | नग. | 195.00 | 99840.00 |
| 5 | 1" यु.पि.व्ही.सी. एलबो | फिनोलेक्स | 300 | नग. | 21.00 | 6300.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 1/2" सी.पि.व्ही.सी. ब्रास टी. | फिनोलेक्स | 260 | नग. | 55.00 | 14300.00 |
| 7 | 1/2" ॲंगल कॉक (EC-0507) | प्लंबर | 260 | नग. | 650.00 | 169000.00 |
| 8 | कमोड शिट कव्हर, आयव्हरी कलर | कमांडर | 256 | नग. | 350.00 | 89600.00 |
| 9 | सी.पी.जेट स्प्रे, विमान टाईप (U-1905) | प्लंबर | 256 | नग. | 780.00 | 199680.00 |
| 10 | कमोड संडास भांडे, आयव्हरी कलर | पॅरिवेअर | 30 | नग. | 1300.00 | 39000.00 |
| 11 | नेटल फोल्ड सी.पी.स्क्रु- 75/10 | --- | 8 | पुडे | 550.00 | 4400.00 |
| 12 | सी.पि.व्ही.सी. सोल्युशन (200 ग्रॅम पॅक) | फिनोलेक्स | 20 | पॅक | 310.00 | 6200.00 |
| 13 | यु.पि.व्ही.सी. सोल्युशन (237 ग्रॅम पॅक) | फिनोलेक्स | 22 | पॅक | 250.00 | 5500.00 |
| | | | | | एकुण- | 1395940.00 |
| | | | | | **वॅट-** | 188451.90 |
| | | | | | **एकुण पुर्णांकित रक्कम रुपये-** | **1584392.00** |

**विभागाचे स्पष्ट मत / अभिप्राय:-** साईआश्रम भक्तनिवास येथील रुममधील फ्लशचे मेन्टेनंस करतेवेळी सदर अडचणी मोठया प्रमाणावर येत आहे. यामुळे प्लंबींग तक्रारींचे निवारण वेळेत होत नसल्याने रुम बंद ठेवावे लागल्याने संस्थानचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच रुममध्ये ऐनवेळी लिकेज झाल्यास तक्रार निवारण करणेस उशिर झाल्यास साईभक्तांचे रोषास सामोरे जावे लागत आहे. तसेच यापुर्वी वापरण्यात आलेले मटेरियल उपलब्ध नसलेने व दुस-या कंपनीचे साहित्य वापरण्यास अडचण येत असल्याने तक्रारींचे निवारण होत नाही. श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम 2004 नुसार वरील नमुद तरतुदीस अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेतल्यानंतर वरील तपशिलानुसार नमुद मटेरियल (साहित्य) खरेदी विभागामार्फत ई-निविदा मागवून खरेदी करता येतील असे मत आहे.

वरीलप्रमाणे नमुद साहित्य (मटेरियल) खरेदी करणेसाठी अंदाजे रु.15,84,392/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे साहित्य खरेदी विभागामार्फत ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.15,84,392/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.१८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास A व B ब्लॉकचे प्लंबींग मेन्टेनन्स करणेकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्य (मटेरीयल) विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२०** **श्री साईप्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधील फ्लोअरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ ट्रेमिक्स कॉंक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन फ्लोअरींग व डॅडो बसविणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ (१) पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना-** दि.०८/०१/२००९ पासून श्री साई प्रसादालय इमारतीमध्ये साईभक्तांना प्रसाद भोजन देणेस सुरुवात करण्यात आली. श्री साई प्रसादालय येथे सरासरी दैनंदिन सुमारे ४०,००० साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. श्री साई प्रसादालय हॉलमध्ये सध्या व्हेट्रीफाईड टाईल्सचे फ्लोअरींग आहे. प्रसादालयामध्ये प्रसाद भोजन पदार्थ वाढणेची ट्रॉली, खरकटे ताटे वाहणेची ट्रॉली व पिण्याचे पाणी वाटप करणेची ट्रॉली तसेच प्रसाद भोजनाचा आस्वाद घेणा-या साईभक्तांची व प्रसादालयातील कर्मचा-यांची वर्दळ व डायनिंग टेबलाचे हॅन्डलींग होत असल्याने प्रसादालयात बसविण्यात आलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स फ्लोअरींगची दिवसेंदिवस जास्त प्रमाणात फुटतूट होते. त्यासाठी इकडील विभागामार्फत प्रसादालय हॉल मधील व्हेट्रीफाईड फ्लोअरींगची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात येते. प्रसादालय हॉल मधील व्हेट्रीफाईड टाईल्स पूर्णतः बदलून येथील फ्लोअरींगचे नूतनीकरण करणेबाबत अधिक्षक, श्री साई प्रसादालय विभाग यांनी कळविले आहे.

श्री साई प्रसादालयाचे मुख्य किचन व बुंदी किचनमध्ये सध्या ट्रिमिक्स कॉन्क्रीट फ्लोअरींग केलेली आहे. सदर ठिकाणी स्वयंपाक तयार करणेसाठी मोठया स्वरुपाचे भांडे वापरण्यात येतात व किचनमध्ये कायमचा ओलावा असतो त्यामुळे किचन मधील काही भागातील ट्रिमीक्स कॉन्क्रीटला खड्डे पडलेले आहेत. प्रसादालयात प्रसाद भोजन बनविणेचे काम दररोज सुरुच असल्याने सदरच्या ठिकाणी दुरुस्ती केल्यानंतरही ती फार काळ टिकत नाही. याकरीता सदर ठिकाणी नवीन फ्लोअरींग करणे गरजेचे आहे.

श्री साई प्रसादालय मुख्य डायनिंग हॉल मधील सध्याची फ्लोअरींग काढून सदर ठिकाणाचा वापर लक्षात घेऊन हेवी डयुटी फ्लोअरींग बसविणेकामी आर्किटेक्ट शक्ती परमार अॅण्ड असो., मुंबई यांना फ्लोअरींगचा पर्याय सुचवून येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक देणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार आर्किटेक्ट शक्ती परमार यांचे प्रतिनिधींची शिर्डी येथे भेट देऊन श्री साई प्रसादालयाचे मुख्य प्रसादभोजन हॉलची पाहणी केली. सदर हॉलमध्ये चांगली स्वच्छता रहावी यासाठी सदर ठिकाणी हेवी डयुटी ग्रेनाईट फ्लोअरींग बसवावी असे त्यांनी सूचविले. सदर कामासाठी आर्किटेक्ट शक्ती परमार अॅण्ड असो., मुंबई यांनी याकामी रक्कम रु.१,५०,८५,०७९/- मात्र खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले. याशिवाय प्रसादालयातील हॉल मधील फ्लोअरींग करीता पॉलिश कॉन्क्रीट इंडस्ट्रीयल फ्लोअरींग व २० mm जाड Endura flooring किंवा त्याप्रकारच्या इतर कंपनीच्या हेवी डयुटी फ्लोअरींग टाईल्स हे पर्याय उपलब्ध आहेत.

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयाचे मुख्य प्रसाद भोजन हॉलमध्ये (क्षेत्रफळ फ्लोअरींग – ४१४४ चौ.मी., डॅडो – ५३६.४० चौ. मी.) फ्लोअरींगचे नूतनीकरण करणेकामी खालील तिन पर्यायांचा विचार करता येईल.

| पर्याय क्रमांक | तपशिल | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| **पर्याय क्र. १** | **ग्रेनाईट फ्लोअरींग -**<br>श्री साई प्रसादालयामध्ये आर्किटेक्ट शक्ती परमार अॅण्ड असो., मुंबई यांनी सुचविल्याप्रमाणे प्रसादालयाचे मुख्य भोजन हॉलचे फ्लोअरींग व डॅडो करीता १८ ते २० एमएम जाड ग्रेनाईट स्टोन बसविणे व पाणी वाहून जाण्यासाठी स्टेनलेस स्टील नाल्या बसविणे. | **रु.१.५१ कोटी** |
| **पर्याय क्र.२** | **इंडयुरा फ्लोअरींग -**<br>श्री साईप्रसादालयातील मुख्य भोजन हॉल मध्ये Endura Kreo प्रकारची 20 mm जाडीची व्हिट्रीफाईड फ्लोअरिंग बसविणे व पाणी वाहून जाण्यासाठी स्टेनलेस स्टील नाल्या बसविणे. | **रु.१.५५ कोटी** |
| **पर्याय क्र. ३** | **पॉलीशड् कॉन्क्रीट इंडस्ट्रीयल फ्लोअरींग -**<br>जड वाहनांची वर्दळ असणा-या इंडस्ट्रीमध्ये अशा प्रकारची फ्लोअरींग केली जाते. सदरचे काम करणेसाठी सध्या मुख्य प्रसाद भोजन हॉलमध्ये बसविलेली व्हेट्रीफाईड फ्लोंअरींग व त्याचे खालील सिमेंट माल (Mortar) काढून PCC वर LDPE Sheet ( 250 micron) टाकले जाईल. त्यावर M 25 ग्रेडचे ३ इंच जाडीचे कॉन्क्रीट टाकले जाईल व त्यावर १२ kg/sqm हार्डनर टाकून सरफेस पॉलीश केली जाईल सदरचे फ्लोअरींग हे डस्ट प्रुफ व स्मुथ फीनीश असेल तथापी या प्रकारचे फीनीश उभ्या पृष्ठभागावर म्हणजेच कॉलम व भिंतीचे डॅडोला करता येणार नाही. त्यामुळे प्रसाद भोजन हॉलचे भिंतीला व कॉलमचे भोवती ग्रेनाईट डॅडो लावणे. | **रु.१.२१ कोटी** |

तसेच श्री साईप्रसादालयामधील मुख्य किचन व बुंदी किचनमध्ये फ्लोअरिंग करीता खालील दोन पर्यायांचा विचार करता येईल.

| पर्याय क्रमांक | तपशिल | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| पर्याय क्र. १ | **ग्रेनाईट फ्लोअरींग -**<br>मुख्य किचन व बुंदी किचनमध्ये सध्याचे ट्रिमीक्स कॉन्क्रीट फ्लोअरींग चार ते पाच इंच पर्यंत तोडून त्यावर ४० एम एम जाड लेदर फीनीश ग्रेनाईट फ्लोअरींग बसविणे तसेच डॅडो करीता १८ ते २० एमएम जाड ग्रेनाईट बसविणे व किचनमधील पाणी वाहून जाण्यासाठी स्टील नाल्या बसविणे. | **रु.१.१९ कोटी** |
| पर्याय क्र. २ | **पॉलीश्ड् कॉन्क्रीट इंडस्ट्रीयल फ्लोअरींग -**<br>मुख्य किचन व बुंदी किचनमधील सध्याचे ट्रिमीक्स कॉन्क्रीट फ्लोअरींग २ ते ३ इंच पर्यंत तोडून त्यावर LDPE sheet (250 micron) टाकणे, M25 ग्रेडचे ३ इंच कॉन्क्रीट करणे. या कॉन्क्रीटवर 12 kg/5gm हार्डनर टाकून सरफेस पॉलीश करणे. सदरचे फ्लोअरींग हे डस्ट | **रु.०.९६ कोटी** |

| | | |
|---|---|---|
| | प्रुफ व स्मुथ फीनीश असेल या प्रकारचे फ्लोअरींग हे उभ्या पृष्ठ भागावर म्हणजेच कॉलम व भिंतीचे डॅडोला करता येणार नाही.<br>त्यामुळे डॅडोला १८ ते २० एमएम जाड ग्रेनाईट बसविणे व किचनमधील पाणी वाहून जाण्यासाठी स्टिल नाल्या बसविणे.<br>सदरचे स्मुथ फीनीश फ्लोअरींग मुळे किचनमध्ये स्वच्छता राखणे सोपे होईल. परंतू पाणी सांडल्यास फ्लोअरींग स्लिपरी होऊ शकतो तसेच जड भांडे व ट्रॉलीच्या वर्दळीमुळे भविष्यात पुन्हा फ्लोअरींगवर खड्डे पडू शकतात. | |

**विभागाचा अभिप्रायः-** उपरोक्त पर्यायांपैकी प्रसाद भोजन हॉलमध्ये Endura किंवा तत्सम फ्लोअरींग बसविणे योग्य होईल असे मत आहे. तसेच मुख्य किचन व बुंदी किचनमध्ये ४० एमएम जाड लेदर फीनिश ग्रेनाईट फ्लोअरींग करणे योग्य होईल असे मत आहे. मा.कार्यकारी अधिकारी कक्ष यांचेकडील जा.क्र.३६२१ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार प्रत्येक विभागाने टेंडरमध्ये नमूद करण्यात येणारी इस्टीमेट कॉस्ट ही मार्केट कॉस्टपेक्षा २० ते ३० टक्के कमी नमूद करावी असे निर्देश दिलेले आहेत. त्यानूसार याकामी अंदाजपत्रकीय रकमेच्या २०% कपात करुन रक्कम रु.२.१९२ कोटी मात्र खर्च येईल. तरी याकरीता येणारे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने ई– निविदा मागविणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधील फ्लोअरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ ट्रेमिक्स कॉंक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन फ्लोअरींग व डॅडो बसविणे याची आवश्यकता भासत नाही, त्यामुळे सदरहू प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१** **जुनी प्रसादालय इमारत साईभक्तांचे वापराकरीता उपलब्ध करुन देणेसाठी त्यामध्ये आवश्यक फेरबदल करणे व नुतनीकरण करणेस येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम, २००४ मधिल तरतुद:** अधिनियमाच्या कलम २१ पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:** मंदिर परिसराचे उत्तरेकडील भागात संस्थानची जुनी प्रसादालय इमारत आहे. दि.०८/०१/२००९ पासून नवीन श्री साईप्रसादालय इमारत साईभक्तांना प्रसाद भोजन सुविधेकरीता उपलब्ध करणेत आला आहे. त्यानंतर जुने प्रसादालय इमारतीतील मुख्य हॉल, किचन शेड व त्यालगतचे भागाचा वापर सन २०१५ मधिल कुंभमेळा कालावधीचा अपवाद वगळता इतर कालावधीत झालेला नाही. यापैकी मुख्य हॉलचे दक्षिणेकडील भागात डिसेंबर २०१६ पासून साईभक्तांचे सुविधेकरीता फ्रि टाईम दर्शन कार्ड वितरण काउंटर्स सुरु करण्यात आलेले आहेत. त्यामुळे या हॉलचे दक्षिणेकडील शेड व त्यालगतचे परिसरात साईभक्तांची सतत वर्दळ असते. साईभक्तांनी फ्रि टाईम दर्शन कार्ड घेतलेनंतर ठरलेल्या वेळी दर्शन रांगेत प्रवेश करणेपुर्वी त्यांना प्रतिक्षा करता यावी याकरिता जुने प्रसादालय इमारतीतील हॉल वेटींग हॉल म्हणून वापरात आणणेत यावा असे निर्देश मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेले आहेत. (संदर्भ– परिपत्रक क्र.३६२४ दि.०६/०१/२०१७)

दि.१६/०२/२०१७ रोजी मा. कार्यकारी अधिकारी डॉ.संदीप आहेर साहेब व यु.पी.गोंदकर प्रशासकीय अधिकारी यांनी जुने प्रसादालय परिसराची पहाणी केली. त्यावेळी साईप्रसाद क्र.२ इमारतीचे तळमजल्यावरील हॉल बुंदी सुकविणे, लाडू बांधणे यासाठी वापरात आणणे व त्याचे दक्षिणेकडील पत्राशेड बुंदी किचन म्हणून वापरात आणणेसाठी सूचना दिलेल्या आहेत. (संदर्भ– कार्यालयीन आदेश क्र.४०९१ दि.१८/०२/२०१७). त्यामुळे सदरहु भागातील कामांचा या अंदाजपत्रकामध्ये समावेश केलेला नाही.

जुने प्रसादालय इमारतीचे मुख्य हॉलमध्ये आवश्यकतेनुसार प्रसाधनगृहे तयार करणे, फरशीसाठी कॉन्क्रीट करणे, फरशी बदलणे, हॉलमध्ये फॉल्स सिलींग, रंगकाम करणे, शेडचे खराब पत्रे बदलणे, बैठकव्यवस्थेसाठी थ्री सीटर बेंचेस, टेबल आदि कामे करणेसाठी सन २०१६-१७ चे जिल्हादरसूचीनुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार खालील तपशिलानुसार रु.९७,९२,६९५/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

१. जुने प्रसादालय इमारतीचे मुख्य हॉलचे फरशी बदलणे, हॉलमध्ये फॉल्स सिलींग, रंगकाम करणे, पिण्याचे पाण्याची व्यवस्था, बैठकव्यवस्थेसाठी थ्री सीटर बेंचेस, सिलींग फॅन, लाईट, डेझर्ट कुलर्स

बसविणे– रु.१,००,१०,३८९/-. (यापैकी M.S. Conduit wiring, Ceiling Fans, LED Fiting, DB Box इ. विद्युत विषयक कामांसाठी अपेक्षित खर्च रु.४१ लक्ष मात्र इतका आहे.)

२. मुख्य हॉलचे उत्तरेकडील भागाचे टॉयलेट बांधकामासह नूतनीकरण करणे- रु.२८,३३,९२८/-.

३. जुने किचन शेड व टॉयलेटचे नूतनीकरण करणे- रु.१०,७१,४७८/- .

वरीलपैकी पहिल्या टप्प्यात जुने प्रसादालय इमारतीचे मुख्य हॉलचे नूतनीकरण करता येतील व त्यानंतर सदर हॉलचे वापराबाबत साईभक्तांचा प्रतिसाद विचारात घेवून उर्वरीत दोन टप्प्यांचे काम हाती घेता येईल, असे मत आहे.

**प्रस्ताव:** उपरोक्तप्रमाणे पहिल्या टप्प्यात जुने प्रसादालय इमारतीचे मुख्य हॉलचे नूतनीकरणासाठी सन २०१६-१७ चे जिल्हा दरसूचीनुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु.१,००,१०,३८९/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. जा.नं.३६२१/२०१७ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार अंदाजपत्रकीय रक्कम २०% कपात करुन रु.८०,०८,३११/- इतकी रक्कम येते. करीता याकामी आयटमरेट पध्दतीने निविदा मागविता येतील.

तरी याकामी वरीलप्रमाणे पहिल्या टप्प्याचे कामासाठी येणारे खर्चास व सदरहू कामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जुनी प्रसादालय इमारत साईभक्तांचे वापराकरीता उपलब्ध करुन देणेसाठी त्यामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक फेरबदल व नुतनीकरण करणेस तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२२** **संस्थानमध्ये ठेकेदारामार्फत चालू असलेल्या बांधकाम अहवालाचा अ तक्ता व अंतीम बीलाचा ब तक्ता अवलोकनार्थ सादर.**

बांधकाम प्रगती अहवालामधील ठेकेदारामार्फत चालू असलेल्या बांधकाम अहवालाचा अ तक्ता व अंतीम बीलाचा ब तक्ता सर्व मा.सदस्यांना पुरविणेत आला होता.

**निर्णय क्र.१९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमध्ये चालू असलेली बांधकामे व पुर्ण झालेल्या कामांचे अंतीम बील अदा करणेचा प्रस्ताव टिपणी व तक्त्यांसह सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या पदयात्री पालख्यांचे संम्मेलन आयोजित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद–** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीचे कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टये साध्या करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कमी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक :-** १) दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील विषय नं.१७ वरील निर्णय क्र.५८१. (२) दि.३१/०८/२०१७ रोजीचे सभेतील विषय नं.१३ वरील निर्णय क्र.६२७.

**प्रास्तविक:-** दि.१६ व ३१ ऑगष्ट २०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील चर्चेच्या वेळी श्री गजानन महाराज संस्थान शेगांव यांचे धर्तीवर संस्थानमध्ये सेवेकऱ्यांची नेमणुक करण्याबाबतची संकल्पनेचा विचार करणेबाबत सुचना देण्यात आली आहे. तसेच दि.१६/०८/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे श्री क्षेत्र गजानन महाराज संस्थान, शेगांवचे धर्तीवर सेवेकरी उपलक्रम राबविणेचा निर्णय घेतलेला आहे.

त्यानुषंगाने दि.२४/०२/२०१७ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.व्यवस्थापन समितीचे बैठकीमध्ये विविध विभागांचे संबंधीत करावयाचे कामाबाबत दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबत जा.क्र.एसएसएस/

काअ-स्वीय/ ४१५७/२०१७ दि.०१/०३/२०१७ चे परिपत्रकान्वये कळविणेत आलेले आहे. यामध्ये संरक्षण विभागाचे संबंधीत मुद्दा क्र.१६ मध्ये- वेगवेगळया ठिकाणाहून येणाऱ्या सर्व पालख्यांची माहिती एकत्र करणे व सर्व पालख्यांचे एकत्रीत संमेलन आयोजीत करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या पालख्यांचे संमेलन आयोजीत करणेकामी संस्थानचे विविध विभागांकडून खालीलप्रमाणे कामकाज करुन घेता येईल.

| अ.नं. | विभाग | करावयाची कामे |
|---|---|---|
| ०१. | संरक्षण विभाग | पालख्यांची माहिती १५ दिवसात एकत्रीत करणे व कामगार विभागास देणे. याकामी सर्व विभागांशी समन्वय ठेवणे. कार्यक्रमाचे ठिकाणी बंदोबस्त ठेवणे. |
| ०२. | मंदिर विभाग | संमेलनाचे उदघाटनकामी पुजेचे साहित्यासह नियोजन करणे. मान्यवरांच्या सत्कारासाठी मा.का.अ. सो. यांच्या मान्यतेने फोल्डर, शॉल, डायरी, उदी, प्रसाद आदिंची व्यवस्था करणे. कार्यक्रमानंतर स्थानीक कलाकारामार्फत साईभजन संध्याचे आयोजन करणे. |
| ०३. | बांधकाम विभाग | संमेलनकामी साईपालखी निवारा, निमगाव या ठिकाणी हॉलची पाहणी करुन कार्यक्रमाचे स्थळ निश्चीत करुन स्टेज, बॅनर्स व बैठक व्यवस्था करणे. शताब्दी वर्षाचे दृष्टीने संस्थान मार्फत वर्षात कोणते कार्यक्रम/ उपक्रम आयोजीत करणार आहे याबाबतची माहिती उपलब्ध ठेवणे. (आवश्यक असल्यास सादरीकरण करणे) |
| ०४. | जनसंपर्क विभाग | पालखी संमेलनप्रसंगी उपस्थीत राहणेबाबत प्रेसनोट प्रशासकीय मान्य्ातेने संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणे, वृत्तपत्रात बातम्या प्रसिध्द करणे. |
| ०५. | कामगार विभाग | विभागाचे मागणीनुसार कंत्राटी कर्मचारी पुरविणे. कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका/ पत्र नमुना तयार करणे. पालखी मंडळाचे यादीप्रमाणे संबंधीतांना निमंत्रण पत्रिका पाठविणे. आलेल्या पालखी मंडळाचे रजिस्ट्रेशन फॉर्म भरुन घेणे. |
| ०६. | विद्युत विभाग | कार्यक्रमाचे ठिकाणी विद्युत पुरवठा, लाईट, फॅन, कुलर्सची व्यवस्था करणे. |
| ०७. | सी.सी.टी.व्ही. सेल | कार्यक्रमाची व्ही.डी.ओ. शुटींग व फोटोग्राफी करणे. एल.ई.डी. स्क्रिनची व्यवस्था करणे. |
| ०८. | साईबाबा कन्या विद्या मंदीर | कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री वसंत वाणी सर यांनी करावे. मा.का.अ. यांचेशी चर्चा करुन मिनीट टू मिनीट कार्यक्रमपत्रीका तयार करणे. |
| ०९. | श्री साई प्रसादालय | व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार मान्यवरांची अल्पोपहार व भोजन व्यवस्था करणे. |
| १०. | कॅन्टीन विभाग | कार्यक्रमाचे ठिकाणी चहा, दुध, कॉफी, पाणी इ.ची व्यवस्था करणे. |
| ११. | वाहन विभाग | आवश्यकतेप्रमाणे वाहन व्यवस्था करणे. |
| १२. | बगीचा विभाग | स्टेज डेकोरेशन करणे, मान्यवरांचे सत्कारकामी बुके/ फुलांची गुच्छ इ.ची व्यवस्था करणे. |
| १३. | साईआश्रम भक्तनिवास | पालखी संमेलनासाठी येणारे मान्यवरांची निवास व्यवस्था मोफत करणे. |
| १४. | आरोग्य विभाग | संमेलनाचे ठिकाणी स्वच्छता विषयक सर्व कामे करणेकामी नियोजन करणे. |
| १५. | सामान्य प्रशासन | संमेलनासाठी आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग, त्यांना करावयाची कामे व इतर अनुषंगीक बाबींसंबंधीत परिपुर्ण आदेश पारित करणे. संमेलनकामी प्र.अ. व कामगार/ विधी अधिकारी, संरक्षण अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, तसेच श्री रमेश पुजारी व श्री बलभिम जोशी यांची कमिटी तयार करुन आदेश पारीत करणे. |
| १६. | ध्वनीक्षेपण व टेलीफोन विभाग | संमेलनाचे ठिकाणी आवश्यकतेनुसार साऊंड सिस्टीम व दुरध्वनीची व्यवस्था करणे. |
| १७. | साईप्रसाद निवासस्थान | संमेलनासाठी उपस्थित राहणारे मा.व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष/ उपाध्यक्ष/ सदस्य तसेच पदयात्री मंडळाचे प्रतिनीधी यांना ओळखपत्र व बॅचेस उपलब्ध करुन देणे. |
| १८. | प्रकाशने विभाग | कार्यक्रमासाठी आलेल्या मान्यवरांना डायरी देणेकामी डायरी उपलब्ध करुन मंदीर विभागास देणे. |

**अनुमान :-** धोरणात्मक.

**मागणी :-** साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या पदयात्री पालख्यांचे संमेलन आयोजीत करणे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या पदयात्री पालख्यांचे संमेलन आयोजीत करुन त्यांना साईसेवक योजना राबविणेकामी योजनेची माहिती देऊन पदयात्री मंडळाचे सदस्य/ सभासद यांना साईसेवक योजनेमध्ये सहभाग घेणेबाबत विनंती/ आवाहन करता येईल, असे नम्र मत आहे.

तरी वरीलप्रमाणे संबंधीत विभागामार्फत कार्यवाही करणेस व पालखी संमेलनाची दिनांक, वेळ, ठिकाण निश्चीत करुन याकामी येणाऱ्या सर्व समावेशक, अनुषंगीक खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचे विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमध्ये राबविणेत येणाऱ्या साईसेवक योजनेची माहिती सर्व पदयात्रींना समजणेसाठी पालख्यांचे संम्मेलन आयोजित करणेसाठी अजुनही बऱ्याचशा पालख्यांची नोंद झालेली दिसून येत नाही. याकरीता सर्व पालख्यांची नोंदणी करावी व त्यानंतर प्रस्ताव सादर करणेत यावा. तसेच पालखी संम्मेलनाची सुरुवात समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांचे मार्गदर्शनाखाली अहमदनगर जिल्हयातील पालख्यांपासून करावी, असे ठरले.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **मंदिर विभागामार्फत होणाऱ्या पाद्यपुजा व इतर कार्यक्रमासाठी मान्यवर निश्चितीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव २०१७ मध्ये मंदिर विभागामार्फत वीणा, साईसच्चरित पोथीची मिरवणूक, श्रींच्या प्रतिमा (फोटोची) मिरवणूक, अध्याय वाचन, श्रींची पाद्यपुजा, गुरुस्थान येथे रुद्राभिषेक पुजा अशा कार्यक्रमाचे आयोजन मान्यवरांचे हस्ते करणे असल्याने. मान्यवरांची नावे निश्चित झाल्यानंतर वीणा कोणी घ्यावा, पोथी कोणी घ्यावी, श्रींचा फोटो कोणी घ्यावा, अध्यायाचे वाचन कोणी करावे, श्रींची पाद्यपुजा, कोणी करावी, रुद्राभिषेक पुजा कोणी करावी याबाबत रुपरेषा निश्चित करता येईल.

तरी खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे मान्यवरांची नावाची नोंद होऊन निश्चित होणेस मान्यतेसाठी सादर.

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| ०३/०४/२०१७. सोमवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **वीणा-**<br>**पोथी–**<br>**प्रतिमा -** |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन –**<br>१.<br>२.<br>३.<br>४.<br>५. |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा –** |
| ०४/०४/२०१७. मंगळवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस** |
| | | **वीणा-**<br>**पोथी–** |
| | | **प्रतिमा-** |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** |
| ०५.०४.२०१७ बुधवार | सकाळी ६.०० वाजता | **उत्सवाचा सांगता दिवस**<br>**श्रींची पाद्यपूजा-** |
| | सकाळी ६.३० वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक -** |

**निर्णय क्र.१९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्ताव स्थानिक उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी- ०५)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३** **श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा सन २०१६-१७ वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार मा.कोर्ट रिसिव्हर यांचे काळापासून मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना त्यांच्या पाल्याचा शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जातो.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ अन्वये मार्गदर्शक तत्वे वजा नियमावली ठरविण्यात आलेली आहे. सदरच्या मार्गदर्शक तत्वानुसार सध्या शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्याची कार्यवाही चालु आहे. निर्णय क्र.८९ (१) शासनाने विद्यापीठांनी केवळ गुणवत्तेच्या निकाषावर (On Merit Basis) भरण्यात येणा-या (सुमारे ५० % पर्यंतच्या) जागांवर प्रवेश दिल्या जाणा-या विद्यार्थ्यांसाठी (निम्न दराने) निर्धारीत केलेल्या फी दर रकमेपर्यंतच, मर्यादीत असावा असे नमुद आहे. यास अनुसरुन शासकीय/शासन अनुदानित अभ्यासक्रमासाठी आकरण्यात येणा-या शुल्काच्या मर्यादेपर्यंत शैक्षणिक शुल्क रकमेचा परतावा दिला जातो. तसेच ज्यु.के.जी ते इ.१० वी (इंग्रजी माध्यम) व आयटीआय या अभ्यासक्रमांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा संस्थानच्या शाळेतील फीचे मर्यादेपर्यंत अदा केला जातो.

शासन मंजुरी क्र.सासंवि २००७/२४२/(६०)-का.सोळा, मंत्रालय मुंबई दि१६ जुलै, २००९ अन्वये विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी सदर योजना माव्यवस्थापन मंडळाचे सन १९९६ चे सभेतील निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना लागू आहे. त्याच धर्तीवर ती यापुढेही प्रचलीत पद्धतीने चालु राहील, अशी मंजुरी दिलेली आहे.

**(ब)** उपरोक्त शासन मंजूरीस अनुसरुन दरवर्षी संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक परताव्याबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग, वशी-०६ मार्फत करण्यात येते. सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिताची कार्यवाहीही त्यांचेमार्फतच सुरु आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०६/२०४७/ २०१६ दि.२६.०८.२०१६ रोजीचे पत्रान्वये संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१६-१७ चा शैक्षणिक शुल्क परतावा करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आवश्यक माहिती सादर करणेकामी श्री साईनाथ रुग्णालय विभागाकडील पात्र कर्मचारी संख्या, पाल्य संख्या, विद्यार्थी शिक्षण घेत असलेले वर्ग/अभ्यासक्रम व अंदाजे फीची रक्कम याबाबतची माहिती दि.१५.०९.२०१६ अखेर सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

मात्र श्री साईनाथ रुग्णालयाकडून मुदतीत माहिती उपलब्ध नाही. त्याबाबत त्यांना वेळोवेळी दुरध्वनीद्वारे देखील कळविलेले होते, मात्र त्यांनी लिपीक सुट्टीवर आहे, उद्या देतो असे कारणे सांगून माहिती देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे दरम्यानचे काळात श्री साईनाथ रुग्णालय विभाग वगळता इतर विभागातील संस्थान कर्मचा-यांच्या अंदाजे ८७० (श्री साईनाथ रुग्णालय विभाग वगळता) पाल्यांचा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा शुल्क परतावा करणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला.

त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६९२ अन्वये संस्थान कायम कर्मचा-यास एकुण ८७० पाल्यांचा सन २०१६-१७ या वर्षातील शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.६६,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार परिपत्रक पारित करुन साईनाथ रुग्णालय वगळता इतर कर्मचा-यांना फॉर्म वाटप करुन, त्यांच्या पाल्यांचा शैक्षणि फी परतावा त्यांना आदा करणेत आलेला आहे.

**(क)** श्री साईनाथ रुग्णालयामार्फत दि.१९.११.२०१६ रोजीचे पत्र व त्यासोबतच्या दि.१५.११.२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये साईनाथ रुग्णालय विभागाकडील पाल्यांचा सन २०१६-१७ या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेबाबतचा कार्यवाही इकडील कार्यालयाकडून करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार त्यांनी तब्बल ०२ महिने (६० दिवस) उशीराने प्रस्ताव इकडील कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

**(ड)** सदर प्रस्तावामध्ये एकुण ६८ कर्मचा-यांच्या १०४ पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेकामी रक्कम रु.२९,९८,८७०/- मात्र कळविलेली होती. इकडील कार्यालयाकडून सदरची रक्कम पुर्णांकित करुन ११० पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेकामी एकुण रक्कम रु.३०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला होता. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२.१२.२०१६ रोजीचे सभेत सदर विषयावर चर्चा होऊन, निर्णय क्र.९१७ पुढीलप्रमाणे पारित झालेला आहे.

"उपरोक्त प्रस्तावामध्ये ११० पाल्यांच्या शैक्षणिक शुल्काचा परतावा रु.३०,००,०००/- मात्र दर्शविणेत आलेला आहे. सदरहू रक्कम संयुक्तिक वाटत नाही, याकरिता रु.३०,००,०००/- मात्र शैक्षणिक शुल्काच्या विवरणासहीत प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले"

**(इ)** जा.क्र.एसएसएस/साप्रशा/वशी-०६/३६३०/२०१७ दि.०७ जानेवारी, २०१७ चे पत्रान्वये मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२.१२.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.९१७ नुसार कार्यवाही करुन सदरचा प्रस्ताव त्वरीत इकडील कार्यालयाकडे सादर करणेबाबत वैद्यकिय अधिक्षका, श्री साईनाथ रुग्णालय यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार त्यांनी त्यांचेकडील दि.१७.०२.२०१७ रोजीचे पत्रान्वये श्री साईनाथ रुग्णालय विभागाकडील कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा शुल्क परतावा मिळणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावातील माहितीनुसार श्री साईनाथ रुग्णालयाकडील एकुण ५१ कर्मचा-यांच्या ७० पाल्यांना सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील शुल्क परतावा करणेकामी अंदाजे रु.५,८०,७७५/- मात्र अपेक्षित खर्च असलेबाबत कळविलेले आहे.

तरी उपरोक्त परिच्छेद **"इ"** मध्ये नमुद केलेप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालय विभागाकडील ५१ स्थायी कर्मचा-यांच्या ७० पाल्यांचा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा शुल्क परतावा आदा करणेकामी अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.६,००,०००/- (अक्षरी रुपये सहा लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातीम इ मुद्यामध्ये नमुद केलेप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील ५१ स्थायी कर्मचाऱ्यांच्या ७० पाल्यांचा सन २०१६-१७ वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेस व त्याकामी येणाऱ्या रु.६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी- ०६)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **श्री साईबाबा संस्थानचे मंजुर आकृतीबंधातील विभाग व नव्याने निर्माण झालेल्या विभागांची पुर्नरचना करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत संस्थानचे मंजुर आकृतीबंधातील विभाग व नव्याने निर्माण झालेल्या विभागांची पुर्नरचना करुन विभागांची संख्या कमी करणेचे निर्देश देण्यात आलेले आहेत. संस्थानचे दि.०७/०८/२००९ रोजीचे मंजुर आकृतीबंधात एकूण ३४ विभागांचा समावेश आहे. त्याची माहिती सोबत जोडली आहे. तसेच आकृतीबंधास मान्यता मिळालेनंतर मा.व्यवस्थापन समिती व प्रशासकीय कामकाजाचे सोईसाठी मागासवर्ग कक्ष, माहितीचा अधिकार, मालमत्ता विभाग, शताब्दी कक्ष, साईआश्रम धर्मशाळा, साईआश्रम भक्तनिवास, लाडू व बर्फी निर्मिती विभाग, सीसीटीव्ही कक्ष यासारखे एकूण ८ विभाग कार्यान्वीत करणेत आलेले आहेत. याप्रमाणे सध्यस्थितीत एकूण ४२ लहान-मोठे विभाग कार्यान्वीत आहेत. मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार या सर्व विभागांची खालीलप्रमाणे पुर्नरचना करुनविभागांची संख्या कमी करता येईल.

| अ.नं. | विभागाचे नांव |
|---|---|
| ०१) | **सामान्य प्रशासन विभागः-**<br>(अ) सामान्य प्रशासन विभाग (ब) मागासवर्ग कक्ष (क) सभा कामकाज विभाग<br>(ड) माहितीचा अधिकार (इ) अभिलेख कक्ष |
| ०२) | **शिक्षण सेवा विभागः-**<br>(अ) कन्या विद्या मंदिर (ब) कनिष्ठ महाविद्यालय (क) इंग्लिश मिडीयम स्कूल<br>(ड) औद्योगिक प्रशिक्षण संस्था |
| ०३) | **बांधकाम विभागः-**<br>(अ) बांधकाम विभाग (ब) मालमत्ता विभाग (क) शताब्दी कक्ष |
| ०४) | **प्रसाद सेवा विभागः-**<br>(अ) श्री साईप्रसादालय (ब) लाडू व बर्फी निर्मिती विभाग (क) कॅन्टीन विभाग |
| ०५) | **निवासस्थान सेवा विभागः-**<br>(अ) श्री साईबाबा भक्तनिवास (ब) द्वारावती भक्तनिवास (क) साईप्रसाद भक्तनिवास<br>(ड) साईआश्रम भक्तनिवास (इ) साईआश्रम धर्मशाळा |

| | |
|---|---|
| ०६) | **माहिती तंत्रज्ञान सेवा विभागः-**<br>(अ) माहिती तंत्रज्ञान विभाग (ब) ध्वनिक्षेपन विभाग (क) सीसीटीव्ही कक्ष |
| ०७) | **तांत्रिक सेवा विभागः-**<br>(अ) मेकॅनिकल विभाग (ब) वाहन विभाग |
| ०८) | **रुग्णालय सेवा विभागः-**<br>(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल (ब) श्री साईनाथ रुग्णालय |
| ०९) | **लेखा विभागः-**<br>(अ) लेखाशाखा (ब) खरेदी विभाग (क) भांडार विभाग (ड) मुंबई कार्यालय |
| १०) | **संरक्षण सेवा विभागः-**<br>(अ) संरक्षण विभाग (ब) फायर अॅण्ड सेफ्टी विभाग |
| ११) | **कामगार व विधी विभागः-**<br>(अ) कामगार विभाग (ब) विधी विभाग |
| १२) | **विद्युत सेवा विभागः-**<br>(अ) विद्युत विभाग (ब) पाणी पुरवठा विभाग |
| १३) | **आरोग्य सेवा विभागः-**<br>(अ) आरोग्य विभाग (ब) बगीचा विभाग |
| १४) | **मंदिर सेवा विभागः-**<br>(अ) मंदिर विभाग (ब) जनसंपर्क विभाग (क) प्रकाशने विभाग |

वरीलप्रमाणे एकूण १४ विविध विभागांची पुर्नरचना करुन दिनांक ०७.०८.२००९ चे शासन मान्य आकृतीबंधातील ०५ मंजूर प्रशासकीय अधिकारी पदांपैकी तीन प्रशासकीय अधिकारी यांचेकडे प्रत्येकी ४ विभाग व उर्वरीत एक प्रशासकीय अधिकारी यांचेकडे २ विभाग या प्रमाणे विभागनी करुन प्रशासकीय कामकाज करुन घेता येईल. महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग,मंत्रालय मुंबई ४०००३२ यांचेकडील शासन निर्णय क्रमांकः सांसक्रि-२००९/४३३/८३७/०९/का.सोळा दिनांक ७ ऑगस्ट २००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील स्थायी पदे २९०८ व कंत्राटी पदे १९१८ अशा एकूण ४८२६ पदांना मंजूरी देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सदर शासनमान्य आकृतीबंधामध्ये संस्थान आस्थापनेवरील ३४ विभागांना मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानंतर ०८ विभागांची नव्याने निर्मिती करण्यात आलेली आहे. सदर नवीन ०८ विभागाना अद्याप शासनाची मान्यता घेण्यात आलेली नाही.

तसेच श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना यांनी दि.०३/०३/२०१७ रोजीचे पत्रान्वये संस्थानचे ४२ विभागांचे पुर्नरचना करुन त्याऐवजी १४ विभाग करण्याचे मा.व्यवस्थापन समितीने ठरविले असल्याचे समजले आहे. संस्थानमध्ये सध्या असलेले विभाग संस्थानला वेळोवेळी कामाच्या आवश्यकतेनुसार व गरजेप्रमाणे मा.व्यवस्थापन समिती व मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेने निर्माण करण्यात आलेले आहेत. या विभागांनुसार कर्मचारी आकृतीबंध महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेला आहे. त्यामुळे संस्थानचे सध्या असलेले विभाग कमी केल्यास आम्हांला पदोन्नतीची संधी मिळणार नाही व आमच्यावर अन्याय होईल. तसेच आमचे आर्थिक नुकसान देखील होईल. तरी आपणास सर्व कर्मचा-यांच्या वतीने सध्या आकृतीबंधाप्रमाणे व शासनाचे मान्यतेने निर्माण झालेले ४२ विभाग यापुढे कार्यरत ठेवणेत यावे व त्यात कोणताही बदल करु नये, अशी विनंती.

उपरोक्तप्रमाणे मंजूर आकृतीबंधातील ३४ +०८ =४२ विभागांची पूर्नरचना करावयाची झाल्यास प्रथम शासनास प्रस्ताव सादर करुन त्यास मान्यता घ्यावी लागेल व मा.शासनाचे मान्यतेनंतर विभागाची पूर्नरचना करता येईल, असे मत आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा.शासनाचे मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.१९६ **दिनांक ०८.०३.२०१७ रोजी संस्थानमधील विविध विभागांचे प्रअधिक्षक/ विभागप्रमुख मा.अध्यक्ष महोदयांना भेटले व त्यांनी मंजुर आकृतीबंधामधीलविभाग एकत्रित केल्यास आम्हाला पदोन्नतीच्या संधी मिळणार नाही, याकरीता आम्हाला आमच्या कामात सुधारणा करणेसाठी ०३ महिन्याचा कालावधी देण्यात यावा, अशी विनंती केली. तसेच कर्मचारी संघटना यांनी मंजुर आकृतीबंधामधील विभाग एकत्र करु नये, अशी विनंती केल्याची माहिती अध्यक्ष महोदय यांनी सभेस दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, कर्मचारी व कर्मचारी संघटना यांच्या विनंतीचा विचार करता, त्यांना कामात सुधारणा होणेसाठी ०३ महिन्याचा कालावधी देण्यात यावा. तसेच प्रत्येक महिन्यानंतर सर्वेक्षण करुन ०३ महिन्यांनी त्याचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे कार्यालयातील, त्यांचे अधिनस्त असलेल्या भूसंपादनकक्षास व या कक्षात कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-१६ व १७ जुलै, २००० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २३८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे संबंधित भूसंपादनाची कामे करणेकरीता मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर उपविभाग, श्रीरामपूर (महसूल) यांचे पर्यवेक्षणाखाली श्रीरामपूर येथील कार्यालयात स्वतंत्र भूसंपादन कक्षाची स्थापना करणेत आलेली होती. मध्यंतरीचे काळात, मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक भूसंपादन / कार्या/१६-क/१०८५/२०१३ दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशाने मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचे अधिनस्त असणारा उपरोक्त भूसंपादन कक्ष तेथे कार्यरत असलेल्या कर्मचा-यांसह मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग यांचे अधिनस्त देणेत आलेला आहे.

तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-१६ व १७ जुलै, २००० रोजीचे सभेतील निर्णयानुसार, विषयांकित भूसंपादन कक्षास व कक्षाकडे कार्यरत कर्मचा-यांना सन २००० पासून ते आजपावेतो मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने वेळोवेळा मुदतवाढ देणेत आलेली आहे. सध्या विषयांकित कक्षास व कक्षाकडे कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना मा.त्रिसदस्य समितीचे दि.०२/०४/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२६४ अन्वये दि.०१/०५/२०१६ ते दि.३०/०४/२०१७ अखेर मुदतवाढ देणेत आलेली आहे. सध्या सदर कक्षाकडे खालील प्रमाणे कर्मचारी काम करत असून, त्यांची मुदतवाढ दि.३०/०४/२०१७ रोजी संपुष्टात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | मंजूर पद संख्या | सध्या प्रति महिना देणेत येत असलेले मानधन रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.आर.बी.नागरे, सेवानिवृत्त अव्वल कारकून | ०१ | १०, ०००/- (एकत्रित) |
| ०२ | लिपीक टंकलेखक संवर्ग (कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने) | ०२ | किमान वेतनदराप्रमाणे कुशल कर्मचारी वेतन. |
| ०३ | शिपाई संवर्ग कर्मचारी (कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने) | ०१ | किमान वेतनदराप्रमाणे अकुशल कर्मचारी वेतन. |

**(ब)** आता, मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांना दि.१४/०२/२०१७ रोजीचे पत्राव्दारे, त्यांचेकडे सध्या खालील प्रमाणे एकूण १३ भूसंपादन प्रस्तांवर कार्यवाही सुरु असल्याचे कळविले आहे.

| अं.क्र | भूसंपादक संस्थेचे नांव | कार्यवाही चालू असलेल्या प्रकरणांची संख्या |
|---|---|---|
| ०१ | मा.कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | ०३ |
| ०२ | मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी (अंतर्गत रस्ते प्राध्यान्य गट क्रमांक २) | ०८ |
| ०३ | मा.अधिक्षक डाकघर शिर्डी पोस्ट ऑफीससाठी भूसंपादन | ०१ |
| ०४ | राहाता कोर्ट निवासस्थानाकरीता भूसंपादन | ०१ |
| | एकूण | १३ |

तसेच श्री साईबाबांची जन्मशताब्दी वर्षाकरीता भूसंपादनाची नवीन प्रकरणे या वर्षी दाखल होण्याची शक्यता असल्याने या सर्व प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करणेसाठी या भूसंपादन कक्षास एक वर्षाची मुदतवाढ मिळणेस तसेच सध्या या कार्यालयात कार्यरत असलेले कर्मचारी श्री.आर.बी.नागरे, सेवानिवृत्त अव्वल कारकून यांना सध्या देण्यात येत असलेल्या एकूण मानधन रु.१०,०००/- ऐवजी रु.१२,०००/- मानधन वाढवून देणेबाबत विनंती केलेली आहे.

तसेच शिर्डी नगरपंचायतीमार्फत सुरु असलेल्या अंतर्गत रस्त्यांचे कामासाठी व भूसंपादनासाठी मोबदला रक्कम ही श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचेकडून दिली जात असल्याचे नमूद केले आहे. तसेच या भूसंपादन कक्षाने आता पर्यंत खालील प्रमाणे भूसंपादन प्रकरणांची कार्यवाही पूर्ण केल्याचे नमूद केले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी करीता | ०६ प्रकरणे. |
| २. | शिर्डी नगरपंचायत शिर्डी अंतर्गत रस्तेप्राधान्य गट क्र.१ | १४ प्रकरणे. |
| ३. | शिर्डी बाह्यवळण रस्ता २४ कि.मी | १० प्रकरणे. |
| ४. | राहाता कोर्ट इमारत | ०१ प्रकरण. |
| ५. | शिर्डी स्मशानभूमि | ०१ प्रकरणे |
| | **एकूण** | ३२ प्रकरणे |

उपरोक्त परिच्छेद नमूद कलेले मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग यांचे पत्रावर प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग यांनी दि.१८/०२/२०१७ रोजीचे पत्राने,मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग यांचे प्रस्तावाचे अवलोकन केले असता, विषयांकित भूसंपादन कक्षास व कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचा-यांना दि.०१/०५/२०१७ ते दि.३०/०४/२०१८ अखेर एक वर्षासाठी मुदतवाढ देणे उचित होईल. तसेच अव्वल कारकून श्री.नागरे यांचेकडील कामाचा व्याप व स्वरुप पाहता त्यांचे मानधन वाढवून देणेस हरकत नाही, असे कळविले आहे.

**क)** Land Acquisition, Rehabilitation and resettlement Act,2013 मध्ये महसूल व वन विभागाने दि.१९ मार्च, २०१४ रोजी प्रसिध्द केलेल्या नोटीफिकेशन मध्ये "Such an amount equal to 3 per cent of the amount of compensation towards establishment charges to be deposited to the state Government." असे नमूद केलेले आहे. याचाच अर्थ, भूसंपादनासाठी येणा-या एकूण खर्चापैकी ३ % रक्कम भूसंपादनाचे आस्थापना खर्चापोटी शासनाकडे जमा करावी. या अटीनुसार संस्थान व्यवस्थापनाने वेळोवेळी भूसंपादनापोटी, भूसंपादन खर्चाच्या ३ % रक्कम मा.शासनास अदा केलेली आहे / करत आहे.

तसेच, महसुल व वन विभागाने प्रसिध्द केलेल्या उपरोक्त नोटीफिकेशनच्या परिच्छेद ०३ मध्ये, Such an amount towards honorarium of the private of retired Governmental employees including one retired Tahsildar, two Avalkarkuns, one retired Circle officer, retired surveyors, retired Engineers, retired Horticulturists and retired Forest officer for valuation of structures and trees in the land to be acquired, two private Computer operators and two private persons as peons and whatever human assistance required by the officer acquiring land, and an amount towards retaining of the vehicle with driver needed during the process of the acquisition of the land and Rehabilitation and resettlement of the affected families, be deposited in the personal Ledger Account (PLA) of the Concerned land Acquisition officer of Sub-Divisional Officer or, as the case may be, the administrator, appointed in the behalf ( along with the proposal); and' असे नमूद कलेले आहे. याचाच अर्थ, शासनास जमा करावयाच्या 3 % आस्थापना खर्चाच्या व्यतिरिक्त वरीलप्रमाणे (कंत्राटी) मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावे.

**ड)** तरी उपरोक्त परिच्छेदाचे अवलोकन करता, मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे दि.१४/०२/२०१६ रोजीचे पत्रातील विनंतीस अनुसरुन, मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे अधिनस्त असलेल्या भूसपादन कक्षास व सदर कक्षाकडे कार्यरत असलेल्या ०२ कुशल व ०१ अकुशल कर्मचा-यांस किमान वेतन दराप्रमाणे तसेच सेवानिवृत्त अव्वल कारकून श्री.आर.बी.नागरे यांना एकूण मानधनावर दि.०१/०५/२०१७ ते दि.३०/०४/२०१८ अखेर एक वर्षासाठी मुदतवाढ तसेच भूसंपादन कक्षाचे मागील वर्षाचे मुदतवाढीचे प्रस्तावावर श्री.आर.बी.नागरे यांचे मानधन रु.७,०००/- मध्ये वाढ करणेत येऊन त्यांना रु.१०,०००/- एकूण मानधन अदा करणेस मान्यता देणेत आलेली होती, त्यामध्ये पुनःश्च उचित वाढ करणे बाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, भू-संपादन कक्षाकडील चालू प्रकणांपैकी किती प्रकरणांची आवश्यकता आहे व किती प्रकरणे वाटाघाटीने मिटवता येतील या अहवालासह सदरहू भू-संपादन कक्षाने मागील दोन वर्षामध्ये केलेल्या कामाची सविस्तर माहिती सभेसमोर सादर करणेत यावी. तोर्यंत तात्पुरते ०३ महिने कालावधीसाठी आहे त्याच मानधनावर भू-संपादन कक्ष व त्यामधील कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

-------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य यांचा परिवीक्षाधीन कालावधी संपल्याने त्यांना मुख्याध्यापक (प्राथमिक विभाग) या पदावर कायम करणे व इ.०१ ते ०७ वी चा स्वतंत्र कार्यभार देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **प्रास्ताविक- (अ)** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडील वाढत्या विद्यार्थी संख्येचे तुलनेने वर्ग खोल्या अपुऱ्या पडत असल्याने शालेय कामकाजाचे दोन सत्रात विभाजन करण्यात आल्याने शाळा संहितानुसार प्राथमिक विभागासाठी स्वंतत्र मुख्याध्यापक नेमणूक करणे गरज होती.

त्यानुसार प्राथमिक विभागास मुख्याध्यापक नेमणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१.०६.२०१३ रोजीचे सभेत सादर करण्यात आला असता, निर्णय क्र.४९८ अन्वये "त्यावर सविस्तर चर्चा होऊन शाळा दोन सत्रात भरविण्यात येत असल्याने प्राथमिक विभागासाठी स्वंतत्र मुख्याध्यापक नेमणेसाठी अगोदर मुख्याध्यापक (प्राथमिक विभाग) या पदास राज्य शासनाची मान्यता घेणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली व शासनाची मान्यता मिळालेनंतर सदर पद भरणेबाबत कार्यवाही करण्यात यावी" असे ठरले.

त्यानुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीमय स्कुलचे प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापकाचे एक स्वतंत्र पद आकृतीबंधामध्ये नव्याने समाविष्ट करणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यावर शासन निर्णय क्र.सासंवि २०१४/८०/ प्र.क्र.२५/ का.१६ दि.२५ सप्टेंबर, २०१४ नुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या आस्थापनेवरील आकृतीबंधात प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापकाचे एक स्वंतत्र पद समाविष्ठ करण्यास मा.उच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लिकेशन क्र.१२०५६/२०१२ दि.१६.१०.२०१२ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुशंगाने मा.उच्च न्यायालयाची रितसर पूर्व मान्यता घेण्याच्या अटीवर शासनाने मान्यता दिली.

उपरोक्त शासन मान्यतेच्या अटीनुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील अर्ज दाखल करण्यात आला होता. त्यावर मा.उच्च न्यायालयाने दि.१३.०३.२०१५ रोजीचे आदेशाने श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या आस्थापनेवरील आकृतीबंधात प्राथमिक विभागासाठी एक स्वतंत्र मुख्याध्यापकाचे पद समाविष्ठ करण्यास मान्यता दिलेली आहे.

त्यास अनुसरून मुख्याध्यापक (प्राथमिक विभाग) हे पद पदोन्नतीने भरणेकामी शाळा संहितानुसार आवश्यक असलेल्या सर्व अर्हता व निकष श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य, सहा.शिक्षिका, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभाग यांनी पूर्ण केल्याने त्यांची प्राथमिक विभागाकडील इयत्ता०१ ली ते ०५ वी एकुण २४ वर्ग तुकडी अंदाजे १२९५ विद्यार्थी पट संख्या संभाळणेकामी शाळा संहितानुसार वेतनश्रेणी देऊन प्राथमिक विभागाकडील मुख्याध्यापक पदी पदोन्नतीने नेमणूक करणेचा प्रस्ताव मा.व्य.समितीचे दि.०८.१०.२०१५ चे सभेत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर निर्णय क्र.३२७ नुसार "सेवाजेष्ठता व गोपनीय अहवालाची प्रतवारी पाहाता, श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य यांची प्राथमिक विभागाकडील मुख्याध्यापक पदी नेमणूक करणेत येऊन, त्या पदाची वेतनश्रेणी देण्यात यावी" असे ठरले.

त्यानुसार जा.क्र.एससएस/साप्रशा/आस्था/५१९९/२०१५ दि.१८ डिसेंबर, २०१५ रोजीचे नेमणूक आदेशान्वये श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य यांची मुख्याध्यापक प्राथमिक विभाग, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल या पदावर नेमणूक करण्यात आलेली आहे. नेमणूक आदेशानुसार त्यांचा परिविक्षाधीन कालावधी दि.१७ डिसेंबर, २०१६ रोजी संपुष्टात येत आहे.

श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य, मुख्याध्यापक, प्राथमिक विभाग, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल यांचे कामकाज समाधानकारक असलेबाबत प्रशासकीय अधिकारी, शैक्षणिक संकुल यांनी अभिप्राय दिलेला आहे.

**मागणी-** सबब श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य, मुख्याध्यापिका, प्राथमिक विभाग यांचा परिविक्षाधीन कालावधी दि.१७ डिसेंबर, २०१६ रोजी संपुष्टात आल्याने व त्यांचे कामकाज समाधानकारक असल्याने त्यांना दि.१८ डिसेंबर, २०१६ पासून मुख्याध्यापक, प्राथमिक विभाग श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल या पदावर कायम करणेस मिळणेस विनंती.

**(ब)** दरम्यानचे काळात श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य, मुख्याध्यापिका, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल यांनी त्यांचे दि.२४.११.२०१६ रोजीचे अर्जान्वये "माझ्याकडे प्राथमिक विभागाचे इ.१ ली ते ५ वी. चा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. तसेच नेमणूक आदेशातील अटी व शर्ती मधील क्र.०८ नुसार प्राथमिक विभागाचे सर्व प्रशासकीय व कार्यालयीन कामकाज प्राचार्य, माध्यमिक विभाग यांचे नियंत्रणाखाली करणेबाबत नमुद केलेले आहे, या बाबींमुळे शालेय कामकाजात अडचणी निर्माण होत आहेत. तसेच स्वतंत्र कार्यभार नसल्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

१. माझे नेमणूक आदेशानुसार माझ्याकडे इ.१ ली ते ५ वी.चा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे, मात्र शालेय शिक्षण विभाग व शिक्षणाधिकारी यांचेकडून इंग्लिश मिडीयम स्कुलचे प्राथमिक विभाग इ.१ ली ते ०७ वी चे वर्गांना एकत्रित मंजुरी असून, माध्यमिक विभाग इ.८ वी ते १० वीचे वर्गांना एकत्रित मंजुर देण्यात आलेली आहे.

२. त्यामुळे पंचायत समिती, जिल्हा परिषद या ठिकाणी होणारे विविध सभा, त्यांचेकडून प्राप्त होणारी परिपत्रके, आदेश यांची पुर्तता करतांना इ.६ वी व ७ वी चे वर्गांचेबाबत निर्णय घेतांना अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे सध्या मी माझ्याकडे इ.१ ली ते ५ वी चे वर्गांचा कार्यभार असतांनाही इ.१ ली ते ७ वी चे वर्गांचा कार्यभार पाहत आहे.

३. मात्र अशा परिस्थितीमध्ये इ.६ वी व ७ वी.चे वर्गांवर अध्यापन करणारे शिक्षकांमध्येही संभ्रमावस्था निर्माण झालेली आहे. कारण त्यांनी दैनंदिन कामकाज करतांना माध्यमिक विभागाचे प्राचार्यांचे आदेशा पाळावयाचे की, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापकांचे आदेश पाळावयाचे याबाबत ते नेहमी तक्रारी करत असतात.

४. तसेच मा.शिक्षणधिकारी, मा.गट शिक्षणाधिकारी किंवा शालेय शिक्षण विभागाशी प्राथमिक विभागासंदर्भात (इ.१ली ते इ.७ वी) पत्रव्यवहार करतांना तो माझ्या नावाने होत असतो. शासनाचे सरल डाटा प्रणालीमध्येही माझ्याकडे इ.१ ली ते ७ वी चे वर्गांचा मुख्याध्यापक पदाचा कार्यभार निर्देशीत केलेला आहे.

५. संस्थानचे नेमणूक आदेशामध्ये माझ्याकडे इ.१ ली ते ५ वीचे वर्गांचा कार्यभार आहे. माध्यमिक विभागाचे प्राचार्य यांचेकडे इ.८ वी ते १० वी.चा कार्यभार आहे. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये इ.६ वी व इ.७ वी चे वर्गांबाबत मला किंवा माध्यमिक विभागाकडील प्राचार्य यांना कोणतीही ठोस भुमिका अथवा निर्णय घेता येत नाही.

६. शासनाचे शालेय शिक्षण विभागाचे धोरणानुसार इ.१ ली ते इ.७ वी हा प्राथमिक विभाग व इ.८ वी ते इ.१० वी हा माध्यमिक विभाग असे वर्गीकरण आहे. त्यामुळे शालेय शिक्षण विभागाकडे प्राथमिक विभागासंदर्भात होणारा सर्व पत्रव्यवहार हा माझ्याच स्वाक्षरीने होत असतो, तसेच सदर ठिकाणी होणारे सर्व मिटींगसाठी मला उपस्थित राहून, विद्यार्थी अथवा शिक्षकांचे बाबतचे काही निर्णय जागेवर घ्यावे लागतात. मात्र मला नेमणूक आदेशानुसार प्राचार्य, माध्यमिक विभाग यांचे नियंत्रणाखाली काम करावे लागत असल्यामुळे मी कोणताही निर्णय स्वतंत्रपणे घेऊ शकत नाही. त्यामुळे मिटींगमध्ये अथवा वरिष्ठांसमोर माझी व पर्यायाने संस्थानची नाचक्की होत असते.

७. तसेच मला प्राचार्य, माध्यमिक विभाग यांचे नियंत्रणाखाली काम करणेबाबत आदेशीत झालेले असल्यामुळे प्राथमिक विभागाकडील शिक्षकही माझ्या सुचना, आदेश पाळत नाही. ते परस्पर प्राचार्य माध्यमिक यांचेकडे रजा अर्ज सादर करणे, त्यांना विचारुन संकुलाचे बाहेर जाणे, अथवा काही प्रसंगी दोघांनाही न विचरता रजा अर्ज भरणे अथवा बाहेर जाणे असे प्रकार घडत आहेत.

८. तसेच प्राथमिक विभागाकडील बहुतांशी शिक्षक, लिपीक, वर्ग ०४ कर्मचारी हे आमचेवर माध्यमिक विभागाचे प्राचार्य यांचे नियंत्रण आहे, त्यामुळे तुम्ही आम्हांला काही सुचना देऊ नका असे बोलतांना अथवा कृतीमधून जाणीव करुन देत असतात. त्यामुळे सदर पदावर काम करतांना अनेक वेळा मनस्ताप व अपमान सहन करावा लागत आहे. त्यामुळे मला माझ्या पदास पुर्णपणे न्याय देता येत नाही.

तरी आपणास विनंती करते की, उपरोक्त अ.क्र.१ ते ८ चे मुद्यांबाबत विचार होऊन श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील दैनंदिन शालेय कामकाजात सुधारणा करणेकामी शालेय शिक्षण विभागाकडील धोरणानुसार व शाळेचे मंजुरी नुसार, माझ्या नेमणूक आदेशामध्ये सुधारणा होऊन, माझ्याकडे इ.१ ली ते ७ वी चे वर्गांचा कार्यभार स्वतंत्रपणे देणेत यावा, अशी विनंती केलेली आहे.

श्रीमती वैद्य यांचे अर्जातील मागणी, त्यांनी नमुद केलेल्या अ.क्र.०१ ते ०८ मुद्यांचे अवलोकन व श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील दप्तराची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे वस्तुस्थिती निर्देशनास आलेली आहे.

१. श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडील प्राथमिक विभागाकरिता इ.१ ली ते ०७ वी. च्या वर्गांना मा.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडून एकत्रित मान्यता मिळालेली आहे. तर माध्यमिक विभागाकरिता इ.०८ ते १० वी च्या वर्गांना मा.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून एकत्रित मान्यता मिळालेली आहे.

२. तसेच इ.१ ली ते ०७ वी च्या (प्राथमिक) वर्गांकरिता शासनाचा सांकेतिक क्रमांक (Udise No.) 27261003312 असा असून, इ.०८ ते १० वी च्या (माध्यमिक) वर्गांकरिता शासनाचा सांकेतिक क्रमांक (Udise No.) 27261003311 असा आहे.

३. तसेच शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र.प्राशातु-१११२/(२५८/२०१२)/प्राशि-३, दि.१३ फेब्रुवारी, २०१३ अन्वये इ.१ ली ते ८ वी पर्यंतचे शिक्षणास प्राथमिक शिक्षण म्हणून संबोधण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत. मात्र आपल्या शाळेची प्राथमिक विभागाची मंजुरी ही इ.१ ली ते ०७ पर्यंत आहे.

४. तसेच सद्यस्थितीमध्ये इंग्लिश मिडीमय विभागाकडे तीन विभाग कार्यरत आहेत (०१.पुर्व प्राथमिक, ०२ प्राथमिक, ०३ माध्यमिक) त्यामधील विद्यार्थी संख्येचा तपशिल पुढीलप्रमाणे

| **अ.क्र.** | **विभाग** | **इयत्ता** | **तुकड्या** | **विद्यार्थी संख्या** |
|---|---|---|---|---|
| ०१. | पुर्व प्राथमिक | ज्यु.के.जी. व सि.के.जी. | १० | ५०० |
| ०२. | प्राथमिक | इ.०१ ली ते ०७ वी | ३४ | १६४२ |
| ०३. | माध्यमिक | इ.०८ वी ते १० वी | ०७ | ३०० |

५. सध्या इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडे प्राथमिक व माध्यमिक विभागांसाठी दोन स्वतंत्र मुख्याध्यापकांचे पदे मंजूर असून, त्याप्रमाणे मुख्याध्यापक कार्यरत आहेत. मात्र पुर्व प्राथमिक विभागाबाबत शाळा संहितेमध्ये कोणत्याही प्रकारची नियमावली नाही. त्यामुळे पुर्व प्राथमिक विभागाकडील मुख्याध्यापक पदाचा कार्यभार कोणाकडे असावा याबाबत संभ्रम निर्माण होत आहे.

६. त्यामुळे गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, राहाता यांचे कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन चर्चा केली असता, त्यांनीही पुर्व प्राथमिक विभागाबाबत कोणत्याही प्रकारची नियमावली नाही. सदरबाबत संस्था चालकांनी योग्य तो निर्णय घ्यावा, असे तोंडी कळविलेले आहे.

७. अ.क्र.०४ मध्ये नमुद केलेल्या विद्यार्थी संख्येचा विचार करता, प्राथमिक विभागाकडील मुख्याध्यापिका यांचेकडे एकुण ३४ वर्ग तुकड्यांचा कार्यभार होत असून, त्यामध्ये एकुण १६४२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांचे तुलनेने माध्यमिक विभागाकडील मुख्याध्यापक यांचेकडे फक्त ०७ वर्ग तुकड्यांचा कायभार असून, ३०० विद्यार्थी शिक्षण घेत आहे, त्यामुळे Work load चा विचार करता पुर्व प्राथमिक विभागाचा कार्यभार हा माध्यमिक विभागाकडील प्राचार्य यांचेकडे सोपविणे योग्य होईल.

८. तसेच शाळा संहितेनुसार प्राथमिक विभागाकडील मुख्याध्यापकांना निवृत्तीअखेर शिल्लक असलेल्या अर्जित रजेचे रोखीकरण करता येत नाही. म्हणजेच त्यांना दिर्घकालीन सुट्ट्या (उन्हाळी, दिपावली व नाताळ) उपभोगता येतात. मात्र माध्यमिक विभागाकडील प्राचार्य यांना दिर्घकालीन सुट्टीच्या कालावधीत शाळेमध्ये उपस्थित राहणे बंधनकारक असते.

९. पुर्व प्राथमिक विभागाकडील ज्यु.के.जी. ची प्रवेश प्रक्रिया ही एप्रिल, मे व जुन या महिन्यांमध्ये होत असते, सदर कालावधी हा दिर्घकालीन सुट्टीचा कालावधी असून, त्या कालावधीमध्ये माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक हे शाळेमध्ये उपस्थित असतात, त्यामुळे पुर्व प्राथमिक विभागाचा कार्यभार हा माध्यमिक विभागाचे प्राचार्यांकडे सोपविणे योग्य होईल.

**मागणी-** उपरोक्त परिस्थिती, शाळा संहिता नियमावली व कागदपत्रांचे अवलोकन करता शालेय कामकाजात सुसुत्रता येणेसाठी तसेच शासनाचे धारेणानुसार इ १ ली ते ०७ वीचे वर्गांचा (प्राथमिक विभाग) चा कार्यभार श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य, मुख्याध्यापिका, प्राथमिक विभाग यांचेकडे स्वतंत्रपणे सोपविणेस तसेच पुर्व प्राथमिक विभागाचा कार्यभार श्री.ए.ए.तांबोळी, प्राचार्य माध्यमिक विभाग यांचेकडे सोपविणेस मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त **(अ)** व **(ब)** बाबत निर्णय होणेकामी सविनय सादर.

**निर्णय क्र.१९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य यांचा परिवीक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असलेने, त्यांना त्यांचा परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असलेचे तारखेपासून इंग्लिश मिडीयम स्कुलकडे मुख्याध्यापक (प्राथमिक विभाग) या पदावर कायम करणेस व त्या पदाची वेतनश्रेणी लागू करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच शाळा संहिता नियमावली व कागदपत्रांचे अवलोकन करता, शालेय कामकाजात सुसुत्रता येणेसाठी शासनाचे धारेणानुसारइ.०१ ते ०७ वी चा कार्यभार स्वतंत्रपणे श्रीमती शिल्पा वैद्य यांचेकडे देणेत यावा व पुर्व प्राथमिक विभागाचा कार्यभार श्री.ए.ए.तांबोळी, प्राचार्य माध्यमिक विभाग यांचेकडे सोपविणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७** **श्री साईबाबा संस्थान परिसरात रेल्वे बुकींग काऊंटर सुरु करणेकामी सेवाधाम इमारतीतील जागा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७ (३) प्रमाणे विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहीत झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही.

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान परिसरात रेल्वे बुकींग काऊंटर सुरु करणेकामी सेवाधाम इमारतीतील जागा विनामुल्य वापरास मिळणेबाबत डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर (कमर्शियल), सोलापूर यांचेकडील पत्र क्र.एसयूआर/ सी/ कॉग/यूटीएस/ ५६८/१६ दि.२६/१०/२०१६ प्राप्त दि.०६/१२/२०१६ रोजीचे पत्रावर निर्णय घेणे.

**प्रस्तावना-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील विषय क्रं.३३ निर्णय क्रं.५४२ अन्वये रेल्वेनेही तिकीट आरक्षणासाठी जागेची मागणी केल्यास त्यांनाही सेवाधाम इमारतीमध्ये जागा उपलब्ध करुन देण्यात यावी,असे ठरलेले आहे.

त्यास अनुसरुन इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/३१०३/२०१६ दि.१५/०९/२०१६ अन्वये मा.डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर, (कमर्शियल), सेंट्रल रेल्वे, सोलापूर यांना रेल्वे तिकीट आरक्षण काऊंटरसाठी संस्थानचे सेवाधाम इमारतीमधील जागा (एक रुम) ११ महीन्यांचे कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ठरविण्यात येणारे भाडे दराप्रमाणे दरमहा भाडेतत्वावर व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन रेल्वे विभागास बुकींग काऊंटरसाठी देणेचे प्रस्तावित आहे. तरी सदरची जागा पाहणी करुन निश्चितीबाबत संस्थानला कळविणेकामी कळविलेले आहे.

तद्नंतर मा.डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर (कमर्शियल) सेंट्रल रेल्वे,सोलापूर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.एसयूआर/ सी/५१८/आरईएसव्ही/एसएनएसआर/१६ दि.१३/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये रेल्वे तिकीट रिझर्वेशन काऊंटरसाठी सेवाधाम इमारतीतील दोन रुमची मागणी केलेली आहे. मा.डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर (कमर्शियल) सेंट्रल रेल्वे, सोलापूर यांचे उपरोक्त मागणीप्रमाणे त्यांना सेवाधाम इमारतीतील दोन रुम (अंदाजे १० X १०) साईजच्या उपलबध करुन देता येतील व त्यांचेकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ठरविण्यात येणारे भाडे दराप्रमाणे दरमहा भाडेतत्वावर ११ महीन्यांचे कालावधीसाठी व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा याप्रमाणे भाडेकरारावर रेल्वे आरक्षण काऊंटरसाठी देण्याचे इकडील दि.२२/०९/२०१६ रोजीच्या कार्यालयीन टिपणीप्रमाणे प्रस्तावित करणेत आले.

त्याप्रमाणे इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/ मालमत्ता/ ३४१२/ २०१६ दि.०१/१०/२०१६ अन्वये मा.डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर (कमर्शियल) सेंट्रल रेल्वे, सोलापूर यांना कळविणेत आले. तसेच उक्त जागेचे भाडे प्रमाणपत्र मिळणेकामी मा.उपअभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,राहाता यांना इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/ मालमत्ता/ ३२४७/ २०१६ दि.२३/०९/२०१६ अन्वये कळविणेत आले.

त्याप्रमाणे मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी त्यांचेकडील जा.क्रं. रेषा/ १०१४६/ २०१६ दि.२०/१२/२०१६ अन्वये इकडेस भाडे प्रमाणपत्र सादर केले असून त्यात त्यांनी "संस्थान मालकीचे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.११९ मधील एकूण जोत्याचे क्षेत्रफळ ९/३४ चौ.मी.असलेली इमारत (१०X१० दोन गाळे) १) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ व २) रेल्वे विभाग यांनी त्यांच्या कार्यालयासाठी

घेतलेल्या इमारतीचे मासिक भाडे रु.७९२/- (अक्षरी रु.सातशे ब्याण्णव मात्र) दरमहा स्थानिक कर वगळून ठरविण्यात आलेले आहे. सदरचे प्रमाणपत्र हे सदर इमारत ताब्यात घेतल्यापासून ते इमारत रिक्त करेपर्यंत ग्राहय राहील," असे नमूद केलेले आहे.

दरम्यानचे काळात मा.डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर (कमर्शियल),सोलापूर यांनी त्यांचेकडील उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये उपरोक्त देवू केलेल्या सेवाधाम इमारतीतील दोन रुम विनामोबदला वापरण्यास देणेस इकडेस विनंती केलेली आहे.

रेल्वे विभागास उपरोक्तप्रमाणे विनामोबदला रेल्वे तिकीट आरक्षण काऊंटरसाठी जागा दिल्यास इतर संस्था, महामंडळे, शासकीय कार्यालये हे देखील विनामोबदला जागेची मागणी करतील. तेंव्हा रेल्वे तिकीट आरक्षण काऊंटरसाठी जागा विनामोबदला देणे उचित होणार नाही,असे इकडील नम्र मत आहे.

यापूर्वी सेवाधाम इमारतीतील एक गाळा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने देखील संगणकीय आगावू आरक्षण केंद्रासाठी विनामोबदला वापरण्यास मिळणेकामी विनंती केलेली होती. त्याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे बैठकीत सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्रं.८३७ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होवून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे संगणकीय आगावू आरक्षण केंद्रासाठी संस्थान मालकीचे शिर्डी येथील सेवाधाम इमारतीमधील जागा वापरास देणेस मान्यता देण्यात आली. परंतु याकामी विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी. तसेच सदरहू जागा विनामुल्य देणे उचित होणार नाही याकरीता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेकडून संस्थान नियमानुसार भाडे आकारणी करणेत यावी,असे ठरले."

**विभागाचा अभिप्राय–** उपरोक्त निर्णयाप्रमाणे रेल्वे विभागास विनामोबदला जागा वापरास देणे उचित होणार नाही, असे नम्र मत आहे.

तथापि रेल्वे विभागाची सेवा सार्वजनिक उपक्रमातील भाग असून सर्वसामान्य जनतेच्या हिताचे असलेने त्यांचेकडून सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेल्या भाडे दराप्रमाणे एका गाळयास दरमहा मासिक भाडे रु.७९२/- प्रमाणे पुढील एक गाळा (पश्चिमेकडील) व त्यामागील एक गाळा (पूर्वेकडील) असे एकूण दोन गाळयांचे दरमहा मासिक भाडे रु.१,५८४/- (रु.एक हजार पाचशे चौ-यांशी मात्र) व मीटर रिडींग प्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन ११ महीन्यांचे भाडे कराराने देणे उचित होईल. सदरचे भाडे हे अत्यल्प असल्याने मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर यांनी त्यांचे उपरोक्त प्रमाणपत्रात सदर इमारत ताब्यात घेतलेपासून ते इमारत रिक्त करेपर्यंत ग्राहय राहील, असे जरी नमूद केले असले तरी भाडे दरात पुढील दर ११ महीन्यांच्या मुदतीसाठी १० टक्के वाढ करुन आवश्यकतेनुसार मुदत वाढवून देता येईल व तशी अट भाडे करारनाम्यात टाकता येईल व त्याप्रमाणे भाडे करारनामा करुन घेता येईल.

तरी रेल्वे विभागास उपरोक्त दोन गाळे सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेल्या भाडे दराप्रमाणे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन ११ महीन्यांचे भाडे कराराने व सदर भाडे दरात पुढील दर ११ महीन्यांच्या मुदतीसाठी १० टक्के वाढ करणेच्या अटीवर देण्याच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर रेल्वे स्टेशनवर संस्थान वापरासाठी जागा देणेचे अटीवर, प्रस्तावात नमुद केलेले सेवाधाम इमारतीमधील दोन गाळे, रेल्वे बुकींग काऊंटर साठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेल्याभाडे दराप्रमाणे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन ११ महीन्यांचे भाडे कराराने रेल्वेस उपलब्ध करुन देण्यात यावे.**

**तसेच सेवाधाम इमारतीमध्ये साईसेवकांना रहाण्याची व्यवस्था करावयाची असल्यामुळे विविध कर्मचारी संघटना, होमगार्ड, विद्युत मंडळ व इतरांना वापरासाठी दिलेल्या खोल्या त्वरीत खाली करुन घेण्यात याव्या, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **समाधी मंदिर ए.सी.प्लांट यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या एक वर्षाचे कालावधीकरीता CAMC देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमामधील तरतूद २०१४:** (1) कलम)(2)14 घ – (भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (2) कलम 21 (1)(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

**प्रस्तावना:** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०९.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ८७९ अन्वये श्री साईभक्तांना उष्णतेचा, सफोकेशनचा त्रास होऊ नये याकरीता समाधी गाभारा, झुंबर गाभारा, नंदी गाभारा, स्टेज गाभारा, भुयारी दर्शन रांग तसेच म्युझियम हॉल या सर्व ठिकाणी एकुण १८१ टन क्षमतेचे रुपये ८६,००,०००/- (अक्षरी रुपये शहाऐंशी लाख) मात्र इतक्या किंमतीचे एकूण १२ सेंट्रल ए.सी. प्लांट देणगीदार साईभक्त यांचेमार्फत बसवून कार्यरत करणेत आलेले आहेत. सदर यंत्रणा दिनांक २८/०३/२०१५ रोजी कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या सर्व यंत्रणेचा वारंटीचा कालावधी एक वर्षाचा होता, सदर कालावधी एप्रिल २०१६ अखेर संपलेला आहे.

**मागणी:** सदरची यंत्रणा सतत कार्यान्वित असणे आवश्यक आहे. सदर यंत्रणेत बिघाड झाल्यास तातडीने दुरुस्त करणेकामी लागणारे स्पेअरपार्ट त्वरीत उपलब्ध असणे गरजेचे आहे. जर स्पेअर्स उपलब्ध नसतील तर सेट्रंल ए.सी. दुरुस्तीकामांत अडचणी निर्माण होईल. याकरीता या सर्व सेंट्रल ए.सी. प्लांट यंत्रणेचे सन २०१६ -२०१७ या कालावधीसाठी CAMC देणेकामी प्लांटचे उभारणी करणारे मे. व्यकंटेश्वरा टूंकी प्रोजेक्ट सोल्युशन प्रा. लि., पुणे यांचेकडून दरपत्रक मागविले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत :

| Sr. No. | Description | Capacity | Amount Rs. |
|---|---|---|---|
| 1. | Compressive Annual Maintenance Contract of Samadhi Mandir & Premises Central A/C. Plant | 181 Ton | 7,53,100/- |

उपरोक्तप्रमाणे रुपये ७,५३,१००/- मात्रचे दर प्राप्त झाले असून, या रकमेतून २०% दर कमी करुन, पुढील एक वर्ष कालावधीकरीता CAMC देणेकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

| Sr. No. | Description | Capacity | Amount Rs. |
|---|---|---|---|
| 1. | Compressive Annual Maintenance Contract of Samadhi Mandir & Premises Central A/C. Plant | 181 Ton | 6,02,480/- |

उपरोक्तप्रमाणे समाधी मंदिरात समाधी गाभारा, झुंबर गाभारा, नंदी गाभारा, स्टेज गाभारा, भुयारी दर्शन रांग तसेच म्युझियम हॉल इत्यादी ठिकाणी बसविलेल्या ए.सी. प्लांटचे सन २०१७-१८ या कालावधीसाठी वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये ६,०२,४८०/ मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाकडे मंजूर अंदाजपत्रक २०१६-२०१७ मधील 'मशीनरी दुरुस्ती व देखभाल खर्च' या शिर्षाखाली आज अखेर शिल्लक रुपये ११,२८,५२५/- मात्रचे रकमेतून करता येईल. सदर खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे.

**मान्यता-** प्रशासकीय मान्यता आवश्यक

**विभागाचे अभिप्राय/ स्पष्ट मत:** समाधी मंदिरातील सर्व सेट्रल ए.सी. यंत्रणा कार्यान्वित राहणे आवश्यक असलेने समाधी मंदिर व परिसरातील सर्व सेंट्रल ए.सी. प्लांट यंत्रणेचे सन २०१७-१८ या एक वर्ष कालावधीकरीता कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी येणा-या अंदाजे रुपये ६,०२,४८०/- (अक्षरी रुपये सहा लाख, दोन हजार, चारशे ऐंशी) मात्रचे खर्चास व महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर ई-निविदा नोटीस प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिरातील सर्व सेट्रल ए.सी. यंत्रणा कार्यान्वित राहणेसाठी समाधी मंदिर व परिसरातील सर्व सेंट्रल ए.सी. प्लांट यंत्रणेचे सन २०१७-१८ या एक वर्ष कालावधीकरीता कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **कुकींग रेज (गॅस शेगडया) खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.** १४ (भाग ४) मध्ये १४ (२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रस्तावना-** श्री साईभक्तांना देण्यात येणारा लाडू हा लाडू प्रसाद निर्मिती विभागामार्फत नविन प्रसादालयातील लाडू किचनमध्ये तयार करणेत येत आहे. साईभक्तांना पाहिजे तेवढी लाडू पाकीटे उपलब्ध करुन देणेसाठी सदरचे किचन अपुरे पडणार असल्याने जुने प्रसादालय इमारतीचा वापर करुन लाडू निर्मिती करणेसाठी नविन युनिट सुरु करावयाचे आहे. मात्र या ठिकाणी वापरांकरीता गॅस भट्ट्या लाडू विभागाकडे शिल्लक नसल्याने ते मेकॅनिकल विभागामार्फत नविन १० भट्टया खरेदी करुन मिळाव्यात, असे लाडू निर्मिती विभागाने त्यांचे दिनांक २२/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

**मागणी:-** लाडू प्रसाद निर्मिती विभागाचे मागणीनुसार नविन १० भट्टया आणि मटेरिअल खरेदी करणेकामी किचन इक्युपमेंट फॅब्रीकेटर्स यांचेकडून खरेदी करणेकासाठी अपेक्षित खर्च अंदाजाकरीता ई-मेलव्दारे दरपत्रके मागविण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांनी खालील तपशीलाप्रमाणे खर्च कळविला आहे

| **अ.नं.** | **कंपनीचे नाव** | **प्रती नगाचे दर रु.** | **१० कुकींग रेंज करीता दर रुपये** |
|---|---|---|---|
| १ | एस.एस. इक्युपमेंट, औरंगाबाद | ३४,४००/- | ३,४४,०००/- |
| २ | पद्माटेक इंडस्ट्रीज प्रा. लि. भोसरी, पुणे | ३९,४२०/- | ३,९४,२००/- |
| ३ | मेटल फॅब्रिकेटर्स ऑफ इंडिया , मुंबई | **३२,६१०/-** | **३,२६,१००/-** |

उपरोक्त तक्तानुसार मेटल फॅब्रिकेटर्स ऑफ इंडिया, मुंबई यांचे दर निम्न्क्तम असून १० नग कुकींग रेंज करीता रक्कम रु. ३,२६,१००/- मात्र खर्च येत असून, या खर्चामध्ये २०% कपात करुन रुपये २,६०,८८०/- (अक्षरी रुपये दोन लोख, साठ हजार, आठशे ऐंशी) मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन किचन इक्युपमेंट फॅब्रिकेटर्स यांचेकडून बंद पाकिटात दरपत्रक मागविणेत येईल सदरचा खर्च मेकॅनिकल विभागाकडील सन २०१७-१८ या वर्षाचे अंदाजपत्रकात नविन मशिनरी व इक्युपमेंट खरेदी कामी मंजूर रक्कमेतून करता येईल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** तरी लाडू किचनकरीता १० नग हेव्ही ३०४ स्टे. स्टील कुकींग रेंज विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु. २,६०,८८०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडू किचनकरीता १० नग हेव्ही ३०४ स्टे. स्टील कुकींग रेज (गॅस शेगडया) विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,६०,८८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **माहे जुलै २०१६ ते सप्टेंबर २०१६ जमा-खर्च तक्त्यांची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** लेखाशाखा विभागामार्फेत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे जुलै २०१६ ते सप्टेंबर २०१६ या कालावधीतील मासिक जमा खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

त्यास अनुसरून माहे जुलै २०१६ ते सप्टेंबर २०१६ या महिन्यांचा जमा खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे –

| **महिना** | **जमा** | **खर्च** |
|---|---|---|
| जुलै २०१६ | ४०,२५,०५,६७०/- | २०,२६,८३,२१८/- |
| ऑगस्ट २०१६ | ५६,९७,७९,९६५/- | १८,०४,३९,९४८/- |
| सप्टेंबर २०१६ | ३६,११,१३,१३८/- | ३२,२९,९३,५८७/- |

तरी माहे जुलै २०१६ ते सप्टेंबर २०१६ या कालावधीतील मासिक जमा खर्चाचे तक्ते नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.२०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जुलै २०१६ ते सप्टेंबर २०१६ जमा-खर्च तक्त्यांचे अवलोकन करणेत आले. तसेच सदरहू तक्ते विवरणासहीत सादर करणेत यावे व यामध्ये प्रशासनावरील खर्चाचाही समावेश करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **श्री साईबाबांच्या जीवन चरित्रावर हिंदी भाषेतील पोवाडा संस्थानमार्फत ध्वनीमुद्रीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुदः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं खालील ठ मध्ये १७. .प्रमाणे तरतुद आहे

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविकः-** श्री. किशोर सुदाम सासवडे, प्रवरानगर यांचे दि.०५.०३.२०१६ रोजीचा प्रस्ताव इकडील कार्यालयास प्राप्त झालेले होता.

प्रकाशने विभाग दि.२६.०३.२०१६ रोजीचा मंजूर प्रस्तावानुसार श्री.किशोर सासवडे, प्रवरानगर यांचे पोवाडयाचे स्क्रीप्ट व सी.डी. चिकीत्सा/ अध्ययान करुन संस्थानमार्फत ध्वनीमुद्रीत करुन साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यास योग्य होईल किंवा कसे याबाबत श्री. सुभाष कि. जगताप, माजी प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना पाठविणेबाबत मान्यता मिळालेली होती.

श्री. सुभाष कि. जगताप, माजी प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि. २५.११.२०१६ रोजी श्री.किशोर सासवडे, प्रवरानगर यांचे पोवाडयाचे स्क्रीप्ट व सी.डी. चिकीत्सा / अध्ययन करुन लेखी अहवाल इकडील कार्यालयास पाठविला आहे. सदर अहवालचा शेरा आहे तसा पुढील प्रमाणे सादर करीत आहे.

"पोवाडा मराठी अगर हिंदी प्रकारास भक्तांची मागणी नसते. श्री साई सच्चरित, श्री साईनाथ स्तवनमंजीरी व आरती यांनाच मागणी असते फार तर श्री साईलीला मासिकात प्रसिध्दी द्यावी" असा अहवाल प्राप्त झालेला आहे.

**ठरावः-** संस्थानने प्रकाशित होणा-या प्रकाशनांची वाढती संख्या विचारात घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४.०५.२००८ चे सभेत "इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्वीकारण्यात येऊ नयेत" असा निर्णय झालेला आहे.

**विभागाचा मागणी/ अभिप्राय/स्पष्ट मतः-** श्री. किशोर सासवडे, प्रवरानगर (कंत्राटी कर्मचारी, रेकॉर्ड विभाग) यांनी श्री साईबाबांच्याचरित्रातील घटना आणि प्रसंगावर तयार केलेले पोवाडे श्री. सुभाष जगताप, संस्थानचे माजी प्रशासकीय अधिकारी यांनी सदर पोवाडे संस्थानकडून ध्वनीमुद्रीत न करता श्री साईलीला मासिकात प्रसिध्दी द्यावी असा अहवाल दिलेला आहे.

सबब श्री. किशोर सासवडे, प्रवरानगर यांचा प्रस्ताव पोवाडे स्वरुपात असून त्यांची ओडिओ सीडी / व्हिसीडी संस्थानमार्फत निर्मिती करुन साईभक्तांना पुस्तकालयात विक्री करण्यात यावी असा प्रस्ताव आहे. सदर प्रस्तावाचा स्विकार केलेस अलीकडच्या काळात देशात श्री साईबाबांच्या जीवनावर असंख्य गाणी, भजने व भक्तीगीते वेगवेगळया भाषेत आहेत. ते गाणारे सर्व गायक, गीतकार व संगीतकार आपले ध्वनीमुद्रण साहित्यांची मास्टर सीडी संस्थानला जमा करुन संस्थानव्दारे प्रकाशित करण्याचा आग्रह धरुन विनंती पत्रे पाठवतील.

संस्थान पुस्तकालयात साईभक्तांसाठी बाबांचे मुळ साईचरित्रांची अध्यय्न वाचन, आरती व श्री साईनाथ स्तवनमंजीरी सीडी नामवंत गायकांकडून गाऊन संगीतबध्दकरण्यात आलेली असून विक्रीसाठी साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. मुळ साहित्यांचा प्रचार- प्रसार व्हावा असे प्रकाशने साईभक्तांना उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करीत आहे.

श्री. सुभाष जगताप, माजी प्रशासकीय अधिकारी यांचा उपरोक्त अहवाल स्विकारावा व श्री. किशोर सासवडे, प्रवरानगर यांचा पोवाडे स्वरुपात असून त्यांची ओडिओ सीडी ध्वनीमुद्रीत संस्थानकडून प्रकाशन करणेबाबतचा प्रस्ताव दप्तरी दाखल (फाईल) करणेकामी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेले विभागाचे स्पष्ट मत विचारात घेता, श्री साईबाबांच्या जीवन चरित्रावर हिंदी भाषेतील पोवाडा संस्थानमार्फत ध्वनीमुद्रीत करणेबाबतचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **चेंबर कव्हर (फ्रेमसह) खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**प्रस्तावना**:- उपरोक्त विषयांकित संदर्भान्वये साईधर्मशाळा विभाग, बांधकाम विभाग व साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील टिपण्या इकडील विभागास प्राप्त झालेल्या आहेत. सदर टिपणीन्वये त्यांनी संस्थान परिसरातील ब-याच ठिकाणची चेंबर झाकणे तुटलेली असल्याने, त्यामुळे संस्थान परिसरात दुर्गधी पसरणेची शक्यता नाकारता येत नाही. याकरीता पाणी पुरवठा विभागाकडुन तुटलेली चेंबर झाकणे बदलून मिळणेबाबत कळविलेले आहे.

**प्रस्ताव**:- याबाबत पाणीपुरवठा विभागाकडुन प्रत्यक्ष पाहणी केली असता, ब-याच ठिकाणची चेंबर झाकणे तुटलेली असल्याचे आढळुन आलेले आहे. याकरीता काही ठिकाणी पाणी पुरवठा विभागाकडे उपलब्ध असलेली चेंबर झाकणे बसविण्यात आलेली आहेत. परंतू ब-याच ठिकाणची झाकणे बदलविणे गरजेचे आहे. सदरहू झाकणे पाणी पुरावठा विभागाकडे उपलब्ध नसल्याने खरेदी करावी लागतील.

**मागणी:-** खरेदी करावयाच्या चेंबर झाकणांचा (फ्रेमसह) तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | परिमाण | नग | अंदाजे दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ९"X १२"X २" | LD | ३० | १५५.०० | ४,६५०.०० |
| ०२ | १२"X १२"X ३" | MD | ५० | २५५.०० | १२,७५०.०० |
| ०३ | १८"X १८"X ३" | MD | ५० | ९५५.०० | ४७,७५०.०० |
| ०४ | १८"X २४"X ३" | MD | ५० | ११६०.०० | ५८,०००.०० |
| ०५ | १८"X २४"X ४" | HD | २५ | १४२५.०० | ३५,६२५.०० |
| ०६ | १८"X ३६"X ३" | MD | ५० | १२६०.०० | ६३,०००.०० |
| ०७ | १८"X ३६"X ४" | HD | २५ | १८००.०० | ४५,०००.०० |
| ०८ | २४"X २४"X ३" | MD | ७५ | ११४५.०० | ८५,८७५.०० |
| ०९ | २४"X २४"X ३" (होल असलेले) | MD | ५० | ११४५.०० | ५७,२५०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | २४"X २४"X ४" | HD | ४० | १५६०.०० | ६२,४००.०० |
| ११ | २४"X ३६"X ३" | MD | ८० | १४६०.०० | १,१६,८००.०० |
| १२ | २४"X ३६"X ३" (होल असलेले) | MD | ४० | १४६०.०० | ५८,४००.०० |
| १३ | २४"X ३६"X ४" | HD | ५० | २००५.०० | १,००,२५०.०० |
| १४ | ३६"X ३६"X ३" | MD | २० | १९६०.०० | ३९,२००.०० |
| १५ | ३६"X ३६"X ३" (होल असलेले) | MD | १० | १९६०.०० | १९,६००.०० |
| १६ | ३६"X ३६"X ४" | HD | २० | २८४०.०० | ५६,८००.०० |
| १७ | ३६"X ३६"X ४" | HD | २० | ६४२५.०० | १,२८,५००.०० |
| १८ | ४८"X ४८"X ४" | HD | २० | ७०२०.०० | १,४०,४००.०० |
| १९ | राऊंड (गोल) झाकणे.<br>२१" व्यास X ३" जाड | MD | २० | ८५०.०० | १७,०००.०० |
| २० | राऊंड (गोल) झाकणे.<br>२१" व्यास X ४" जाड | HD | २० | १०९०.०० | २१,८००.०० |
| २१ | राऊंड (गोल) झाकणे.<br>२४" व्यास X ४" जाड | HD | २० | १५६०.०० | ३१,२००.०० |
| | | | | **एकुण पुर्णांकिंत रक्कम-** | **१२,०२,२५०.००** |

संस्थान परिसरातील ड्रेनेज पाईपलाईनवरील चेंबर झाकणे तुटलेली असल्याने वरील नमुद केलेप्रमाणे चेंबर झाकणे (फ्रेमसह) खरेदी करावे लागेल. याबाबत स्थानिक चेंबर झाकणे उपलब्ध करुन देणा-या दुकानदारांकडे चौकशी केली असता, त्यांनी वरीलप्रमाणे सध्याचे बाजारभावातील अंदाजे दर असल्याचे सांगितलेले आहे.

**अनुमान:- खर्चीक**

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** संस्थान परिसरातील ब-याच ठिकाणची चेंबर झाकणे तुटलेली असल्याने ते बदलणे गरजेचे आहे. श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ नुसार वरील नमुद तरतुदीस अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेतल्यानंतर सदरची चेंबर झाकणे (फ्रेमसह) खरेदी विभागामार्फत ई-निविदा मागवून खरेदी करता येतील असे मत आहे.

तरी वरील नमुद चेंबर झाकणे (फ्रेमसह) खरेदी करणेसाठी अंदाजे रु.१२,०२,२५०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरची चेंबर झाकणे (फ्रेमसह) विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.१२,०२,२५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.२०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरातील तुटलेली चेंबर झाकणे बदलणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **संस्थानचे मौजे कनकुरी येथील साठवण तलावांमध्ये ५०० मायक्रॉन एचडीपीई जी.ओ.मॅब्रेन शिट टाकणेचे कामाचे ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांचेकडून पुर्ण करण्यात आलेल्या कामास विनादंड मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:**

१. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) चा खंड (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे अशी तरतुद आहे".

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) चा खंड (ग) अन्वये, " भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे".

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय:** १. दि.१६/०४/२०१५ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत याबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्र.११४ संमत करण्यात आलेला आहे.

"....यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलाव कॅनव्हास प्रूफींग (जीओ मेंब्रन्स शिट) करणेकामी उपरोक्त प्रमाणे केलेल्या कार्यवाहीस संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले".

२. दि.१५/१२/२०१५ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत याबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्र.६०२ संमत करण्यात आलेला आहे.

"....यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलाव कॅनव्हास प्रूफींग (जीओ मेंब्रन्स शिट) करणेकामी निम्नतम दराचे ठेकेदार मे.आर.के. सावंत, नाशिक यांना दिलेल्या कार्यादेशास व उर्वरीत निविदाधाकांची बयाना रक्कम परत करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच कनकुरी साठवण तलावास कॅनव्हास प्रूफींग (जीओ मेंब्रन्स शिट) करणेकामी व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय संमत होऊनही निम्नतम दराचे ठेकेदारास कार्यादेश देणेस व उर्वरित निविदाधारकांची अनामत रक्कम परत करणेस तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी जाणीवपुर्वक विलंब केलेबाबत त्यांचेकडून लेखी खुलासा मागविण्यात यावा व अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन, मंत्रालय, मुंबई यांनाही याबाबत माहितीसाठी कळविणेत यावे, असे ठरले".

**प्रस्तावना:** मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांना जा.क्रं.एसएसएसटी/ पा.पु./४३५२/२०१५, दि.०४/११/२०१५ अन्वये एकूण रक्कम रु.३,५१,८६,८९६/- मात्र रक्कमेचा कार्यादेश देण्यात आलेला होता. सदर कामास ठेकेदार यांनी दि.१७/१२/२०१५ पासून सुरुवात केलेली होती. कार्योदेशानुसार सदर कामाची मुदत ०५ महिन्याची होती व त्यानुसार सदरहू काम दि.१६/०५/२०१६ रोजी पुर्ण होणे अपेक्षित होते तथापी खालील नमूद अडचणी व आलेले गोदावरी पाण्याचे आवर्तनाचे पाणी काम बंद ठेऊन साठवण तलावांमध्ये साठविण्यात आल्याने सदरहू कामास ५० दिवस विलंब झालेला आहे.

साठवण तलाव येथील तीन तलावांपेकी उत्तर बाजुकडिल साठवण तलाव क्रं.०१ चे काम पहिल्या टप्प्यात हाती घेण्यात आले होते. मा.तहसिलदार, राहाता यांनी दि.१९/०१/२०१६ रोजीचे पत्रान्वये संस्थान साठवण तलावात दि.२४/०१/२०१६ रोजी गोदावरी उजवा कॅनॉलचे पाणी संस्थानच्या तलावात पुरविण्यात येणार असल्याने हे पाणी साठविणे अत्यंत महत्वाचे आहे. यानंतरचे रोटेशन हे साधारण ९० दिवसांनी येणार असे कळविले. याकरीता दि.२२/०१/२०१६ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली संस्थान प्रशासकीय अधिकारी, उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), उप अभियंता (बांधकाम), पाणी पुरवठा विभाग प्रमुख व ठेकेदार प्रतिनिधी यांचे समवेत तातडीने बैठक बोलविण्यात आलेली होती.

या बैठकीत कामाच्या प्रगतीबाबत चर्चा करण्यात आली असता साठवण तलाव क्रं.०१ चे सुरु असलेले काम दि.२५/०१/२०१६ अखेर पूर्ण करणे शक्य नसल्याने साठवण तलावाचे तळामध्ये ठेकेदार यांनी लेव्हलींग व रोलींगचे काम पूर्ण करुन घ्यावे व दि.२३/०१/२०१६ रोजी नंतर काम बंद ठेऊन साठवण तलावांमध्ये पाणी भरणेस सुरवात करण्यात यावी तसेच या तलावातील पाणी संपल्यानंतर तळाचे Geomembrane Sheet टाकणे, त्यावर आर. सी. सी बिम व माती टाकण्याचे उर्वरीत कामे हाती घेण्यात यावी असे ठरले. त्यानुसार ठरलेप्रमाणे दि.२३/०१/२०१६ रोजी रात्री ९.०० वाजता संस्थानचे साठवण तलाव क्रं.०१ मध्ये पाणी सोडण्यात आले.

भविष्यातील पाणी टंचाईची भीषणता विचारात घेता संस्थानमार्फत ठरलेप्रमाणे दि.२३/०१/२०१६ रोजी काम बंद ठेऊन साठवण तलावांमध्ये पाणी साठवून घेण्यात आले. त्यावेळी जर गोदावरी कालव्यांस आलेल्या आर्वतनाचे पाणी साठवण तलावामध्ये साठविले गेले नसते तर संस्थानला भीषण पाणी टंचाईस सामोरे जावे लागले असते व त्यामुळे साईभक्तांची फार मोठया प्रमाणात गैरसोय झाली असती व संस्थानला टॅंकरव्दारे पाणी पुरवठा करावा लागला असता व त्यावर मोठया प्रमाणात अतिरिक्त खर्च झाला असता.

याबाबत दि.०२/०४/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आयत्या वेळचा विषय नं.१२ संस्थान परिसरास भाडोत्री टॅंकरव्दारे पाणीपुरवठा करुन घेणे व येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबतचे प्रस्तावात साईभक्तांची गैरसोय होवू नये यासाठी साठवण तलावात माहे जानेवारी २०१६ चे आवर्तनाव्दारे आलेले पाणी साठविण्यात येवून Geomembrane Sheet टाकणेचे काम तात्पुरते बंद ठेवणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे माहीती अवलोकनार्थ नमुद करण्यात आलेली होती.

सदर साठवण तलावाचे कामाकरीता आवश्यक Geomembrane Sheet, स्टील व इतर आवश्यक मटेरीयल ठेकेदार यांनी साईटवर आणुन ठेवलेले होते. तथापी त्यांचे काम बंद ठेऊन सदर तीनही साठवण तलावात गोदावरी कालव्यास आलेल्या आर्वतनाचे पाणी साठविण्यात आले.

सदर काम दि.१६/०३/२०१६ अखेरपर्यंत बंद होते. तदनंतर साठवण तलाव क्रं.०१ चे पाण्याचा वापर करून घेउन, सदर तलावाचे कामास दि.१७/०३/२०१६ पासून सुरूवात करणेत आली व दि.०८/०४/२०१६ रोजी तलाव क्रं.०१ चे काम पूर्ण करणेत आले.

दुस-या वेळी दि.०८/०४/२०१६ रोजी आलेल्या आर्वतनामध्ये साठवण तलाव क्रं. ०१ व ०२ मध्ये गोदावरी कालव्यास आलेल्या आर्वतनाचे पाणी साठविण्यात आले व साठवण तलाव क्रं.०३ रिकामा ठेवून तो ठेकेदार यांना कामास उपलब्ध करून देण्यात आला. त्यावेळी देखील आलेल्या आर्वतनामध्ये पाणी टंचाईची भीषणता विचारात घेता संस्थानमार्फत ०३ पैकी उर्वरीत ०२ साठवण तलावांमध्ये (साठवण तलाव क्रं.०१ व ०२) पाणी साठविण्यात आले. ठेकेदार यांना साठवण तलाव क्रं.०२ कामास उपलब्ध करून देण्यात आलेला नव्हता, त्यामुळे सदर तलावाचे काम दि.१९/०५/२०१६ अखेरपर्यंत बंद होते. सदर तलाव क्रं.०२ चे कामास दि.२०/०५/२०१६ पासून सुरूवात करणेत आली व त्यानुसार तलाव क्रं.०२ व ०३ ची सर्व कामे दि.०५/०७/२०१६ अखेर पूर्ण करणेत आली आहेत.

वरील विवेचनावरून असे दिसून येईल की, पाणी टंचाईची भीषणता विचारात घेता संस्थानमार्फत वेळोवेळी ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांचे चालू असलेले काम बंद ठेवून गोदावरी कालव्यास आलेल्या आर्वतनाचे पाणी संस्थान साठवण तलावांमध्ये साठविण्यात आलेले आहे. त्यामुळे याकामी झालेला ५० दिवसांचा विलंब हा भीषण पाणीटंचाईमुळे झालेला असून वेळोवेळी ठेकेदार यांचे काम बंद करुन गोदावरी कालव्यास आलेल्या आर्वतनाचे पाणी साठवण तलावांमध्ये साठविल्यामुळे तसेच ठेकेदार यांना पुढील कामांकरीता वाव नसल्याने झालेला आहे.

ठेकेदार यांनी दि.१०/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये, कामास झालेल्या विलंबाकरीता वरिलप्रमाणे कारणे नमूद करून दि.०५/०७/२०१६ अखेरपर्यंत विना दंड करता मुदतवाढीची तसेच अंतिम बील मिळणेची मागणी केली आहे.

ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांचे दि.१०/०९/२०१६ रोजीचे विनंतीपत्राचा विचार करता व वरील बाबींचा विचार होऊन ठेकेदार यांना दि.०५/०७/२०१६ अखेर मुदतवाढ देणे आवश्यक आहे असे मत आहे.

**अभिप्राय/ मत:** तरी वरील बाबींचे अवलोकन होऊन, ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांचे विनंती पत्राचा सकारात्मक विचार होऊन त्यांना दि.०५/०७/२०१६ अखेर मुदतवाढ देणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **मंदिर विभागाकडील पुजारी कर्मचारी यांचे ड्रेस कोड निश्चित करणे व वैद्यकीय तपासणी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/ तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**<u>प्रस्तावना</u>:-** संस्थानचे सर्व विभागांना ISO दर्जा प्राप्त करणेबाबत कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यनुसार ISO सल्लागार श्री केशुमुर्ती यांचे सल्ल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच मंदिर विभागाकडील ९५% दुरुस्त्या/ बदल केलेले असुन त्यानुसार मंदिर विभागास लवकरात लवकर ISO मानांकन देणेत येणार असल्याचे श्री केशुमुर्ती यांनी तोंडी कळविले आहे.

**<u>प्रस्ताव</u>:-** बुधवार दि.१५/०२/२०१७ रोजी दुपारी ०३.३० वाजता लेंडीबागेतील सभागृहात प्र.मा.कार्यकारी अधिकारी डॉ.संदीप आहेर यांच्या अध्यक्षतेखाली व ISO सल्लागार श्री.केशुमुर्ती यांनी संस्थानच्या वेगवेगळ्या विभागात आय.एस.ओ. मानांकन प्राप्त करणेकामी कामकाजाचा आढावा घेणेत आला आहे. त्यावेळी जा.नं.एसएसएस/ वशी-का.अ.स्वीय/ ४०९५/ २०१७, दि.१८ फेब्रुवारी, २०१७ चे आदेशान्वये मंदिर विभागासंबंधी खालीलप्रमाणे सूचना करण्यात आल्या आहेत-

१) साई मंदिरामध्ये नियुक्त पुजारी कर्मचा-यांना ड्रेस कोड तयार करणे व

२) साई मंदिरामधील नियुक्त असलेल्या पुजारी कर्मचा-यांची वैद्यकीय तपासणी केलेली असावी.

**<u>विभागाचा अभिप्राय</u>:-** समाधी मंदिरामध्ये काम करणा-या कर्मचा-यांची पुर्वीपासुन ड्रेसबाबत कोणतीही नियमावली तयार करण्यात आलेली नाही. ISO चे सल्लागार श्री.केशुमुर्ती यांनाही हे निदर्शास आले आहे. त्यानुसार मंदिर विभागाकडील पुजारी यांना खालीलप्रमाणे ड्रेस कोड नियमावली व श्रींचे समाधी चौथ-यावर काम करणा-या कर्मचा-यांना खालील नियमावली करता येईल-

सध्या समाधी चौथ-यावरील कायम व कंत्राटी कर्मचारी हे एकाच लाल रंगाचे सोवळे वापरतात. त्याऐवजी चौथ-यावरील कायम पुजारी/सहाय्यक पुजारी यांना लाल रंगाचे सुती सोवळे, उपरणे व कंत्राटी कर्मचारी पिवळे रंगाचे सुती सोवळे, उपरणे वापरण्यात यावे. तसेच कायम व कंत्राटी चोपदार/ मदतनीस यांना गुडघ्यापर्यंत लाल झगा व पांढरा पायजामा असा पोशाख असावा. तसेच श्रीगुरुस्थान, श्रीद्वारकामाई, श्रीचावडी, श्रीमारुती मंदिर, श्रीशनि-गणपती-महादेव मंदिर, श्रीदत्त मंदिर, म्युझियम हॉल, इ. मंदिरातील पुजारी/ सहा.पुजारी/ चोपदार/ मदतनीस यांनी पिवळे सोहळे, उपरणे परिधान करावे.

श्रींचे समाधी चौथ-यावर जातांना कोणीही पॅन्ट, शर्टवर अथवा इतर कोणतेही वस्त्र घालुन जाऊ नये. मंदिर विभागाने निश्चित केलेला ड्रेस कोडप्रमाणे चौथ-यावर जाणे.

चोपदार यांनी समाधी चौथ-यावर जातांना डोक्यातील पगडी घालून चौथ-यावर जाऊ नये.

सर्व पुजारी/सहाय्यक पुजारी यांनी आपले हात, चेहरा सोडुन आपले सर्व अंग व्यवस्थीत झाकुन घेणे गरजेचे आहे.

समाधी चौथ-यावर काम करणा-या कोणत्याही कर्मचा-यांनी कानात बाळी, हातात कडे बोटात कोणत्याही प्रकारची आंगठ्या असे अलंकार वापरु नये

प्रत्येक आठवड्यातुन एकदा समाधी चौथ-यावर जाणारे सर्व कर्मचा-यांची हाताची व पायाची वाढलेली नख, डोक्याचे केस कमी केलेले व दाढी केलेली आहे हे तपासण्यात यावे. तसेच असे नसल्यास संबंधीत कर्मचा-यांकडुन नखे काढुन घेणे व केसकमी करुन मगच समाधी चौथ-यावर जाऊ देणे.

समाधी चौथ-यावर काम करणारे कर्मचा-यांना हात धुने-पाय धुने करीता स्वतंत्र मोरी करण्यात यावी. तसेच कर्मचा-यांचे स्वच्छतेकरीता तेथे लिक्वीड, साबन, टॉवेल, इ. साहित्य ठेवण्यात यावे.

मंदिर विभागामध्ये काम करणारे सर्व कायम व कंत्राटी पुजारी/सहाय्यक पुजारी तसेच सर्व कायम/कंत्राटी कर्मचारी यांची प्रत्येक संस्थानचे श्रीसाईबाबा हॉस्पीटलमार्फत वैद्यकीय तपासणी करुन दफ्तरी नोंद ठेवावी.

तरी उपरोक्त अ.क्र.१ ते ७ असे नियमावली करणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.२०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे समाधी चौथऱ्यावर काम करणाऱ्यांसाठी प्रस्तावात नमुद केलेली लागू करणेस मान्यता देण्यात आली.**

**मंदिर विभागाकडील पुजारी कर्मचारी यांचे ड्रेस कोड निश्चित करणेकामी स्थानिक उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा. तसेच, साईभक्तांशी संपर्क येत असलेल्या विभागांमधील सर्व कर्मचाऱ्यांची दर ६ महिन्यांनी वैद्यकीय तपासणी करुन घेण्यात यावी. याची सुरुवात मंदिर विभागापासून करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **ISO ऑडीटर श्री.केशव मुर्ती यांचे सुचनेनुसार श्री साई आश्रम भक्तनिवास येथे फलक तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः-** ISO ऑडीटर श्री.केशव मुर्ती व त्यांचे प्रतिनिधी यांनी दि.१९/०१/२०१७ रोजी ISO मानांकन नुतनीकरण कामी श्री साई आश्रम भक्तनिवास व परिसराची पाहणी केली असता, आपत्कालीन मार्गाकडे जाण्यासाठी फलक लावावा तसेच परिसरात वाहनांचे वेग मर्यादेबाबत बोर्ड लावण्यात यावे, अशा सुचना करण्यात आल्या आहे.

**प्रस्तावः-** उपरोक्त विषयांकीत कामी खालील तपशिलाप्रमाणे मटेरियलची आवश्यकता आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिमाण/एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | Way to Emergency Exit आशयाचे फोम शिट व व्हिनायल प्रिंटींग बोर्ड साई -२'X१'-६''X ५० नग | १५० चौ. फुट | ६५/- प्र. चौ. फुट | ९,७५०/- |
| ०२ | Speed Limit बोर्ड 4mm जाडीचे ACP शिटवर ३ M रेडियम व ६५X६५X५ M.S. Angle चे स्ट्रक्चर असलेले बोर्ड तयार करणे. (१० फुट उंचीचे) | १० नग | ३५००/- प्र. नग | ३५,०००/- |
| | | | **एकूण रक्कम रु.** | **४४,७५०/-** |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे सदरहूकामी रक्कम रु.४४,७५०/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी येणा-या खर्चास व सदरचे बोर्ड विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ISO ऑडीटर श्री.केशव मुर्ती यांचे सुचनेनुसारश्री साई आश्रम भक्तनिवास येथे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फलक विहीत पध्दतीने तयार करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४४,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **मौजे निमकाव कोऱ्हाळे, ता.राहाता येथील गट नं.८० व ८५ मधील साई प्रसादालय इमारत बांधकाम नियमानुकूल करणेसाठी तडजोड शुल्क (कंपाऊंडींग चार्जेस) भरुन प्रस्ताव दाखल करणेविषयी तहसीलदार, राहाता यांचे विनंतीबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

उपरोक्त विषयासंदर्भात खालील तरतूदी अधिनियमातील कलम २१ मध्ये नमूद आहेत.

*"विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वारण्यात अथवा खर्च करण्यात येईलः..*

*छ) कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा किंवा कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रकमांचे प्रदान.*

*ज) त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायदयान्वये विश्वस्त व्यवस्थेकडून देय्य असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान."*

**प्रस्तावनाः-** वरील विषयाबाबत मा. तहसिलदार, राहाता यांचेकडून खालिल विनंतीपत्र प्राप्त झालेली असून ती सोबत अवलोकनार्थ जोडली आहेत.

| अ. नं. | संदर्भ क्रमांक | विषय | तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | राहाता तहसिल कार्यालय यांचे क्र.कावि.जमिन/८३५/२०१६ दि.१५/१०/२०१६ (आवक क्र.१३४७८, दि.१९/१०/२०१६) | विना परवाना/ बांधकाम आराखडया व्यतिरिक्त करण्यात आलेली बांधकामे नियमानुकूल करणेबाबत | श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांच्या मालकीचे बांधकामे नियमानुकूल करणेकामीचे प्रस्ताव तात्काळ दाखल करणेबाबत संबंधितांना आदेश होणेस विनंती |
| ०२ | राहाता तहसिल कार्यालय यांचे क्र.कावि.जमिन/तडजोड/६५/२०१६ दि.१५/११/२०१६ (आवक क्र.१५६७१, दि.१५/११/२०१६) | विना परवाना बांधकाम / बांधकाम आराखडया व्यतिरिक्त करण्यात आलेली बांधकामे नियमानुकूल करणेबाबत. | कायदेशिर तरतुदींच्या अनुशंगाने स्टाप कॉर्टर व साई प्रसादालय या इमारतीचे बांधकाम नियमानुकूल करणेकामीचे प्रस्ताव तात्काळ दाखल करणेबाबत संबंधितांना आदेश होणेस विनंती. |
| ०३ | राहाता तहसिल कार्यालय यांचे क्र.कावि.जमिन/तडजोड /६५/२०१६ दि.२१/१२/२०१६ (आवक क्र.१८४९८, दि.२१/१२/२०१६) | विना परवाना बांधकाम / बांधकाम आराखडया व्यतिरिक्त करण्यात आलेली बांधकामे नियमानुकूल करणेबाबत. | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालाप्रमाणे गट नं. ८० व ८५ मधिल बांधकामाचे मुल्यांकन रु.१२,११,३३,०००/- आहे. सदर मुल्यांकनाच्या १०% इतकी रक्कम तडजोड शुल्क (कंपाऊंडींग चार्जेस) भरुन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | इमारतींचे बांधकाम नियमानुकूल करणे आवश्यक असून त्याकरीता रक्कम रु.१,२१,१३,३००/- शासकीय खजान्यात भरणा करुन नियमानुकूल प्रस्ताव दाखल होणेस विनंती. |

वर नमूद पत्रांद्वारे तहसिलदार, राहाता यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २००४ ( सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३) अन्वये मौजे निमगांव – को-हाळे, ता. राहाता येथिल संस्थान मालकीच्या गट नं. १६९ मधिल स्टाफ क्वार्टर्स तसेच गट नं.८० व ८५ मधिल साई प्रसादालय या इमारतींच्या बांधकामासाठी ग्रामपंचायत निमगांव यांनी दिलेली परवानगी वैध नाही असे कळविले आहे.

सदरहू पत्रातील अंतिम परिच्छेदात खालीलप्रमाणे विनंती नमूद आहे.

**वरील अ. नं. २ चे पत्रः-**

*"प्रादेशिक योजनेचा मसूदा तयार किंवा मान्य करण्यात आलेल्या क्षेत्रांमध्ये नियोजन प्राधिका-याच्या परवानगीशिवाय कोणतेही विकासाचे काम अनुज्ञेय नाही. अहमदनगर जिल्हयासाठी दि. १४/०७/२००५ रोजी प्रादेशिक विकास योजना लागू झालेली आहे. सबब महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १८ अन्वये नियोजन प्राधिकारी हे मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर असल्याने नियमानुसार बांधकाम परवानगी घेणे आवश्यक होते.*

*याबाबत मा. प्रधान सचिव नगरविकास विभाग यांचेकडील १०/११/१९९७ रोजीच्या आदेशातील मार्गदर्शक सुचनांनुसार बांधकाम नियमानुकूल करणेकामी मा. उपविभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी यांचेकडे प्रस्ताव दाखल करणे आवश्यक आहे. अधिनियमाच्या कलम ५२ ,५३ अन्वये आवश्यक परवानगीशिवाय करण्यात आलेले बांधकाम शास्तिस पात्र असल्याने कायदेशीर तरतुदींच्या अनुशंगाने स्टाफ कॉर्टर व साई प्रसादालय या इमारतीचे बांधकाम नियमानुकूल करणेकामीचे प्रस्ताव तात्काळ दाखल करणेबाबत संबंधितांना आदेश होणेस विनंती आहे."*

**वरील अ. नं. ३ चे पत्रः-**

*" मौजे निमगांव – को-हाळे, ता. राहाता येथिल गट नं. ८० व ८५ मधिल आपल्या मालकीच्या बांधकामांची तपासणी करुन मुल्यांकन कळविणेकामी संदर्भ क्र. ३ अन्वये उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग राहाता यांना कळविले असता त्यांचेकडील संदर्भ क्र.४ चा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालाप्रमाणे गट नं. ८० व ८५ मधिल बांधकामाचे मुल्यांकन रु.१२,११,३३,०००/- आहे. सदर मुल्यांकनाच्या १०% इतकी रक्कम तडजोड शुल्क (कंपाऊंडींग चार्जेस) भरुन इमारतींचे बांधकाम नियमानुकूल करणे आवश्यक आहे. तरी रक्कम रु.१,२१,१३,३००/- शासकीय खजान्यात भरणा करुन नियमानुकूल प्रस्ताव दाखल होणेस विनंती.*

*सार्वजनिक बांधकाम विभागाकडील संदर्भ क्र.४ चा मुल्यांकन अहवाल तसेच मा. सहाय्यक संचालक, नगररचना अहमदनगर यांचेकडील संदर्भ क्र.५ अन्वयेचा अहवाल सोबत जोडून सादर करत आहे."*

तहसिलदार, राहाता यांचे वर नमूद विनंतीचे अनुषंगाने सादर करणेत येते की, श्री साई प्रसादालय इमारतीचा सर्व साधारण तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) इमारतीचे नांवः- श्री साई प्रसादालय.
२) इमारतीचे स्थळः- मौजे निमगांव – को-हाळे, ता. राहाता गट नं.८०/१ पै. गट नं.८५ पै.
३) भूखंडाचे क्षेत्रः- २ हे. ८५ आर.
४) बांधकाम क्षेत्रः- तळमजला - ११६७९.८४ चौ. मी.
पहिला मजला – ५०४२.७२ चौ. मी.

एकूण – १६७२२.५६ चौ. मी.

५) बांधकाम पूर्णत्वाचा दिनांकः- १५/०८/२००७.

सदर इमारतीचे बांधकामासाठी परवानगी मिळणेबाबत संस्थानकडील जा.नं.एसएसएसटी/वशी-बांधकाम/ १३३८४/२००५, दि.१८/११/२००५ चे पत्राद्वारे मा. सरपंच, ग्रामपंचायत, मौजे निमगांव- को-हाळे यांचेकडे अर्ज करणेत आला होता. त्यास अनुसरुन, ग्रामसेवक व सरपंच, ग्रामपंचायत, निमगांव- को-हाळे यांचेकडील जा.नं.४७/०६, दि.२४/०२/२००६ अन्वये बांधकाम परवाना प्राप्त झालेला आहे.

सदर इमारतीचे वापर परवान्यासाठी संस्थानकडील जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१३९५२/२००७, दि.३०/०८/२००७ चे पत्राद्वारे मा. सरपंच / ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, निमगांव – को-हाळे यांचेकडे अर्ज करणेत आला होता. त्यास अनुसरुन ग्रामपंचायत कार्यालय, निमगांव – को-हाळे यांचेकडील जा.नं.२१/०७, दि.०५/०९/२००७ अन्वये वापर परवाना प्राप्त झाला आहे.

सदरहू इमारत बांधकामासाठी संस्थानने सादर केलेल्या अंदाजपत्रकास मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रदेश, नाशिक यांनी रक्कम रु.१४,७०,१३,८५२/- मात्र इतक्या रकमेकरीता तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

श्री साई प्रसादालयात या इमारतीचा उदघाटन समारंभ मा. श्रीमती प्रतिभा देवीसिंग पाटील, महामहिम राष्ट्रपती, भारतीय गणराज्य यांचे शुभहस्ते मंगळवार दि.२७ नोव्हेंबर, २००७ रोजी संपन्न झालेला आहे.

**प्रस्ताव:-** तरी मौजे निमगांव – को-हाळे गट नं.८० व ८५ मधिल संस्थानचे श्री साई प्रसादालय इमारतीचे बांधकामाकरीता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, राहाता यांनी केलेले मुल्यांकन रु.१२,११,३३,०००/- च्या १०% रक्कम रु.१,२१,१३,३००/- मात्र तडजोड शुल्क ( कंम्पाऊंडीग चार्जेस) शासकीय खजिन्यात भरणा करुन नियमानुकूल प्रस्ताव दाखल करणेबाबत तहसिलदार, राहाता यांनी विनंती केलेली आहे. त्यानुसार तडजोड शुल्क शासकीय खजिन्यात भरणा करुन नियमानुकूल प्रस्ताव दाखल करणेबाबत संस्थान पॅनेलवरील वकीलाचा सल्ला घेऊन पुढील कार्यवाही करता येईल असे मत आहे.

तरी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव को-हाळे, ता.राहाता येथील गट नं.८० व ८५ मधील साई प्रसादालय इमारत बांधकाम नियमानुकूल करणेसाठीचे तडजोड शुल्क (कंपाऊंडींग चार्जेस) शासनाकडून माफ होणेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **दादर, मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Stractural Repairs Plumbings & Painting Waterproofing, etc.) करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीची दादर (मुंबई) येथे "साई निकेतन" ही ०४ मजली इमारतआहे. उपलब्ध कागदपत्रांच्या अधारे असे दिसून येते की, १९३४,१९३५ च्या दरम्यान या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. सदरहू इमारत ही सन १९६० रोजी साईबाबा संस्थान मार्फत खरेदी करण्यात आलेली आहे.

संस्थानचे दादर येथील साईनिकेतन इमारतीमध्ये संस्थान तर्फे प्रकशीत करण्यात येणारी सर्व पुस्तके, फोटो व इतर साहित्य विक्रीसाठी ठेवण्यात आलेले आहे. तसेच संस्थानतर्फे प्रकाशीत करण्यात येणारे "श्री साईलिला" हे द्वैमासीक मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांमधून प्रसिध्द करण्यात येते. तसेच साईभक्तांकडून चेक, मनिऑर्डर, डी.डी. व रोख स्वरुपात अदा करण्यात येणारी देणगी स्विकारण्यात येते. तसेच साईभक्तांना शिर्डी येथे जाण्याचा मार्ग, निवास व्यवस्था, मंदिरातील कार्यक्रम उत्सव इत्यादी बाबत माहिती व मार्गदर्शन करण्यात येते. तसेच गरजु साईभक्तांना संस्थानतर्फे वैद्यकिय मदतीबाबत माहिती देणेत येते. या ठिकाणी साईबाबांची मुर्ती ठेवण्यात आलेली असून साईभक्त तिच्या दर्शनाचा लाभ घेतात. दर गुरुवारी तेथे आरती करण्यात येते.

संस्थानचे मुंबई येथील साईनिकेतन दादर या इमारतीचे स्ट्रक्चयरल ऑडीट करणेसाठी म्हाडा मुंबई बिल्डींग रिपेअर्स ॲण्ड् रिकन्ट्रक्शन बोर्ड तर्फे कार्यकारी अभियंता, एफ. एन. डिव्हीजन, एम.बी. आर. ॲण्ड आर. बोर्ड, मुंबई यांचे जानं.ई ई/ एफ एन/४००१/ ५८/२०१५ यांनी दि.१७/१२/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविले होते. सदर इमारतीचा वापर सुरु झालेनंतर तिस वर्षांनी नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडून इमारत वापरासाठी योग्य/ असल्याचे प्रमाणपत्र घेवून आयुक्त, म्हाडा, मुंबई यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे त्याचसाठी म्हाडा यांचे MBR & R बोर्डाकडे नोंदणीकृत स्ट्रयक्चरल इंजिनिअर यांचेकडून साईनितेकन इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेसाठी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेत आली. त्यापैकी Barve Consultant, Chembur,

Mumbai यांनी नाममात्र रु.१/- मात्र अधिक १४.५% सर्व्हिस टॅक्स इतक्या फी ची मागणी केली होती. त्यानुसार त्यांना इकडील जा. नं.६१६९/२०१६ दि.०८/०२/२०१६ अन्वये या कामासाठी कार्यादेश देणेत आला होता.

Barve Consultant, Chembur, Mumbai यांनी संपूर्ण इमारतीची पाहणी केली व त्या चे फोटोग्राफ घेतले तसेच आवश्यकतेनुसार NDT तपासण्या करुन सदर इमारतीचे स्ट्रतक्चरल ऑडीट करुन दिले असून, त्यांचा रिपोर्ट त्यांनी दि.१८/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये सादर केला असून सदरचा अहवाल मुंबई महानगरपालीका व कार्यकारी अभियंता, M.B.R.& R.Road यांचे संस्थानचे जा.क्र. २१३४/२०१६, दि.३०/०७/२०१६ रोजीचे पत्राने जमा केलेला आहे. सदरचे रिपोर्टमध्ये बर्वे कन्सल्टंट यांनी सदरहु इमारतीमध्ये खालीलप्रमाणे कामे हाती घेणेबाबत प्राथमिक अंदाजपत्रक दिले आहे.

| Sr. No. | Description of Item | Estimated Amount |
|---|---|---|
| 01 | Structural repairs | 574,100/- |
| 02 | Waterproofing of Terraces | 27,200/- |
| 03 | Plumbing works | 331,625/- |
| 04 | Special Water proof coating/ Painting work | 507,290/- |
| | Total Amount | 1,440,215/- |
| | Service Tax+VAT:Approx 18.5% | 266,440/- |
| | Grand Total | 1,706,655/- |
| | Provision For Variation in Qty (10%) | 170,665/- |
| | Provision for Extra Items (5%) | 85,333/- |
| | Budgetary Total | 1,962,653/- |
| | **Budgetary Total Say** | **1,965,000/-** |

मुंबई कार्यालय यांचेकडील दि२१/०९/२०१६ रोजीचे पत्राने साईनिकेतन इमारतीच्या गॅरेज मधील छताचे प्लास्टर निघत असल्याचे कळविले होते. त्यामुळे सदरचे प्लास्टर पुर्णपणे काढून घेण्यात आले असून सदर ठिकाणी नव्याने प्लास्टर करणे गरजेचे आहे.

**प्रस्ताव:** मुंबई येथील "साईनिकेतन" इमारतीचे दुरुस्ती व देखभालीसाठी तसेच संपूर्ण इमारत बाहेरील बाजुने रंगकामासाठी व संस्थान कार्यालय जिना व मुख्य प्रवेश लॉबी आतील बाजुने रंगकाम करणेसाठी इकडील विभागामार्फत सविस्तर अंदाजपत्रक, नकाशे व निविदा तयार करुन घेता येतील. मा. कार्यकारी अधिकारी कक्ष यांचेकडील जा.क्र. ३६२१ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार प्रत्येक विभागाने टेंडर मध्ये नमूद करण्यात येणारी एस्टीमेट कॉस्ट ही मार्केट कॉस्ट पेक्षा २० ते ३० टक्के कमी नमूद करावी असे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सल्लागार Barve Consultant, Chembur, Mumbai यांनी सादर केलेल्या प्राथमिक अंदाजपत्रकाप्रमाणे येणारे रु.१९,६५,०००/- मात्र रक्कमेत २० टक्के कपात करुन येणारे रक्कम रु. १५,७२,०००/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून सदरची कामे करुन घेणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दादर, मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीच्या टेरेसचे वॉटरप्रुफिंग व संस्थान वापरामध्ये असलेल्या भागाची प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दुरुस्ती करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. या ठिकाणी संस्थानच्या नावाचा नवीन फलक बवविणेत यावा व लिफ्ट बसविणेसाठी सर्वसमावेशक प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. तसेच कार्यकारी अधिकारी व समिती सदस्यांनी या इमारतीची पाहणी करावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **रक्तदान चळवळ वाढीस लागणेकामी गठीत करण्यात आलेल्या समिती सदस्यांना मोफत सुविधा पुरविणे बाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद –** कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समिती ठराव क्र.–** नविन प्रस्ताव

**प्रास्ताविक-** महाराष्ट्रातील जवळजवळ २९६ रक्तपेढयांचा सर्वेकरुन थॅलॅसेमिया ग्रस्तांसाठी काम करणा-या १४ नामांकित रक्तपेढ्यांची यादी निश्चित करुन रविवार दि. १२/०२/२०१७ रोजी सकाळी ११ ते सायं. ५ यावेळेत मा.डॉ.सुरेश हावरे सो.अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, यांचे अध्यक्षतेखाली शिरडीच्या श्री साईनिवास अतिथीगृह, हॉलमध्ये रक्तदान चळवळ वाढीस लागणेसाठी चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते. सदरचे चर्चासत्रास मा.उपाध्यक्ष श्री.चंद्रशेखर कदम सो. मा.विश्वस्त श्री. प्रताप भोसले सो., मा.श्री. भाऊसाहेब वाकचौरे सो. मा.श्री. सचिन तांबे सो. मा. सौ. योगिता शेळके, मा.उपकार्यकारी अधिकारी डॉ. संदीप आहेर सो. व नामांकित १४ रक्तपेढयांचे प्रत्येकी दोन प्रतिनिधी इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. समाजात रक्तदानाचे महत्व रुजावे,अडीअडचणीच्या वेळी गरजु रुग्णांना रक्त उपलब्ध व्हावे यासाठी पुढाकार घेऊन रक्तदान संकल्पना रुजविली जावी तसेच थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया यासारख्या रुग्णांना संस्थान मार्फत मदत व्हावी यासाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घ्यावा, याकरीता जसे तिरुपती बालाजी संस्थानमध्ये ज्या प्रमाणात केशदान ही संकल्पना रुजवलेली आहे त्याच धर्तीवर शिरडीत रक्तदान ही संकल्पना रुजवावी असे मा.अध्यक्ष साहेब यांनी सुचविले आहे.

**चर्चासत्रामध्ये खालील विषयांवर सविस्तर चर्चा झाली.**

१) भाविकांनी रक्तदान केल्यानंतर संस्थानने रक्तघटक तयार करण्याचा प्रकल्प हाती घेणे आवश्यक आहे.

२) तयार झालेले रक्तघटक एका विशिष्ट व्हॅनने महाराष्ट्रातील कानाकोप-यातील सर्व रक्तपेढयांपर्यंत पोहचविणे आवश्यक आहे.

३) थॅलॅसेमियाग्रस्त रुग्णांचे निदान होणेकामी आवश्यक असणारे Hb Electro Phoresis सारखे मशिन संस्थानने खरेदी करणे आवश्यक आहे. त्यामुळे थॅलॅसेमियाग्रस्त रुग्णांचे लवकर निदान होणेकामी नक्कीच मदत होईल व पुढील गुंतागुंत टाळता येईल.

४) जास्तीत जास्त रक्त संकलीत होणेकामी मंदीर परिसरात व भक्तीनिवास, प्रसादालय सारख्या ठिकाणी रक्तदान जागृती बाबत बोर्ड (फलक) लावणे.

५) यावेळी रक्तदान ही संकल्पना वाढीस लागणे कामी व वरील विषय मार्गी लागणे कामी श्री साईनाथ रक्तपेढी व महाराष्ट्रातील इतर नामांकित रक्तपेढया यांचे मध्ये समन्वय साधणे कामी खालील प्रमाणे चार सदस्यांची समिती गठीत करण्याचे ठरले.

१) डॉ. सौ. मैथिली पितांबरे वैद्यकिय अधिक्षीका, श्री साईनाथ रुग्णालय - (अध्यक्ष),
२) डॉ. सुर्यकांत पाटील रक्तसंक्रमन अधिकारी, श्री साईनाथ रक्तपेढीचे - (सदस्य),
३) डॉ. अतुल कुलकर्णी जनकल्याण रक्तपेढी, पुणे - (सदस्य),
४) डॉ. मंजु कुलकर्णी हेडगेवार रक्तपेढी, औरंगाबाद - (सदस्य)

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान-** संबंधीत विषयास चालना मिळणेकामी समितीतील सदस्यांनी योग्य वेळी शिरडी येथे बैठक आयोजित करुन योग्य तो प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्याचे ठरले. तसेच संबंधीत सदस्यांनी रक्तदान संकल्पना सर्व समाजात रुजविणे, त्याचा प्रचार प्रसार होणे कामी गरजेप्रमाणे वेळोवेळी बैठकांचे आयोजन करावे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** संबंधित गठीत केलेल्या समिती सदस्यांपैकी बाहेर गावांवरुन येणाऱ्या दोन सदस्यांना बैठक आयोजनाचे वेळी ने-आण करणेसाठी वाहनव्यवस्था, साईआश्रम भक्तनिवास येथे निवासव्यवस्था, भोजनव्यवस्था तसेच श्रींचे दर्शन/आरती व इतर व्यवस्था संस्थान मार्फत मोफत पुरविणेबाबत मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

तरी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, रक्तदान चळवळ वाढीस लागणेकामी गठीत करण्यात आलेल्या समितीमधील बाहेर गावावरुन येणाऱ्या दोन सदस्यांची वाहन व्यवस्था वगळता, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे निवास, भोजन व दर्शन/ आरती व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षिका)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रुग्णांना दिले जाणाऱ्या वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीमध्ये बदल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :-** कलम १७ (१) व १७ (२) (ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** दि.२४/०७/२०११ रोजीची मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.

**प्रास्तविक :-** उपरोक्त विषयाकिंत संदर्भान्वये, श्री साईबाबा संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीमध्ये बदल करणेकामी १) प्रशासकीय अधिकारी, २) वैद्यकीय संचालक, ३) वैद्यकीय अधिक्षक, ४) वित्तव्यवस्थापक,५) अधिक्षक अनुदान विभाग यांची एक समिती गठित करणेत आली होती सदर समितीने दि.१६/०२/२०१७ रोजी वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीचा अभ्यास करुन नियमावलीमध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती केलेली आहे.

| अ. नं. | जुनी नियमावली | दुरुस्त नियमावली | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय आर्थिक अनुदान हे खालील शस्त्रक्रिया / उपचारासाठी देण्यात येईल.<br>अ) हृदयशस्त्रक्रिया व नंतरचे उपचार<br>ब) किडनी डायलेसिस, प्रत्यारोपन व नंतरचे उपचार.<br>क) मेंदुची शस्त्रक्रिया नंतरचे उपचार<br>ख) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.<br>ग) रक्तासंबधीचे आजार (उदा.हिमोफेलिया)<br>घ) जी.बी.एस.(Guillain Barre Syndrome)<br>ङ) मनका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.<br>च) कॉक्लीअर इम्प्लॅट | वैद्यकीय आर्थिक अनुदान हे खालील शस्त्रक्रिया / उपचारासाठी देण्यात येईल.<br>अ) हृदयशस्त्रक्रिया व नंतरचे उपचार<br>ब) किडनी डायलेसिस, प्रत्यारोपण व नंतरचे उपचार.<br>क) मेंदुची शस्त्रक्रिया नंतरचे उपचार<br>क) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.<br>ख) रक्तासंबधीचे आजार (उदा.हिमोफेलिया, थॅलॅसेमिया, सिकलसेल ॲनिमिया)<br>ग) जी.बी.एस.(Guillain Barre Syndrome)<br>घ) मणका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.<br>ङ) कॉक्लीअर इम्प्लांट<br>च) ऑर्गन ट्रान्सप्लान्ट – किडनी, हार्ट, बोनमॅरो, लिव्हर, कॉर्नीया.<br>छ) ॲक्सीडेन्ट – ज्यामध्ये व्हॅस्कुयूलर सर्जरी आवश्यक आहे व त्या अशा रुग्णांलाच की ज्या संस्थान रुग्णालयात होऊ शकत नाहीत.<br>ज) जॉईन्ट रिप्लेसमेंट- गुडघा व कमरेचा, खुबा सांधा रोपन शस्त्रक्रिया.<br>झ) रोग प्रतिकार शक्ती कमी करणारे आजार Immuno Logical Disease (SLE, Multiple Sclerosis, Rheumatoid Orthritis) | गरीब व गरजु रुग्णांना जास्तीत जास्त लाभ घेता यावा, याकरीता दिर्घआजार संख्या वाढविणे आवश्यक आहे. |
| २ | रुग्ण व त्यांचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रुपये एक लाख किंवा त्यापेक्षा कमी असल्यास अर्जदाराचा अर्ज अनुदानासाठी ग्राह्य समजण्यात येईल. उत्पान्नाचे प्रमाणपत्र खालीलप्रमाणे असावे.<br>अ) रुग्ण वा / आणि रुग्णांचा पालक नोकरी करत असल्यास ज्याचेकडे नोकरी करत | रुग्ण व त्यांचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रुपये एक लाख किंवा त्यापेक्षा कमी असल्यास अर्जदाराचा अर्ज अनुदानासाठी ग्राह्य समजण्यात येईल. उत्पन्नाचे प्रमाणपत्र खालीलप्रमाणे असावे.<br>अ) रुग्णाचा / पालकाचा व्यवसाय / | यापुर्वीच्या नियमावलीतील जाचक अटी काढून टाकुन गरीब व गरजु रुग्णांना जास्तीत जास्त लाभ देण्याचा |

| | | | |
|---|---|---|---|
| | असेल / असतील त्या संस्थेने / व्यक्तीने रुग्णांला वा / आणि रुग्णाच्या पालकाला देण्यात येत असलेल्या पगारासंबंधीचे (वेतन / भत्ते इ. सर्व मिळुन एकुन उपलब्धीचे) प्रमाणपत्र / पगाराची स्लीप आणि इतर मार्गाने (म्हणजे शेती / गुंतवणीकीवरील व्याज / घरभाडे इ.) रुग्णाला / रुग्णाच्या पालकाला उत्पन्न आहे वा नाही. याबाबत प्रतिज्ञापत्र (Affidavit)<br>आ) रुग्णाचा / पालकाचा व्यवसाय वा व्यापार असेल तर रुग्णाने वा / आणि त्याचे पालकाने त्यांच्या सर्व मार्गानी मिळणा-या उत्पन्नाबाबत प्रतिज्ञापत्र (Affidavit) द्यावे.<br>ब) रुग्ण वा / आणि त्याच्या पालकांचे एकुण उत्पन्नाबाबत त्या भागातील तहसिलदार यांनी दिलेले उत्पान्नाचे प्रमाण पत्र द्यावे.<br>क) रुग्ण जर शेती करत असेल तर त्याचे एकुण उत्पन्नाचे तहसिलदाराकडुन प्रमाणपत्र येते. परंतु त्याशिवाय तो ज्यांचेवर अवलंबुन आहे. त्या मुलाचे / मुलीचे वा पालकाचे एकुण लक्षात घेणे जरुरी आहे म्हणुन कुटुंबातील सर्वाच्या एकत्रित एकुण उत्पन्नाचे वा पालकाच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र द्यावे.मात्र रुग्ण ६० वर्षाच्या वर असेल तर केवळ त्याच्या वैयक्तिक उत्पन्नाचा विचार करुन अनुदान देण्यात येईल. | शेती वा नोकरी / व्यापार असेल तर रुग्णाने वा / आणि त्याचे पालकाने त्यांच्या सर्व मार्गानी मिळणा-या उत्पन्नाबाबत प्रतिज्ञापत्र (Affidavit) द्यावे.<br>ब) रुग्ण वा / आणि त्याच्या पालकांचे एकुण उत्पन्नाबाबत त्या भागातील तहसिलदार यांनी दिलेले उत्पान्नाचे प्रमाण पत्र द्यावे.<br>क) रुग्ण ६० वर्षाच्या वर असेल तर केवळ त्याच्या<br>क) वैयक्तिक उत्पन्नाचा विचार करुन अनुदान<br>ख) देण्यात येईल. | विचार केलेला आहे. |
| ३) | अनुदान हे केवळ भारतातील सरकारी, जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सावर्जनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय, यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी देण्यात येईल. | अनुदान हे केवळ भारतातील सरकारी, जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सावर्जनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) अथवा प्रा. लिमिटेड कंपनी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी चालविलेले रुग्णालय, यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी देण्यात येईल.परंतु अशा रुग्णालयाची नोंद संस्थानच्या अनुदान देण्याचे रुग्णांलयाच्या यादीत असणे आवश्यक आहे. | वैद्यकीय आर्थिक अनुदानाचा दुरुपयोग होऊ नये व गरीब व गरजु रुग्णांना लाभ घेता यावा. |
| ४) | संस्थानचे रुग्णालयात ज्या रुग्णांच्या शस्त्रक्रिया/ उपचार, होणार / झालेले असतील अशा रुग्णांना संस्थान मार्फत अनुदान देण्यात येत नाही. | संस्थानचे रुग्णालयात ज्या रुग्णांच्या शस्त्रक्रिया/ उपचार, होणार / झालेले असतील अशा रुग्णांना संस्थान मार्फत अनुदान देण्यात येणार नाही. | संस्थानमध्ये कमीत कमी दरात शस्त्र क्रिया केल्या जातात व पेशंटला बिलात देखिल सवलत दिली जाते. त्यामुळे संस्थान रुग्णालयात शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५) | अनुदान मागणी अर्जासोबत उपचार / शस्त्रक्रियेसाठी लागणा-या खर्चाचे व शस्त्रक्रिया अंदाजे (Tenative) तारीख दर्शविणारे संबधित वैद्यकीय अधिकारी यांचे रुग्णालयाचे लेटरहेडवर प्रमाणपत्र आवश्यक आहे. | अनुदान मागणी अर्जासोबत उपचार / शस्त्रक्रियेसाठी लागणा-या खर्चाचे व शस्त्रक्रिया अंदाजे (Tenative) तारीख दर्शविणारे संबधित वैद्यकीय अधिकारी यांचे सही,पदवी रजिस्टेशन नंबर सह रुग्णालयाचे लेटरहेडवर प्रमाणपत्र आवश्यक आहे. | अनुदान योजनेचा दुरुपयोग होऊ नये याकरीता आवश्यक. |
| ६) | औषधांच्या उपचाराच्या वाढत्या किंमती व खर्च लक्षात घेता अनुदान हे शस्त्रक्रिया उपचारासाठी येणारे एकुण खर्चाचे १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णाकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम, देण्यात येईल.मात्र शस्त्रक्रिया उपचाराचा खर्च रुपये १०,०००/- अगर त्याहुन कमी असल्यास अनुदान देण्यात येणार नाही. | औषधांच्या उपचाराच्या वाढत्या किंमती व खर्च लक्षात घेता अनुदान हे शस्त्रक्रिया उपचारासाठी येणारे एकुण खर्चाचे १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णाकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम, देण्यात येईल.मात्र शस्त्रक्रिया उपचाराचा खर्च रुपये १०,०००/- अगर त्याहुन कमी असल्यास अनुदान देण्यात येणार नाही. | गरीब व गरजु रुग्णांना जास्तीत जास्त लाभ घेता यावा. |
| ७) | अनुदानाची रक्कम परस्पर संबंधीत रुग्णालयाच्या नावाने डी.डी.अथवा क्रॉस चेकने पाठविण्यात येईल. (अकौंटपेयी) | अनुदानाची रक्कम परस्पर संबंधीत रुग्णालयाच्या नावाने आर.टी.जी.एस. ने पाठविण्यात येईल. | जेणे करुन लवकरात लवकर अनुदान रक्कम रुग्णापर्यंत पोहचणे करीता आवश्यक. |
| ८) | रुग्णाचे वैयक्तिक नावाने डी.डी. / चेक देण्यात येणार नाही. | रुग्णाचे वैयक्तिक नावाने डी.डी. / चेक देण्यात येणार नाही. | रुग्ण दुरुपयोग करु शकतात. |
| ९) | रुग्णाची शस्त्रक्रिया ज्यातारखेस आहे.तत्पुर्वी अगर जास्तीस जास्त एक महिना नंतर अनुदान मिळु शकेल. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार करणेत येणार नाही. मात्र अर्ज अपुर्ण कागदपत्रांची पुर्तता करणेसंबंधी रुग्णास पत्र पाठविल्यास असे पत्र पाठविलेपासुन पुढे एक महिन्याची मुदत सदर रुग्णास सर्व आवश्यक कागदपत्राची पुर्तता करणेकामी देण्यात येईल.त्यानंतर आलेल्या अर्जाचा मात्र विचार करणेत येणार नाही. | रुग्णाची शस्त्रक्रिया ज्यातारखेस आहे.तत्पुर्वी अगर जास्तीस जास्त एक महिना नंतर अनुदान मिळु शकेल. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार करणेत येणार नाही. मात्र अर्ज अपुर्ण कागदपत्रांची पुर्तता करणेसंबंधी रुग्णास पत्र पाठविल्यास असे पत्र पाठविलेपासुन पुढे एक महिन्याची मुदत सदर रुग्णास सर्व आवश्यक कागदपत्राची पुर्तता करणेकामी देण्यात येईल.त्यानंतर आलेल्या अर्जाचा मात्र विचार करणेत येणार नाही. | गरीब व गरजु रुग्णांना जास्तीत जास्त लाभ घेता यावा. |
| १०) | अर्जदाराने अनुदान मागणीचा संपुर्ण अर्ज शस्त्रक्रियेपुर्वी साधरणत: एक महिना अगोदर जमा केल्यास शस्त्रक्रियापुर्वी अनुदानाची रक्कम रुग्णालयात पोहोच होईल, तसेच तातडीच्या (इर्मजन्सी) प्रकरणात शस्त्रक्रियेनंतर परंतु रुग्णालय खाते (अकौंट) बंद होणेचे आत अर्जदाराने सर्व कागदपत्राची पुर्तताकरुन अर्ज सादर करावा.जेणेकरुन त्यास संस्थानने पाठविलेल्या रकमेचा उपयोग होईल. | अर्जदाराने अनुदान मागणीचा संपुर्ण अर्ज शस्त्रक्रियेपुर्वी साधरणत: एक महिना अगोदर जमा केल्यास शस्त्रक्रियापुर्वी अनुदानाची रक्कम रुग्णालयात पोहोच होईल, तसेच तातडीच्या (इर्मजन्सी) प्रकरणात शस्त्रक्रियेनंतर परंतु रुग्णालयातुन रुग्णास डिसचार्ज देणेपुर्वी अर्जदाराने सर्व कागदपत्राची पुर्तता करुन अर्ज सादर करावा. | अनुदान मागणी अर्जदेणेकामी काही ठराविक कालावधी आवश्यक असल्यामुळे ही अट घातली आहे. |
| ११) | प्रत्येक रुग्णांस गंभीर आजारासाठी फक्त एकदाच अनुदान देण्यात येते. परंतु अशा गंभीर आजारासाठी पाच वर्षानंतर पुन्हा रुग्णाने मागणी केल्यास वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येईल. | प्रत्येक रुग्णांस गंभीर आजारासाठी (कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार, व रक्तासंबधीचे आजार उदा.हिमोफेलिया, थॅलॅसेमिया, सिकलसेल ॲनिमिया) पुन्हा रुग्णाने मागणी केल्यास यांना प्रत्येक वर्षी अनुदान देण्यात येईल. तसेच इतर आजारासाठी तीन वर्षानंतर पुन्हा रुग्णाने मागणी केल्यास वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येईल. | गरीब व गरजु रुग्णांना जास्तीत जास्त लाभ घेता यावा यासाठी अट शिथिल केलेली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| १२) | अनुदान मागणी अर्जासोबत रेशनकार्डची प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत देणे आवश्यक आहे. | अनुदान मागणी अर्जासोबत रेशनकार्डची व पेशंटची आधारकार्डची प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत देणे आवश्यक आहे. | आधार कार्ड हा युनिक आय डी नंबर असल्यामुळे सदर कार्डची झेरॉक्स आवश्यक आहे. |
| १३) | शासनाच्या जिवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत लाभार्थी असणा-या रुग्णांना संस्थानमार्फत अनुदान देण्यात येत नाही. | केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या जिवनदायी / राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना,तत्सम योजने अंतर्गत असलेल्या रुग्णांना संस्थममार्फत अनुदान देण्यात येणार नाही. | काही रुगण या दोन्ही योजनेचा लाभ घेऊ शकतात यासाठी सदर अट घातली आहे. |
| १४) | अर्जासोबत जोडाव्या लागणा-या सर्वकागदपत्राची सक्षम अधिकारी यांनी साक्षांकित केलेली प्रमाणित प्रति लिपी (ॲटस्टेट प्रती ) असावी. | अर्जासोबत जोडाव्या लागणा-या सर्वकागदपत्राची सक्षम अधिकारी यांनी साक्षांकित केलेली प्रमाणित प्रति लिपी (ॲटस्टेट प्रती ) असावी. | कोणत्याही योजनेचा लाभ घेणेकामी नियमानुसार साक्षांकित प्रती आसणे आवश्यक आहे |
| १५) | स्टॅम्प रिसीट व उपयोगिता प्रमाणपत्राबाबत. | अनुदान प्राप्त होणा-या रुग्णालयांनी पाठविण्यात आलेल्या वैद्यकीय आर्थिक अनुदानाचा त्याच रुग्णासाठी वापर करावा, रुग्ण डिसचार्ज झाला असल्यास सदरच्या रुग्णाला दिलेल्या रकमेची स्टॅम्प रिसीट व उपयोगिता प्रमाणपत्राची माहिती तात्काळ इकडील कार्यालयास सादर करावी. दिलेल्या वैद्यकीय आर्थिक अनुदानाचे रकमेचा उपयोग त्या रुग्णासाठी न झाल्यास ती रक्कम संस्थान खाती त्वरीत जमा करणे आवश्यक आहे. | उपयोगिता प्रमाणपत्र अत्यावश्यक केल्यामुळे दिलेले अनुदान त्या रुग्णाला वापरले किंवा कसे? याबाबत माहिती उपलब्ध होईल. |

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान:-** श्री साईबाबा संस्थानने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी स्वतंत्र नियमावली तयार केलेली असुन, त्यास दि.२४/०७/२०११ रोजीची मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.व शासन निर्णय क्र.सासंवि-२००५/३७६/(७६)-का सोळा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई–४०० ०३२, दि.५ मे २००६.अन्वये शासनाची मान्यता आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** गरीब व गरजु रुग्णांना श्री साईबाबा संस्थान तर्फे वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी गठित समितीने तयार केलेली वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव रुग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा. तसेच ज्या रुग्णालयांना जास्तीत-जास्त अनुदान दिले जात आहे, त्या रुग्णालयांची समिती सदस्यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन, जास्त अनुदान कशामुळे दिले जाते, याची चौकशी करावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षिका)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्रीसाईबाबासंस्थानविश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम- २००४ मधील तरतुद:**

१. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड)श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

३. अधिनियमाचे कलम१७ (२) खंड (झ) नुसार विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी समिती करील,

४. अधिनियमाचे कलम२१(२) (दोन) नुसार स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीसाठी वाढ होण्यासाठी सहाय्य करणेची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः** सौ. योगिता अभय शेळके पाटील, नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी मा. अध्यक्ष सो. यांना अग्रेशित केलेल्या दि.२५/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये असे कळविले आहे की, शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन या स्पर्धेचे आयोजन शिर्डी नगरपालिकेच्या नगराध्यक्षा व चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे. या स्पर्धेच्या आयोजनाविषयी आपणा बरोबर समक्ष चर्चा झाल्यानंतर व स्पर्धेच्या अनुषंगाने आवश्यक बाबींचे आपणासमोर सादरीकरण झाल्यानंतर श्री साईबाबा संस्थान अशा प्रकारच्या स्पर्धेला पाठींबा देणार असल्याचे आपण मान्य केले आहे. याकरीता श्री साईबाबा संस्थानच्या येणा-या सर्वसाधारण सभेत याविषयी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तमंडळाच्या सभागृहाची मंजुरी घेऊनहिरवा कंदील देण्याचे आपण मान्य केले आहे. ही स्पर्धा आयोजित करताना श्री साईबाबा संस्थान यांचा केवळ पाठींबा मिळणे आवश्यक आहे. ही स्पर्धा श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळयाच्या निमित्ताने साईबाबांच्या विचारांचा प्रचार व प्रसार व्हावा व हा समाधी शताब्दी सोहळा जगभर साजरा व्हावा या दृष्टीकोनातून ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी अनेक देशातील पुरुष व महिला व्यावसायीक धावपटूचा सहभाग असणार आहे. तरी आपण या स्पर्धेच्या आयोजनाच्या प्रस्तावास मान्यता द्यावी. असे नमूद करुन याबाबत श्री साईबाबा संस्थानचे अध्यक्ष म्हणून आपण स्वतः व मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी समक्ष चर्चा झालेली आहे. तरी विश्वस्त मंडळाच्या सर्वसाधारण सभेत ऐनवेळी येणा-या विषयांमध्ये या विषयांचा समावेश करुन त्यास मंजुरी द्यावी, अशी विनंती केलेली आहे.

थोर संत श्रीसाईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे.यासाठी संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करणे जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल. या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे.

मा. नगराध्यक्षा यांनी उपरोक्त संदर्भिय पत्रात नमूद केलेप्रमाणे श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळयाच्या निमित्ताने शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनही स्पर्धा आयोजित केल्यास साहजिकच या स्पर्धेसाठी अनेक देशातील पुरुष व महिला व्यावसायीक धावपटू सहभाग घेतील. पर्यायाने शताब्दी वर्षाचे निमित्ताने श्रीसाईबाबांच्या विचारांचा प्रचार व प्रसार होईल. शिवाय या स्पर्धेसाठी संस्थानकडून कोणतीही आर्थिक मदत उपलब्ध करुन द्यावयाची नसून सदर स्पर्धेच्या आयोजनाचा खर्च पुणे येथील चॅम्प एन्डयुरन्स पुणे ही करणार आहे.

**प्रस्तावः** मा.नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत यांचेकडील श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षाच्या प्रचार व प्रसाराच्या दृष्टीकोनातून शिर्डी नगरपंचायत नगराध्यक्षा व चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय साई मॅरेथॉन स्पर्धा आयोजीत होणेसंदर्भात निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षाच्या प्रचार व प्रसाराच्या दृष्टीकोनातून शिर्डी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांचे प्रस्तावास अनुसरुन दि१५ ऑक्टोबर, २०१७ रोजी शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय साई मॅरेथॉन स्पर्धा आयोजीत करणेस व त्यासाठी संस्थानचा पाठींबा त्यांना देण्यास मान्यता देण्यात आली. या स्पर्धेसाठी संस्थानकडून कोणतीही आर्थिक मदत उपलब्ध करुन द्यावयाची नसून सदर स्पर्धेच्या आयोजनाचा खर्च चॅम्प एन्डयुरन्स, पुणे ही संस्था करणार आहे सदर स्पर्धेचे नियोजनासाठी चॅम्प एन्डयुरन्स, पुणे, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व संस्थानची स्थानिक उपसमिती यांची साई मॅरेथॉन समिती स्थापन करणेत यावी. या समितीने वेळोवेळी बैठका घेऊन, स्पर्धेच्या यशस्वीततेसाठी नियोजन करावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१** **श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कालावधीतील विविध धार्मिक, सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांची विविध प्रसार माध्यमांव्दारे प्रसिध्दी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद–**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम येअन्व (१), राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्‍वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा अर्चा-, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्‍वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्‍वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ येअन्व (ग), भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**प्रस्तावना-** मा.विश्‍वस्त श्री. प्रताप भोसले यांनी दि.०६/०३/२०१७ रोजी दुरध्वनीवरुन इकडील विभागास श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षाचे निमित्ताने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कालावधीतील विविध धार्मिक, सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांना विविध प्रसार माध्यमांद्वारे प्रसिध्दी करणेबाबतचा प्रस्ताव येत्या दि.०९/०३/२०१७ रोजी होणा-या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे मांडण्यात यावा, अशी सूचना केली आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दीच्या निमित्ताने शिर्डीत येणा-या भाविकांसाठी विविध सोयीसुविधा उभारणे तसेच संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेचे नियोजन आहे. या आयोजित करावयाच्या विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची तसेच संस्थान उपक्रमाची माहिति देशभरातील तसेच जगभरातील साईभक्तांना सहज व सुलभतेने होणे गरजेचे आहे.

**प्रस्ताव-** थोर संत श्रीसाईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दीच्या निमित्ताने शिर्डीत येणा-या भाविकांसाठी विविध सोयीसुविधा उभारणे तसेच संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेचे नियोजन करण्यात येत आहे. या आयोजित करावयाच्या विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची तसेच संस्थान उपक्रमाची माहिति देशभरातील तसेच जगभरातील साईभक्तांना सहज व सुलभतेने होणे गरजेचे असल्याने त्याची प्रसिध्दी विविध माध्यमांद्वारे केल्यास साईभक्तांना शिर्डी प्रवासाचे वेळापत्रक आखता येईल. त्याचप्रमाणे दुरचित्रवाणी संचावर कार्यक्रम पाहण्याचे नियोजन करता येईल. साहजिकच साईबाबांच्या कार्याचाप्रचारप्रसारहोईल.

साईभक्तांनी दिलेल्या सूचना अभिप्रायानुसार इकडील विभागाकडून शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप स्वरुपाचे वेळापत्रक तयार करणेची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

मा. विश्‍वस्त श्री.प्रताप भोसले यांनी केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करणेकरीता प्रथमतः मा. व्यवस्थापन समितीचा धोरणात्मक निर्णय होणेकरिता सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेचे निर्णयार्थसादर.

तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या धोरणात्मक निणर्यानंतर सदरची बाब माहिति तंत्रज्ञान व जनसंपर्क विभागाशी निगडीत असल्याने याबाबतची विस्तृत अंमलबजावणी माहिति तंत्रज्ञान व जनसंपर्क विभाग यांचेमार्फत एकत्रितरित्या होणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दीच्या निमित्ताने संपूर्ण वर्षभर करण्यात येणाऱ्या वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची तसेच संस्थान उपक्रमाची माहिति देशभरातील तसेच जगभरातील साईभक्तांना सहज व सुलभतेने होणेकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे विविध प्रसार माध्यमांव्दारे प्रसिध्द करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२** **शिर्डी येथे सुरु केलेल्या एफएम रेडीओ केंद्राची क्षमता वाढविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**प्रास्ताविक:** श्री साईबाबांचे जिवनकार्य व शिकवण याचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतुने प्रसार भारती यांचेमार्फत शिरडी आकाशवाणी (एफएम) केंद्र दि. 01/02/2017 रोजी पासुन सुरु करण्यात आलेले आहे. या केंद्रावर साईबाबांच्या मंदिरात होणाऱ्या सर्व आरत्या व धार्मीक कार्यक्रम व इतर वेळी नगर आकाशवाणी केंद्रावरील कार्यक्रम प्रसारीत करण्यात येतात. त्यासाठी साईनाथ रुग्णालय येथे 100 W FM ट्रान्समिटर कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत या केंद्रावरील प्रसारण शिरडी परिसरातील 15 किलोमिटर पर्यंतच्या हद्दीतील रहिवास करणाऱ्या नागरिकांना रेडीओ वरती ऐकता येतात.

शिरडी आकाशवाणी (एफएम) सुविधेस नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद पाहता, सदर सुविधेची व्याप्ती वाढविणेसाठी प्रसार भारती यांना कळविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन दि. 06/02/2017 रोजीचे पत्राव्दारे प्रसार भारती यांनी सदरची सुविधेची क्षमता वाढविणेकामी सद्यस्थितीत कार्यान्वीत करण्यात आलेल्या 100W FM ट्रान्समिटर ऐवजी 5 KW FM ट्रान्समिटर कार्यान्वीत करणेची तयारी दर्शविलेली आहे. त्यांचेशी दुरध्वनीव्दारे चर्चा केली असता 5 KW FM ट्रान्समिटर कार्यान्वीत केल्यास सदर प्रसारण 50 किलोमिटरच्या परिसरातील नागरिकांना ऐकता येईल असे कळविलेले आहे.

दि. 06/02/2017 रोजीचे पत्रामध्ये त्यांनी 5 KW FM ट्रान्समिटर कार्यान्वीत करणेकामी संस्थानकडुन रुग्णालय परिसरात 50 मिटर उंचीचा टॉवर उभारणेकामी परवानगी मिळणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच सदर टॉवरसाठी विद्युत, पाणी व संरक्षण याकामी येणारा खर्च संस्थानने करणे अपेक्षीत आहे, असे नमुद केलेले आहे.

सदरकामी येणारा अंदाजीत खर्च रु. 5 कोटी संस्थानने दिल्यास टॉवर उभारणीकामी आवश्यक साहित्य खरेदी करुन प्रत्यक्ष उभारणीची कार्यवाही सुरु करता येईल असे पत्रामध्ये नमुद केलेले आहे.

दि.06/02/2017 रोजीचे पत्रामध्ये प्रसार भारती यांनी साईभक्तांसाठी मोबाईल ॲप बनविण्याची इच्छा प्रगट केलेली आहे. मोबाईल ॲप बनविणेकामी इकडील विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे, असल्याने त्यांना सदर प्रक्रियेमध्ये भाग घेणेबाबत कळविता येईल, असे नम्र मत आहे.

प्रसारभारती यांनी दि. 06/02/2017 रोजीचे पत्राव्दारे शिरडी आकाशवाणी (एफएम) केंद्राची क्षमता वाढविणेकामी 5 KW FM ट्रान्समिटर उभारणेसाठी, संस्थानकडे मागणी केलेल्या 5 कोटी रुपये अंदाजीत खर्चाबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर करता येईल असे नम्र मत आहे.

**मागणी:** प्रस्ताविकेत नमुद केलेप्रमाणे प्रसार भारती यांनी शिरडी आकाशवाणी (एफएम) केंद्राची क्षमता वाढविणेकामी 5 KW FM ट्रान्समिटर उभारणेसाठी संस्थानकडुन मागणी केलेल्या 5 कोटी रुपये खर्चाबाबत निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** प्रसार भारती यांनी शिरडी आकाशवाणी (एफएम) केंद्राची क्षमता वाढविणेकामी 5 KW FM ट्रान्समिटर उभारणेसाठी संस्थानकडुन मागणी केलेल्या 5 कोटी रुपये खर्चाबाबत निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्याचे मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे शिकवणूकीचा तसेच समाधी शताब्दी महोत्सवामधील कार्यक्रमांचा प्रचार व प्रसार होणेकरीता प्रसार भारती यांनी शिरडी आकाशवाणी (एफएम) केंद्राची क्षमता वाढविणेसाठी 5 KW FM ट्रान्समिटर उभारणेकामी संस्थानमार्फत रु.५ कोटी मात्र निधी छाननी समिती व महाराष्ट्र शासनाचे मंजुरीने देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३** **कार्यालयीन वाहन क्रमांक एम.एच.१७/ एजे- २९५१ (XUV) चे दुरुस्ती खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन २००४ ची अधिनियमन तरतुदः- १७ (१)** मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे. आणि या अधिनीयान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उदीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील." असे नमुद केलेले आहे.

**महाराष्ट्र शासन २००४ ची अधिनियमन तरतुदः- २१ (१) (क)** मध्ये "विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदीस अधीन राहुन समिती कडुन मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल.**"** अशी तरतुद आहे.

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा संस्थान वाहन क्रमांक एम.एच-१७-एजे-२९५१ (X.U.V.) सदर वाहनाचा वापर दैनंदिन कार्यालयीन कामकाजाकरीता करण्यात येतो. सदर वाहन सन २०११ मध्ये खरेदी करण्यात आलेली आहे. प्रस्तुत वाहनाचा संस्थानचे वेगवेगळया विभागांचे कामकाजासाठी बाहेरगांवी जाणे-येणे कामी अत्यंत उपयोग होत आहे. आज मितीस वाहनाचा ८९,६८४ कि.मी इतका प्रवास झालेला आहे.

वाहन चालक यांचे दि.०७.०३.२०१७ रोजीचे तक्रारी नुसार प्रस्तुत वाहनाची तपासणी केली असता, वाहनाचे क्लच सिलेंडर मधुन ऑईल लिकेज आढळले क्लच सिलेंडर बदलणे करीता गिअर बॉक्स डिसमेंन्टल करावा लागतो. तसेच क्लच प्लेट, प्रेशर प्लेट, क्लच बेअरींग गाडीचे ८९,६८४ कि.मी. झालेने गाडीचे सततचे वापराने झिज झालेने बदलने आवश्यक आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्रायः-** उपरोक्त प्रमाणे वाहन क्रं.एम.एच.एजे-१७-२९५१ (X.U.V**)** चे दुरुस्ती करणे कामी कंपनीचे अधिकृत शोरुमला ओरिजनल स्पेअर पार्टसह करणे गरजेचे आहे. जितेंद्र मोटर्स प्रा.लि., नाशिक यांचेकडील वाहन दुरुस्तीचे कोटेशन नुसार रक्कम रु.३८,९०६/- पर्यंतचे खर्च येणार आहे. असे कळविलेले आहे. त्याबाबतचा इकडील मोटार मेकॅनिक यांचा अभिप्राय सोबत जोडला आहे.

**मागणीः-** तरी वरील प्रमाणे संबंधीत वाहनाचे जितेंद्र मोटर्स प्रा.लि., नाशिक यांचेकडून वाहन दुरुस्तीचे काम करणेकामी पाठविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ४०,०००/- मात्र (अक्षरी रक्कम रु. चाळीस हजार) पर्यतचे खर्चास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर,

**निर्णय क्र.२१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यालयीन वाहन क्रमांक एम.एच.१७/ एजे- २९५१ (XUV) ची दुरुस्ती जितेंद्र मोटर्स प्रा.लि., नाशिक यांचेकडून करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४** **वाहन क्र.एम.एच.१७/ एजे-२९५१ (XUV) करीता नविन टायर खरेदी करणेकामी दरपत्रके मागविणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम- २००४ मधील तरतुदः-** कलम १७ (१) मध्ये राल्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील, असे नमुद केलेले आहे.

प्रस्तावनाः- दि.२२/११/२०११ रोजी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी यांनी वाहन क्र.एमएच-१७-एजे-२९५१ (महिंद्रा XUV) हे वाहन देणगी दिलेले आहे. सदर वाहनाचा वापर संस्थानचे कार्यालयीन कामाकरीता होत असुन या वाहनाचे आजतागायत एकुण ८९,७९४ कि.मी. प्रवास झालेला आहे.

विभागाचा अभिप्रायः- या वाहनाचे सततच्या वापराने सदर वाहनाचे टायरची झीज होऊन जास्त खराब झालेने 235-65-17 या साईजचे ब्रिजस्टोन (ट्युबलेस) कंपनीचे ०५ टायर्स खरेदी करणे आवश्यक आहे. सदर टायर स्थानिक/ परिसरातील ब्रिजस्टोन कंपनीचे अधिकृत पुरवठादार यांचेकडून दरपत्रके घेवुन खरेदी करता येतील. या कामी अंदाजे रु.६२,०००/- पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च मोटारकार दुरुस्ती खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल.

मागणी:- तरी वाहनक्र.एमएच-१७-एजे-२९५१ (महिंद्रा XUV) या वाहनाकरीता उपरोक्त तपशिल प्रमाणे नवीन ०५ टायर्स खरेदी करणे कामी स्थानिक/ परिसरातील अधिकृत पुरवठादारांकडून दरपत्रके मागविणेस व या कामी येणारे अंदाजे रु.६२,०००/- (अक्षरी रु. बासष्ट हजार) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यालयीन वाहन क्र.एम.एच.१७/ एजे-२९५१ (XUV) करीता नविन टायर खरेदी करणेकामी स्थानिक परिसरातील अधिकृत पुरवठाधारकांकझून दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५** **वाहन क्र.एम.एच.१७/ के-९९०९ (महिंद्रा कॅम्पर) चे दुरुस्ती खर्चाची कामे विभागातंर्गत करुन घेणेस व याकामी येणा-या दुरुस्ती खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम -२००४ मधील तरतुद:-** कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यक्त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." असे नमुद केलेले आहे.

**प्रस्तावना**: वाहन विभागाकडील वाहन क्र.एमएच-१७-के-९९०९ (महिंद्रा कॅम्पर) या वाहनाचा वापर विविध विभागाचे मालवाहतुकी करीता करण्यात येत आहे. सदर वाहनाची दि.१४/०२/२०१७ रोजीचे वाहन चालक यांचे तक्रारीनुसार मोटार मेकॅनिक यांनी तपासणी केली असता सततच्या वापराने इंजिनचा क्रॅंक शॉफ्ट प्रथमदर्शी खराब झाल्याचे आढळुन आले.

**विभागाचा अभिप्राय:-** वाहन क्र.एमएच-१७-के-९९०९ (महिंद्रा कॅम्पर) या वाहनाचे दुरुस्ती कामाकरीता महिंद्रा कंपनीचे नाशिक येथील अधिकृत डिलर व सर्व्हिस सेंटर जितेंद्र मोटर्स प्रा.लि. यांचे चौकशी केली असता या दुरुस्ती कामी त्यांनी अंदाजे रु. दिड लाखापर्यंत खर्च येणार असलेचे कळविलेले आहे.

सदर मार्च-२००५ मध्ये खरेदी करण्यात आलेले असुन या वाहनाचा आजतागायत एकुण १,२१,१९० कि.मी. प्रवास झालेला आहे. सदर वाहनाचे दुरुस्तीचे काम डिलरकडे करुन घेण्यापेक्षा वाहन विभागातच खोलुन या दुरुस्ती कामाकरीता लागणारे आवश्यक स्पेअर पार्ट खरेदी करुन सदर काम वाहन विभागातच केल्यास खर्चात बचत होईल. या कामात वाहन विभागात न होणारी किरकोळ मशिनींगची कामे बाहेरुन करुन घेता येईल. या कामी अंदाजे रु.४५,०००/- पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च मोटारकार दुरुस्ती खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल. सोबत मोटार मेकॅनिक, वाहन विभाग यांचा लेखी अहवाल जोडलेला आहे.

**मागणी**: तरी वाहन क्र.एमएच-१७-के-९९०९ (महिंद्रा कॅम्पर) या वाहनाची दुरुस्तीची कामे विभागांतर्गत करुन घेणेस व याकामी येणा-या रु.४५,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणे कामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाहन क्र.एम.एच.१७/ के-९९०९ (महिंद्रा कॅम्पर) ची दुरुस्ती विभागांतर्गत करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये वेगवेगळया विषयानुरुप/ प्रसंगानुरुपसंस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने सदस्यांच्या सुचनांवरुनखालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**निर्णय क्र.२१८** विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.संकीर्ण २०१४/ प्र.क्र.३२/ का.१६, दि. मार्च, २०१७ रोजीचे आदेशान्वये श्रीमती रुबल प्रखेर- अग्रवाल, भा.प्र.से. यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती झालेली असून, श्रीमती रुबल प्रखेर- अग्रवाल, भा.प्र.से. यांनी आज दि.०९.०३.२०१७ रोजी संस्थानचा कार्यभार स्विकारलेला आहे. आजचे सभेत व्यवस्थापन समितीने त्यांचे स्वागत केले. तसेच कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येणाऱ्या निवासस्थानाचे रंगकाम व इतर आवश्यक दुरुस्ती करणेत यावी, असे ठरले. याकामी विहीत पध्दतीने कोटेशनची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**निर्णय क्र.२१९** श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीवर, समिती सदस्य म्हणून नव्याने नेमणूक करणेत आलेल्या नगराध्यक्षा मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील यांचा स्थानिक उपसमिती सभेमध्ये समावेश करणेत यावा.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग)

---

**निर्णय क्र.२२०** दर्शनरांगेमध्ये साईभक्तांना बूंदीप्रसाद पाकिटाचे मोफत वाटप करण्यातयेते. परंतु तयार करणेत येणारी बूंदीप्रसाद पाकिटे व भक्तांची संख्या यामध्ये खुपच तफावत दिसून येते. यावरुन आपले सुपरवीजन व्यवस्थीत होत नाही, असे निदर्शनास येते. याकरीता बूंदीप्रसाद वाटप काऊंटरवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेत यावे. तसेच बूंदीप्रसाद पाकिटे बनविलेनंतर त्याचे एकत्रित वजन करावे व वाटपाच्या ठिकाणीही वजन करणेत यावे, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग/ सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

**निर्णय क्र.२२१** श्रींचे मंदिरामधून निघणाऱ्या निर्माल्यांपासुन बचतगटांमार्फत सुगंधीत द्रव्य/ साई अगरबत्ती तयार करणेत यावी व त्या वस्तु बचतगटांकडून संस्थानने खरेदी करुन विक्रीसाठी ठेवणेबाबत. तसेच साईसृष्टी प्रकल्पामधील प्रस्तावित लेझर शो, प्लॅनोटेरीयम, वॅक्स म्युझीयम हे BOT तत्वावर तयार करणेसाठीचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ मंदिर विभागप्रमुख/ बगीचा विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

**निर्णय क्र.२२२** संस्थान प्रशासनाच्या सोयीच्या दृष्टीने तांत्रिक क्षेत्रातील शासनाकडून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करणेत यावी. तसेच संरक्षण विभागासाठी पोलिस विभागाकडील वरीष्ठ पदावरुन निवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची नियुक्ती करणेत यावी. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

वरील निर्णय क्र.१७१ ते २२२ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर दुपारी ०३.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**